सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, ११ नोव्हेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २२७ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## विक्रोळीत व्हॅनमधून साडे सहा टन चांदीच्या विटा जप्त

मुंबई : विक्रोळी परिसरात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिस आणि निवडणूक आयोगाच्या भरारी पथकाने साडेसहा टन चांदीच्या विटा असलेली व्हॅन जप्त केली आहे. मुलुंडमधील एका गोदामात चांदीच्या विटा नेण्यासाठी ब्रिंक्स या कंपनीच्या गाडीतून त्या नेल्या जात होत्या. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही मालवाहतूक अधिकृत असल्याचे दिसून येत आहे. तरीही, निवडणूक आयोग, आयकर विभाग आणि पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

मुंबई आणि महाराष्ट्रात निवडणुकीच्या काळात अनेक ठिकाणी बेहिशेबी रोकड किंवा मौल्यवान वस्तू सापडल्याच्या घटना वाढल्या आहेत. काही दिवसांपूर्वी मुंबईतील भुलेश्वरमध्ये देखील सुमारे १ कोटी ३२ लाख रुपयांची रोकड सापडली होती. या प्रकरणात पाच जणांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून चौकशी करण्यात आली होती. तसेच, पुण्यातही पोलिसांनी मोठ्या प्रमाणात बेहिशेबी रोकड जप्त केली होती.

विधानसभेच्या निवडणुकीच्या तोंडावर पोलिसांनी सर्वत्र बंदोबस्त कडक केला आहे, या आधीही, मुंबई-बेंगळुरू महामार्गावरील खेड-शिवापूर टोल प्लाझाजवळ झालेल्या नाकाबंदी दरम्यान पोलिसांनी बेहिशेबी रोकड जप्त केली होती. या कारमधील प्रवाशांना अटक करण्यात आली होती आणि त्यांची चौकशी करण्यात आली.

# महाराष्ट्राला देशात क्रमांक एकचे राज्य बनवू : अमित शाह

### भाजपा च्या संकल्पपत्राचे प्रकाशन



तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.१०नोव्हेंबर : महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलीयन डॉलर्सची बनवून देशातील क्रमांक एकचे राज्य बनविण्याचा भारतीय जनता पार्टीचा संकल्प आहे. भारतीय जनता पार्टीने आजवर दिलेली अनेक आश्वासने पूर्ण केली असल्याने महाराष्ट्राला मजबूत, समृद्ध, सुरक्षित राज्य बनवू, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रविवारी व्यक्त केला. विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाच्या संकल्पपत्राचे प्रकाशन त्यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल, जाहीरनामा समितीचे प्रमुख व वन - सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार, निवडणूक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व ज्येष्ठ नेते रावसाहेब पाटील दानवे, मुंबई भाजपा अध्यक्ष आ. आशीष शेलार, ज्येष्ठ नेते डॉ. विनय सहस्त्रबुद्धे आदी उपस्थित होते.

संविधानाची खोटी प्रत हातात घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधानाचा अपमान करणाऱ्या राहुल गांधी, काँग्रेसला मतदारांनी साथ देऊ नये असे आवाहन करुन शाह म्हणाले की, ' भाजपाने देशातील जनतेला दिलेल्या आश्वासनांपैकी अनेक आश्वासने पूर्ण केली आहेत. जम्मू - काश्मीर चे ३७० वे कलम रद्द करणे, तिहेरी तलाक रद्द करणे, नागरिकत्व कायद्यात दुरुस्ती (सीएए), राम मंदिर उभारणी अशी अनेक आश्वासने भारतीय जनता पार्टीच्या सरकारने पूर्ण केली आहेत. २०१४ मध्ये महाराष्ट्रात सत्तेवर आल्यानंतर भाजपा महायुती सरकारने महाराष्ट्राच्या विकासाला गती देणारे अनेक निर्णय घेतले. तेलंगणा, हिमाचल प्रदेश, कर्नाटक या राज्यांत निवडणूक काळात दिलेली आश्वासने काँग्रेस सरकारला पूर्ण करण्यात अपयश आले आहे, कर्नाटकमध्ये अनेक गावेच्या गावे 'वक्फ' ची मालमत्ता म्हणून घोषित झाली आहेत. सामान्य माणसाची मालमत्ता वक्फ च्या घशात जाऊ नये यासाठी मोदी सरकारने वक्फ बोर्ड दुरुस्ती विधेयक आणले आहे, याकडे शाह यांनी लक्ष वेधले.

संकल्पपत्र समितीचे अध्यक्ष व वन - सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले की, या संकल्पपत्रासाठी सामान्य नागरिकांकडून सूचना मागविण्यात आल्या होत्या. ८७७ गावांतून ई मेल, पत्रे आली. ८ हजार ९३५ सूचना आल्या. संकल्प पत्रातील एकेक मुद्द्यांच्या आधारे त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी समिती नेमली जाईल.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, हे संकल्पपत्र विकसित भारतासाठी विकसित महाराष्ट्र तयार करण्याचा रोडमॅप आहे. २०१४ मध्ये आम्ही जी आश्वासने दिली होती त्यापैकी किती पूर्ण झाली याचा अहवाल २०१९ मध्ये आम्ही सादर केला होता.




## श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानकडून तुळजापूर बोधचिन्ह निवडण्यासाठी मतदान करण्याचे आवाहन

धाराशिव: श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर यांचेकडून मंदिर संस्थांचे बोधचिन्ह तयार करण्यासाठी क्रिएटिव्ह डिझाईन मागवण्यात आल्या होत्या. यासाठी १९ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी यांच्या समक्ष या बोधचिन्ह तयार करणाऱ्या व्यक्तींचे सादरीकरण होऊन ते बोधचिन्ह मतदानासाठी मंदिर संस्थानच्या संकेतस्थळावर टाकण्यात आले होते. त्या बोधचिन्हावर मतदान करण्याचे आवाहन तहसीलदार तथा मंदिर संस्थानचे व्यवस्थापक यांनी केले आहे. श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे बोधचिन्ह तयार करण्यासाठी मागवण्यात आलेल्या बोधचिन्हाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी उपस्थित असलेल्या व्यक्तीसोबतच संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या ईओआयनुसार २३ सप्टेंबरपर्यंत इमेलवर लोगो सादर करणारे व्यक्ती यांचे लोगो विचारात घेऊन त्यानुसार सर्व लोगो वोटींगसाठी उपलब्ध करण्यात आलेले आहेत. या सर्व लोगोंना सर्व जनतेने मतदान करावे यासाठी सर्व बोधचिन्ह (लोगो) मंदिराचे संकेतस्थळावर उपलब्ध आहेत . भाविकांनी मतदान करणेसाठी https://shrituljabhavanitempletrust.org या संकेतस्थळावरील होमपेजवर सर्व लोगो वोटींग या लिंकवर जाऊन लोगोची पाहणी करून पसंत असलेल्या लोगोसाठी ३० नोव्हेंबरपर्यंत मतदान करावे, असे आवाहन श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे तहसिलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) यांनी केले आहे.

## आ. सतीश चव्हाण यांच्या प्रचारार्थ शरद पवार यांची सभा संपन्न

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१० नोव्हेंबर

महाविकास आघाडीचे गंगापूर खुलताबाद मतदार संघाचे उमेदवार आमदार सतीश चव्हाण यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष प्रमुख शरद पवार यांची प्रचार सभा येथील सोमानी ग्राउंड येथे संपन्न झाली

यावेळी महा विकास आघाडीचे प्रमुख पदाधिकारी माजी खासदार चंद्रकांत खैरे भूषणसिंह राजे भोसलेयांच्यासह माजी नगराध्यक्ष संजय जाधव विश्वजीत चव्हाण लक्ष्मण सांगळे दिलीप बनकर संपत छाजेड यांची प्रमुख उपस्थिती होती.




यावेळी बोलताना पवार म्हणाले की गंगापूर खुलताबाद मतदार संघाचा विकास करण्यासाठी सतीश चव्हाण यांना निवडून आणावे. केंद्र सरकारकडून शेतमाल पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचा मोबदला मिळत नाही राज्यात अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या त्यामुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत मोदी सरकारने ४०० पारचा केलेला दावा लोकसभेच्या निवडणूक निर्णयात फोल ठरला महाराष्ट्रात ४८ पैकी ३१ जागा महाविकास आघाडीला मिळाल्या त्यानुसारच विधानसभेतही महाविकास आघाडी अधिकाधिक जागा मिळवणार आहे असे यावेळी ते म्हणाले.

# काँग्रेसचा जाहीरनामा फसवा; चंद्रशेखर बावनकुळे यांची टीका

### काँग्रेसने योजनांचे बजेट सांगावे

नागपूर : काँग्रेससह महाविकास आघाडीचा जाहीरनामा फसवा असून त्यावर कुणीही विश्वास ठेवणार नाही. मतांच्या लागूंलचालनाकरीता काँग्रेस खोटारडेपणा करीत असल्याची टीका भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली असून, काँग्रेसच्या रक्तात विकास नाही, असेही ते म्हणाले.

नागपूर येथे ते माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलत होते. बावनकुळे म्हणाले, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी योजनांच्या विरोधात भूमिका घेतली. काँग्रेसचे लोकही लाडकी बहिण योजनेच्या विरोधात न्यायालयात गेले. अशा योजना परवडत नाही अशी थेट भूमिका विजय वडेट्टीवार यांनी घेतली. आता तेच योजनेतून तीन हजार रूपये देणार असे सांगत नवी योजना आणत आहेत, या योजनेसाठी पैसा कसा आणणार हे काँग्रेसने जाहीर करावे. दुसरीकडे भाजपा-महायुती आणि केंद्रातील मोदीजींचे डबल इंजिन सरकार असल्याने योजनांचे बजेट तयार आहे. विकासकामांसाठी केंद्र सरकार आणि योजनेसाठी महायुती सरकार पैसा देणार. खरगे यांच्या टीकेचा समाचार घेताना बावनकुळे म्हणाले, कुणाचा पायगुण चांगला हे हरियाणाच्या निकालावरून संपूर्ण देशाने पाहिले. राहुल गांधींचा पायगुण चांगला नाही. देशाच्या विकासासाठी मोदीजी सत्तेत आले म्हणूनच ते युगपुरुष ठरले, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्राची जनता महायुतीच्या बाजुने

संघात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो नसल्याच्या खरगे यांच्या वक्तव्यावर टोला लावला. बावनकुळे म्हणाले, खरगे संघ मुख्यालयात आले नाही, त्यांच्याकडे दुर्बीण आहे का? त्यांनी एकदा संघ कार्यालयात यावे व काय आहे ते प्रत्यक्ष पहावे. मनोज जरांगे यांची मागणी सामाजिक असून सरकार त्यांच्या मागण्यांची जबाबदारी नक्की घेईल, असे त्यांनी स्पष्ट केले. शरद पवारांचा अनुभव मोठा असला तरी महाराष्ट्राची जनता महायुतीच्या बाजुने असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

बेसा-पिपळा भागात प्रचार

कामठी मतदारसंघातील भाजपा-महायुती उमेदवार चंद्रशेखर बावनकुळे यांनी रविवार, दि. १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी बेसा-पिपळा नगर पंचायत क्षेत्रात प्रचार केला. वस्त्यांमध्ये नागरिकांच्या भेटी घेत त्यांनी संवाद साधला. कामठी - मौदा विधानसभा मतदारसंघाचे सर्वांगिण विकासासाठी पुन्हा एकदा लोकप्रतिनिधी म्हणून संधी देण्याची विनंती केली. नागरिकांनी त्यांचे उत्साहात स्वागत केले व अनेक महिलांनी त्यांचे औक्षण केले. यावेळी त्यांच्यासोबत अजय बोढारे, सुनील कोडे, नरेश भोयर, वैशाली भोयर, प्रभू भेंडे, मुकुल उपासने, सोनाली परमार, धनंजय झाडे, उमेश भोयर, अनिकेत चौधरी, मदन मालव, मिथिलेश राय, निखिल भोयर, किरण बोढारे यांच्यासह मोठ्या संख्येने भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## आज शहरात अभिनेता गोविंदा

छत्रपती संभाजीनगर : मध्य मतदार संघातील महायुतीचे उमेदवार प्रदीप जैस्वाल यांच्या प्रचारार्थ उद्या दि.११ रोजी अभिनेता गोविंदा यांची प्रचार रॅली आयोजित करण्यात आली आहे. औरंगपुरा ते संस्थान गणपती मंदिर असा या रॅलीचा मार्ग असणार आहे. संध्याकाळी ४ वाजेला या रॅलीला सुरुवात होणार आहे. या रॅलीला मोठ्या संख्येने शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, RPI(A) चे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित राहणार आहे.

# फडणवीसाची स्क्रिप्ट वाचणाऱ्याने आम्हाला शिकवू नये

### संजय राऊत यांचे राज ठाकरेंना प्रत्युत्तर

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.९ नोव्हेंबर: महाराष्ट्राची भाषा घाणेरडी करणारा एक भिकार संपादक असे निर्भत्सना करणाऱ्या मनसे प्रमुख राज ठाकरे यांना शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते खा. संजय राऊत यांनीही प्रत्युत्तर दिले आहे.

भाजपाचे फडणवीसांची स्क्रिप्ट वाचणाऱ्याने आम्हाला शिकवू नये. ते ठाकरे असले तरीही मीही बाळासाहेबांनीच घडविलेला राऊत आहे ,असा टोला लगावला.

राज ठाकरे यांनी शुक्रवारी विक्रोळी घेतलेल्या जाहीर सभेत संजय राऊत यांच्यावर नाव न घेता कडाडून टीका केली होती.

संपूर्ण महाराष्ट्राची भाषा घाणेरडी करून टाकणारा एक भिकार संपादक इकडे राहतो. त्यांना वाटते की तोंड त्यांनाच दिले आहे.इथे आम्ही ठाकरे आहोत. आमचा जेनेटिक प्रॉब्लेम आहे. त्याने सगळे राजकारण घाण केले आहे. आम्ही संयम बाळगतोय याचा अर्थ गां समजू नये, अशी बोचरी टीका केली होती. त्याला प्रत्युत्तर देताना शनिवारी राऊत म्हणाले की,' भाजपाच्या नादाला लागलेला माणूस दुसरे काय बोलू शकतो? जे महाराष्ट्राचे शत्रू आहेत, लूट करतायत त्यांच्याविरुद्ध लढण्यासाठी भाषा हे सुद्धा एक हत्यार आहे. ज्याला जी भाषा समजते, त्या भाषेचा वापर करावा असे आम्हाला बाळासाहेब ठाकरेंनी शिकवले आहे.. राज ठाकरे काय बोलले, त्यात मला जायचे नाही. असे सांगून ते म्हणाले,'निवडणुका आहेत, भारतीय जनता पक्षाचे , फडणवीसांचे जे स्क्रिप्ट असेल, तेच बोलावे लागते त्यांना, नाहीतर ईडीची तलवार आहेच, त्यामुळे कोणती भाषा कधी वापरायची, काय बोलायचे आणि काय लिहायचे, याचे मला धडे घेण्याची आवश्यकता नाही. ते ठाकरे असतील तर मी राऊत आणि बाळासाहेबांनी घडवलेलाच राऊत आहे, जोरदार प्रत्युत्तर दिले.

# महाराष्ट्राचे पुढचे उधोग केंद्र हे छत्रपती संभाजी नगर असेल : देवेंद्र फडणवीस

छत्रपती संभाजीनगर :-महायुती सरकारने छत्रपती संभाजी नगर महत्त्वाचा दर्जा दिला असून महाराष्ट्राचे पुढचे उद्योग केंद्र हे छत्रपती संभाजी नगर असेल. देशातील प्रमुख कंपन्या संभाजीनगर मध्ये आणल्या. त्यामुळे हजारो तरुणांच्या हाताला काम या माध्यमातून मिळत असून हजारो लोकांचा रोजगार आपण तयार करत आहे. त्यामुळे ही निवडणूक आधी निवडणूक नाही ही निवडणूक आपली एकजूट दाखवण्याची आहे जे लोक रजाकाराचं स्वप्न बघत आहे त्यांच्या स्वप्नाचा चुरडा करण्याची ही निवडणूक असल्याचे उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



बुधवारी महायुतीचे उमेदवार श्री अतुल सावे, श्री प्रदीप जैस्वाल, श्री संजय शिरसाठ यांच्या प्रचारार्थ बजरंग चौक येथे आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेला संबोधित करताना ते बोलत होते.

पुढे बोलतांना ते म्हणाले की, २३ तारखेला तुमचा हुंकार दिसला पाहिजे, त्याकरता २० तारखेला तुमच मतदान दिसले पाहिजे. ते जर वोट जिहाद करत असतील तर मतांच धर्म युद्ध करण्यासाठी संभाजीनगर तयार पाहिजे. छत्रपती संभाजी नगरने मतांचे धर्म युद्ध करून पुन्हा एकदा धर्माची स्थापना काय असते हे दाखवून देण्याची वेळ आहे.

संभाजीनगर चे चित्र महायुती सरकारने बदललं. शहराच्या पाण्या प्रश्नासाठी आठ दिवसात नवीन योजनेचा निर्णय घेतला. महानगरपालिकेकडून एक कोटी कवडी न घेता संपूर्ण खर्च राज्य सरकारने उठवत येथील नागरिकांना पाणी देण्याचा निर्णय घेतला. पुढील तीन महिन्यात नागरिकांना मुबलक पाणी मिळेल. एक रहेंगे तो सेफ रहेंगे असा संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे.

छत्रपती संभाजी नगर शहर हे कालही भगवचं होतं आजही भगवच आहे आणि २३ तारखेला ही भगवच राहील. काही लोकांनी भगव्या सोबत गद्दारी सुरू केली आहे काही लोकांनी मातांची लाचारी सुरू केली. असे म्हणत महाविकास आघाडीवर उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी तोफ डागली.

स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांनी या शहराला छत्रपती संभाजी नगर नाव दिले आणि त्या काळामध्ये मोरेश्वर सावेंच्या रूपामध्ये पहिल्यांदा शहर भगव करण्याचं काम पहिल्यांदा केलं असल्याचे उपमुख्यमंत्री यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी शहरातील स्थानिक मुद्द्यांना स्पर्श करत येथील अडचणी महायुतीचे सरकार पुन्हा आल्यास प्राधान्याने सोडविण्यात येईल अशी ग्वाही देत, येणाऱ्या २० तारखेला महायुतीच्या उमेदवारांना प्रचंड मताने विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

या प्रसंगी खा.संदीपान भुमरे, खा.डॉ.भागवत कराड, प्रदीप जैस्वाल, संजय शिरसाठ, शिरीष बोराळकर, अभिजीत देशमुख, बाबुराव कदम, नागराज गायकवाड, अनिल मकरिये, शिवाजी दांडगे,बापू घडामोडे, प्रमोद राठोड,यांच्या सह सर्व प्रमुख नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते तसेच नागरिकांची प्रचंड उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# भाजपा-महायुती उमेदवारांच्या प्रचारार्थ अभिनेते गोविंदा यांचा रोड शो

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १० नोव्हेंबर**



नांदेड लोकसभा मतदारसंघाचे भाजपा महायुतीचे उमेदवार डॉ. संतुकराव हंबर्डे व नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना महायुतीचे उमेदवार आमदार बालाजीराव कल्याणकर, दक्षिण नांदेड चे शिवसेना भाजपा महायुतीचे उमेदवार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या प्रचारासाठी प्रसिद्ध सिने अभिनेते तथा शिवसेनेचे स्टार प्रचारक गोविंदा यांनी नांदेड शहरात रोड शो केला. या रोड शो ला नांदेडमध्ये उदंड प्रतिसाद मिळाला असून गोविंदा यांच्या रोड शो मुळे महायुतीमे वातावरण झाले आहे. राज्यातील आणि केंद्रातील महायुतीचे सरकार हे केवळ जनकल्याणासाठी काम करत आहे. त्यामुळे महायुती सरकारच्या पाठीशी आपण सर्व मतदारांनी खंबीरपणे उभे राहावे असे आवाहन सिने अभिनेते गोविंदा यांनी यावेळी केले.

नांदेड लोकसभा निवडणुकीसाठी भाजपा महायुतीचे उमेदवार डॉक्टर संतुकराव हंबर्डे, शिवसेनेचे नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बालाजीराव कल्याणकर, नांदेड दक्षिणचे आनंदराव पाटील तिडके बोंढारकर यांच्या प्रचारासाठी आज शिवसेनेचे नेते स्टार प्रचारक तथा प्रसिद्ध सिने अभिनेते गोविंदा यांनी नांदेड उत्तर मधून रोड शोला सुरुवात केली. आमदार बालाजी कल्याणकर यांच्या तरोडा भागातील संपर्क करण्यापासून सुरुवात करण्यात आलेल्या या रोड शो मध्ये शिवसेनेचे नेते मंत्री आमदार हेमंत भाऊ पाटील, भाजपाचे लोकसभेचे उमेदवार डॉक्टर संतुकराव हंबर्डे, नांदेड उत्तरचे शिवसेना महायुतीचे उमेदवार आमदार बालाजीराव कल्याणकर, नांदेड दक्षिणचे उमेदवार आनंदराव पाटील तिडके बोंढारकर, प्रवीण साले, चैतन्य बापू देशमुख, जिल्हाप्रमुख गंगाधर बडुरे, दर्शन शिंदे, अपर्णा नेरलकर, साहेबराव गायकवाड, जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, श्याम वानखेडे, तुलजेश यादव यांच्यासह अनेक जण सहभाग घेतला होते.

महाराष्ट्राच्या विकासासाठी आणि महाराष्ट्राच्या सुरक्षेसाठी राज्यात शिवसेना महायुतीचे सरकारी आणि आवश्यक आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे खऱ्या अर्थाने सर्वव्यापी आणि सर्व संपन्न नेतृत्व आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुळेच महाराष्ट्रातील बहिणींचा खऱ्या अर्थाने सन्मान झाला आहे. महिला कल्याणाचे आणि महिला सबलीकरणासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुतीच्या सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसह अनेक महत्त्वपूर्ण योजना राबविले आहेत. देशाची सुरक्षितता आणि देशाचे उज्वल भविष्य यासाठी आपणही आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आणि राज्यात महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची गरज आहे. नांदेड लोकसभा मतदारसंघात गेल्या निवडणुकीत आपण काँग्रेसला मत देऊन आपले मत वाया घालवले होते. आता ही चूक सुधारण्याची आपल्याला नामी संधी उपलब्ध झाली असल्याने लोकसभेचे उमेदवार डॉक्टर संतुकराव हंबर्डे यांच्या पाठीशी आपले बळ उभे करा. नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघात बालाजी कल्याणकर यांना प्रचंड मतांनी विजयी करा. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे हात बळकट करून पुन्हा धर्म रक्षणासाठी, विकासासाठी शिवसेना भाजपा महायुतीला सत्तेत पाठवा असे आवाहन सिने अभिनेते गोविंदा यांनी यावेळी केले.

# लोकसभा निवडणुकीत महायुतीला बळ द्याः डॉ. संतुकराव हंबर्डे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १० नोव्हेंबर**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारमध्ये नांदेडचाही विकासाच्या दृष्टीने समावेश करण्याच्या अनुषंगाने आपण सर्वजण होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीत महायुतीला बळ द्या, कमळ या निशाणी समोरील बटन दाबून भाजपाला प्रचंड मतांनी विजयी करा .असे आवाहन भाजपा महायुतीचे उमेदवार डॉ. संतुकराव हंबर्डे यांनी केले. शहरातील विविध भागातील व्यवसायिकांना भेटी देऊन त्यांनी हे आवाहन केले. विपुल मोळके धनंजय नलबालवार, आशुतोष धर्माधिकारी बरबडेकर, संदीप कऱ्हाळे, सुनील भालेराव, बालाजी पाटील शेलगावकर, यांच्यासह अनेकांची यावेळी उपस्थिती होती.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा झंजावाती दौरा झाल्यानंतर नांदेड जिल्ह्यात भारतीय जनता पार्टी आणि महायुतीचे वारे जोमाने होऊ लागले आहे. मतदारांमध्ये उत्साह संचारला असून कार्यकर्तेही जोमाने कामाला लागले आहेत. नांदेड लोकसभेचे उमेदवार डॉ. संतुकराव हंबर्डे यांनी आज सकाळीच आपल्या प्रचार दौरा जोमाने सुरू केला आहे. नांदेड शहरातील विसावा गार्डन, भाग्यनगर रोड, व्हीआयपी रोड, श्रीनगर , वर्कशॉप आदी भागातील व्यापारी, व्यवसायिक, उद्योजक, लघु व्यापारी, चहा विक्रेते, हातगाडीवाले यांच्या भेटी घेऊन डॉ. संततुकराव हंबर्डे यांनी मतदान करण्याची विनंती केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कालच पाठीवर हात देऊन खासदार म्हणून संसदेत या असा आशीर्वाद दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आशीर्वाद सोबतच तुम्हा सर्वांचे आशीर्वाद ही आमच्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. आपल्या प्रत्येकाचा एक एक आशीर्वाद हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही आशीर्वाद असणार आहे. त्यामुळे सर्व मतदारांनी यावेळी लोकसभेसाठी कमळ आणि विधानसभेसाठी कमळ , धनुष्यबाण आणि घड्याळ या निवडणूक निशाणी समोरील बटन दाबून महायुतीला प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

## संक्षिप्त वृत्त

### खर्चाची दुसरी १३ नोव्हेंबरला तपासणी


**नांदेड**-लोकसभा पोट निवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी उमेदवारांनी नियमित व निर्धारित कालावधीमध्ये आपला खर्च सादर करणे आवश्यक आहे. यासाठी होणाऱ्या तपासणीसाठी उपस्थित राहणे अनिवार्य असते. अशा तपासणीला अनुपस्थित राहणाऱ्या पाच उमेदवारांना निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी नोटीस बजावल्या आहेत. ७ नोव्हेंबर रोजी उमेदवारांसाठी पहिली तपासणी ठेवण्यात आली होती. दुसरी तपासणी १३ नोव्हेंबर तर तीसरी तपासणी ही १७ नोव्हेंबरला होणार आहे. लोकसभेप्रमाणेच प्रत्येक विधानसभा क्षेत्रामध्ये निवडणूक निर्णय अधिकारी स्तरावर अशा तीन तपासणी आयोजित केल्या आहेत. ७ नोव्हेंबर रोजी नियोजन भवन येथे लोकसभा पोट निवडणूक तसेच ८६-नांदेड उत्तर व ८७-नांदेड दक्षिण विधानसभा क्षेत्रासाठी तपासणी संपन्न झाली तर जिल्ह्यातील अन्य विधानसभा क्षेत्रासाठी क्षेत्रनिहाय तपासणी झाल्या आहेत. ७ नोव्हेंबरला झालेल्या तपासणीला खर्च निरीक्षक मृणालकुमार दास तसेच मयंक पाण्डेय यांची उपस्थिती होती. निवडणूक बँक खात्यामधूनच प्रत्येक उमेदवाराने खर्च करावा. केलेल्या खर्चाचा हिशेब तपासणीसाठी सादर करावा अशी सूचना त्यांनी केली. जिल्ह्याचे खर्च विभागासाठी नोडल अधिकारी असणारे डॉ. जनार्दन पक्काने यांनी दिलेल्या माहितीनुसार लोकसभेच्या १९ उमेदवारांपैकी या बैठकीला १४ उमेदवार उपस्थित होते तर ५ उमेदवार अनुपस्थित होते. अनुपस्थितांमध्ये बुलंद भारत पार्टीच्या कल्पना गायकवाड, राष्ट्रीय समाज पक्षाचे गंगाधर भांगे, नवरंग काँग्रेस पार्टीचे सय्यदा सय्यद, अपक्ष उमेदवार चालिका चंद्रशेखर, अपक्ष उमेदवार यादव धोंडीबा सोनकांबळे यांचा सहभाग होता. या उमेदवारांना ४८ तासात खर्चाचा अहवाल सादर करण्याची नोटीस बजावण्यात आली आहे.

### प्रचारामध्ये महिला संदर्भात आक्षेपार्ह टिप्पणी नको बालकांचा वापर ही नको

**नांदेड**-भारत निवडणूक आयोगाने आचारसंहितेमध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे निवडणूक प्रचारादरम्यान महिलांचा सन्मान राखला गेला पाहिजे. प्रचारादरम्यान महिलांसंदर्भात कोणतीही आक्षेपार्ह टिप्पणी करण्यात येऊ नये, तसेच मुलांचा वापर प्रचारामध्ये कुठेही होणार नाही. याची सर्व राजकीय पक्षानी तसेच उमेदवारांनी काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक प्रचाराच्या अंतिम टप्प्यात येत असून अशा वेळी प्रचारासंदर्भातील आदर्श आचारसंहितेचे पालन करणे अत्यावश्यक आहे. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी आज या संदर्भात प्रशासनातर्फे सर्व उमेदवारांना तसेच राजकीय पक्षांना याबाबत सूचना केली आहे. अनेक ठिकाणी प्रचारामध्ये शाळकरी मुलांचा किंवा लहान मुलांचा अनावधानाने वापर केला जातो मात्र हा आचारसंहितेचा भंग ठरतो. यासंदर्भात तक्रारी आल्यास त्यावर कारवाई केली जाते. त्यामुळे उमेदवारांनी आपल्या प्रचारामध्ये कुठेही लहान मुलांचा वापर होणार नाही, याची काळजी घ्यावी. उमेदवारांनी प्रचारादरम्यान आपली उपलब्धी आपले भविष्यातील नियोजन सांगताना कुठेही महिलांबाबत आपत्तीजनक टिप्पणी अजानतेपणे का होईना सार्वजनिक होणार नाही, याची काळजी घ्यावी. महिलांसंदर्भातील अनावश्यक टिप्पणी, अनादर अपमानजनक शब्द, लज्जा निर्माण होईल असे शब्द वापरल्यास आचारसंहिता भंग केल्याचे गुन्हे दाखल करण्याचे निर्देश आयोगाने दिले आहे. त्यामुळे यासंदर्भात काळजी घ्यावी. असे आवाहनही त्यांनी केले आहे.

### चंदरबाई गजभारे यांचे निधन

**नांदेड**-नायगाव तालुक्यातील टेंभुर्णी येथील ज्येष्ठ नागरिक उपासिका चंद्ररबाई संतराम गजभारे यांचे शनिवार दि. ९ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी वयाच्या ७० व्या वर्षी त्यांचं दुःखद निधन झाले .त्यांच्या पश्चात चार मुलं व तीन मुली आणि नातू नातवंड असा मोठा परिवार आहे व त्यां वंचित बहुजन युवा आघाडीचे प्रकाश वाघमारे यांच्या आत्या होत.



# प्रा.रविंद्र चव्हाणांना दिल्ली तर मिनलताईंना मुंबईला पाठवा: माजी मंत्री अमित देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. १० नोव्हेंबर**



महायुतीचे सरकार भ्रष्टाचारी असून फोडाफोडीचे राजकारण करून कोणत्याही समाजातील धर्मगुरुचा अवमान करणारे सरकार असून या सरकारच्या काळात दलालाचा सुळसुळाट झाला आहे. हे थांबवयाचे असेल तर महाविकास अघाडीच्या पाठीमागे उभा राहून प्रचंड मतधिक्याने लोकसभेचे उमेदवार रविंद्र चव्हाण यांना दिल्ली ला तर विधानसभेच्या उमेदवार डॉ. मिनलताई खतगावकर यांना मुंबईला पाठवा असे आवाहन माजी मंत्री अमित देशमुख यांनी केले.

यावेळी माजी खासदार भास्करराव खतगावकर, नांदेड लोकसभा उमेदवार रविंद्र चव्हाण, नायगाव विधानसभा उमेदवार डॉ. मिनलताई खतगावकर, माजी राज्यमंत्री माधवराव किन्हाळकर, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, माजी सभापती शिरीष देशमुख गोरठेकर, मध्यवती जिल्हा बँक संचालक कैलास गोरठेकर, वंगलवार, जेष्ट प्रवक्ते सदाशिव पुपुलवाड, गणेश गाढे, रेखाताई गोळेगावकर, कांताबाई पुदलवाड कॉग्रेस तालुकाध्यक्ष प्रल्हाद इज्जतगावकर, भास्कराव भिलवंडे, मनोज जामगावकर, शिवसेना तालुकाध्यक्ष बालाजी सावंत गोरठेकर आदी उपस्थित होते. पुढे बोलताना अमित देशमुख म्हणाले महायुती सरकार म्हणजे गुजराती आहे तर महाविकास अघाडी सरकार हे महाराष्ट्राचे आहे. महाविकास आघाडीच्या शंभर खासदार पैकी एक विशेष खासदार म्हणून दिल्लीत वंसतराव चव्हाणाची ओळख झाली होती. आज ही दिल्ली दुसऱ्या वसंतराव चव्हाणाची वाट पहातेय ते म्हणजे रविंद्र पाटील चव्हाण यांची म्हणून मुद्दाम सांगावसे वाटते की स्व. वसंतराव चव्हाण यांचे उर्वरित स्वप्न रविंद्र पाटील चव्हाणच करू शकतात म्हणून त्यांना दिल्लीला पाठवा दुसरे नायगाव विधानसभेचे उच्चशिक्षीत उच्चभुषित डॉ. मिनलताई खतगावकर यांना राजकीय वारसाचा, विकासाचा अनुभव असल्याने त्या प्रामाणिक कामकरतीलच या दोन्ही लोकसभा, विद्यानसभा मतदार संघातील उमेदवार यांचा कॉग्रेसच्या पंजा या निशानीवर बटन दाबून प्रचंड मतानी विजयी करा असे ठणकावून सांगितले.

विशेषतः विलासराव देशमुख सरकारला गोरठेकर घरण्यानी बिनशर्थ पाठींबा दिला होता त्या बदल गोरठेकर घराण्याचे आभार मानले आणि महाविकास आघाडीचे सरकार आल्यावर विशेष सरकार मध्ये संधी उपलब्ध करून देण्यात येईल असे ही अश्वासन गोरठेकर घराण्याला दिले आहे. माजी खासदार भास्करराव यांनी अमित देशमुख यांना भावी मुख्यमंत्री म्हणून संबोधीत केले आहे. यावेळी उमरी, धर्माबाद, नायगाव तालुक्यातील महाविकास आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ॲड. निळकंट यांनी केले. तर प्रस्ताविक शिरीष देशमुख गोरठेकर यांनी केले आहे.

# मी खास दत्तासाठी आलो; शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे दत्ता पाटील कोकाटे यांना बळ

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १० नोव्हेंबर**



मी खास दत्ता कोकाटे यांच्यासाठी नांदेड येथे आलो आहे. अशा शब्दात शिवसेना पक्षप्रमुख तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शिवसेना सह संपर्कप्रमुख दत्ता पाटील कोकाटे यांच्या पाठीवर हात ठेवून बळ दिले. त्यामुळे शिवसेनेत नव चैतन्य संचारले आहे. एका सच्चा कार्यकर्त्याच्या पाठीशी मातोश्री आणि पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आपले बळ उभे केल्याने दत्ता कोकाटे यांचे राजकीय भविष्य उज्वल होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख दत्ता पाटील कोकाटे यांच्या सिंहगड या संपर्क कार्यालयाला शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी रविवार दिनांक १० नोव्हेंबर रोजी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांच्या समवेत त्यांचे पुत्र तेजस ठाकरे, आमदार मिलिंद नार्वेकर, संपर्कप्रमुख बबनराव थोरात यांची उपस्थिती होती. परभणी येथून मुंबईकडे जाण्यापूर्वी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आसना बायपास येथील दत्ता कोकाटे यांच्या कार्यालयात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. ज्या ज्या ठिकाणी मशाल हे चिन्ह घेऊन आपले उमेदवार निवडणुकीत उभे आहेत त्यांना विजयी करा. ज्या ठिकाणी गद्दार आहेत त्यांना कुठल्याही परिस्थितीत गाडून टाका आणि महाराष्ट्रावर पुन्हा एकदा भगवा फडकवा.असे आवाहन करतानाच मी या ठिकाणी खास करून दत्तासाठी आलोय. सुरुवातीला दत्ता व त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी उमेदवारी मागितली होती. परंतु शिवसेनेची अधिकृत उमेदवारी संगीता विठ्ठल पाटील डक यांना देण्यात आली. शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी उमेदवारीसाठी जशी मागणी केली त्याचप्रमाणे आता संगीता पाटील यांना विजयी करण्यासाठी चढाओढ केली पाहिजे. यावेळी दत्ता पाटील कोकाटे यांनी उद्धव ठाकरे, तेजस ठाकरे यांचे स्वागत केले. दरम्यान नांदेड उत्तर मधून शिवसेनेकडून इच्छुक असलेले दत्ता पाटील कोकाटे यांनीही निवडणुकीसाठी उमेदवारी मागितली होती मात्र काही तांत्रिक अडचणीमुळे कोकाटे यांच्या ऐवजी संगीता डक यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्यात आली आहे. त्यानंतरही कोकाटे यांच्या पाठीशी पक्षाने बळ उभी केले असून मातोश्री आणि उद्धव ठाकरे यांनी आगामी काळात दत्ता पाटील कोकाटे यांच्या राजकीय पुनर्वसनासाठी निश्चितपणे पुढाकार घेतील अशी चर्चा सुरू आहे.

# शेतकऱ्याची कर्जमाफी करणार: एकनाथ शिंदे



**तभा वृत्तसेवा**
**हिमायनगर,दि. १० नोव्हेंबर**

हिमायतनगर येथील दिनांक ९ नोव्हेंबर रोजी परमेश्वर मंदिर प्रगनाथ मध्ये महायुतीचे उमेदवार बाबुराव कोळेकर यांच्या प्रचार सभेला माननीय मुख्यमंत्री यांनी संबंधित केले यावेळी राज्य शासनाने लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून दिवाळीची ओवाळनी दिली. लाडक्या बहिणीची योजना बंद करण्यासाठी विरोधक मात्र कोर्टात गेले परंतु तेथे त्यांची डाळ शिजली नाही म्हणून या सावत्र भावाला त्याची जागा दाखवून देण्याची वेळ आली आहे. हदगाव व हिमायतनगरला एमआयडीसी मंजूर करून देतो तसेच शेतकऱ्याची कर्जमाफीचा निर्णय घेणार असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. पुढे मुख्यमंत्री बोलताना म्हणाले उबाटाच्या लोकांनी सत्तेच्या मोहापायी धनुष्यबाण काँग्रेसकडे गहाण ठेवला होता आम्ही बाळासाहेबांच्या विचारांना तडा जाऊ देणार नाही शिवसेनेचा धनुष्यबाण आम्ही सोडून आणला बाळासाहेबांच्या हिंदुत्वाचा जागर करत आहोत. हेच उबाटावाल्यांना सहन होत नाही हे सर्व योजना शाबुत ठेवण्यासाठी महायुतीला साथ द्यावी असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आवाहन केले.

यावेळी हिंगोलीचे माजी खासदार हेमंत पाटील, बाबुराव कोळेकर, गोपाळ भाऊ सारडा, अक्षय महाराज भोसले, विकास पाटील देवसरकर, विजय वळसे, सुधाकर भोयर, प्रतापराव देशमुख सरसमकर, माजी खासदार वानखेडे, सचिन भाऊ साठे, गुणवंत पाटील हंगरगेकर, गजानन चायला, अभिषेक लुटे, राम सूर्यवंशी यास अनेक जण उपस्थित होते.

# ॲड. बाळासाहेब आंबेडकरांचा विश्वास अखेरपर्यत टिकून ठेवणार: सुरेश राठोड


**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. १० नोव्हेंबर**



वंचित बहुजन आघाडीचे भोकर विधानसभेचे अधिकृत उमेदवार सुरेश टिकाराम राठोड आणि नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीचे अधिकृत उमेदवार अँड अविनाश भोसीकर यांची मुदखेड शहरात पहिलीच पत्रकार परिषद दि.९ नोव्हेंबर रोजी महात्मा फुले चौक भोकर रोड येथील प्रचार कार्यालयात घेण्यात आली. भोकर विधानसभेचे उमेदवार सुरेश राठोड यांनी सांगीतले आहे कि वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रध्येय बाळासाहेब आंबेडकर यांनी माझ्यावर विश्वास टाकला आहे तो विश्वास अखेरपर्यत टिकुन ठेवणार आहे आणि मला विश्वास आहे की भोकर मतदारसंघातील नागरिकही वंचित बहुजन आघाडीला साथ देतील. यानंतर नांदेड लोकसभेचे अधिकृत उमेदवार अँड अविनाश भोसीकर यांनी सांगीतले कि नांदेड जिल्ह्या मध्ये एक अपवाद वगळता कुठल्याच पक्षाने ओबीसी घटकाला उमेदवारी दिली नाही पण श्रध्येय बाळासाहेबांनी भोकर विधानसभा व नांदेड लोकसभा दोन्ही ठिकाणी ओबीसी चेहरे दिले आहेत बाळासाहेबांनी प्रत्येक समाज घटकाला उमेदवारी दिली आहे प्रस्तापित लोकांना त्रस्त झालेत त्यांची आहे वंचित बहुजन आघाडी व्यापाऱ्यासाठी आहे वंचित बहुजन आघाडी असे लोकसभेचे अधिकृत उमेदवार अँड अविनाश भोसीकर यांनी माध्यमांशी बोलताना सांगीतले आहे. यानंतर शहरातील बौद्ध संस्कार प्रशिक्षण केंद्र येथे तथागत भगवान गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची पुष्प पुजा धुप पुजा करून प्रचाराला सुरुवात करण्यात आले. तसेच बौद्ध प्रशिक्षण केंद्र येथुन शहरातील मुख्य मार्गाने भव्य रॅली काढण्यात आली मठ गल्ली येथील श्री अपरंपार मठात दर्शन घेतले भुयारी मार्गाने जात महापुरुषांना पुष्पहार अर्पन करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजीत पुतळ्याच्या ठिकाणी सभा घेण्यात आली. यावेळी रमेश राठोड, नंदन नांगरे, अमर हत्तीअंबीरे पालमकर, रामराव ढवळे, मोहन कांबळे, डी जी चौदंते, बाबुराव कोलते, तात्या चौदंते, विनोद वंजारे, रोहन चौदंते, राजू चावरे, यश कांबळे, यासह वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते व महिलांची आणि युवकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# रांगोळी स्पर्धेच्या माध्यमातून नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १० नोव्हेंबर**





लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या निमित्ताने जिल्हा प्रशासन कक्ष व उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा नांदेडच्यावतीने मतदान जनजागृती उपक्रम मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी रांगोळी स्पर्धा आज श्री गुरुगोविंदसिंघजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नांदेड च्या प्रांगणात आयोजित करण्यात आली होती.

रांगोळीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील मतदानाचा टक्का वाढला पाहिजे. सर्व महिलानी मतदान केले पाहिजेत यासाठी रांगोळीमध्ये वेगवेगळे स्लोगनच्या माध्यमातून प्रचार प्रसिद्धी करण्यात आली. त्याचबरोबर सेल्फी पॉईंट देखील या ठिकाणी उभारण्यात आले होते. यावेळी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत तसेच जिल्हा स्वीप प्रमुख तथा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी जिल्ह्यातील नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन केले.

या स्पर्धेचे आयोजन प्रकल्प संचालक डॉ .संजय तुबाकले यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले.यावेळी स्वीप कक्ष शिक्षणाधिकारी माध्यमिक माधव सलगर, शिक्षणाधिकारी प्राथमिक डॉ.श्रीमती सविता बिरगे, उमेद जिल्हा अभियान व्यवस्थापक गजानन पातेवार, गणेशसिंह चंदेल, जिल्हा समुपदेशक बालासाहेब कच्छवे ,जिल्हा व्यवस्थापक गणेश कवडेवार, माधव भिसे, तालुका अभियान व्यवस्थापक धम्मपाल ढवळे, गणेश आरोटले, तालुका व्यवस्थापक मल्लेश एडके, इरवंत सूर्यकार, श्रीमती कांता ताटे, प्रभाग समन्वयक श्रीमती वैशाली कोतवाले, निलेश जोंधळे, विनोद लोहोकरे तसेच जिल्हा कौशल्य समन्वयक अतिष गायकवाड, तालुका कौशल्य समन्वयक बालाजी गिरी तसेच लेखापाल हणमंत कंदुरके व उमेद अभियानाचे कर्मचारी तसेच ग्रामीण भागातून आलेल्या महिला स्वयं सहाय्यता समूहातील महिला स्पर्धक सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालासाहेब कच्छवे यांनी केले.

**जाहिर प्रगटण**

आमचे पक्षकार श्री जीवन पि. केशवराव लाडेकर, वय ४१ वर्षे, धंदाः नौकरी रा. मुक्ताई-नगर, कंधार ता. कंधार जि. नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारा वरुन जाहिर प्रगटण देण्यात येते की,

मौ व ग्रा.प. विजेवाडी ता. कंधार जि. नांदेड येथील शेत सर्वे नं.४/११/सी मधील वर्षा पि. गुलाबसिंग राठोड (वर्षा भ्र. मनोज जाधव) यांच्या मालकी व ताब्यातील १ हे.७१ आर जमीन आहे त्यापैकी ० हे.६० आर जमीन फक्त. ज्याची चतुःसिमाःपुर्वेसःश्री अनिल भागवतराव वट्टमवार व नारायण केरबा फुलवळे यांचा मिळुन असलेला शेताचा सामाईक रस्ता व अनिल भागवतराव वट्टमवार यांचे शेत, पश्चिमेसः अशोक बाबाराव लुंगारे व बालाजी बाबाराव लुगारे व सौ. गंगासागर विठ्ठल लुंगारे यांचे शेत, दक्षिणेसः श्री गोविंद नारायण फुलवळे यांचे शेत व उत्तरेस : लोहा-मुखेड राज्य रस्ता अशी आहे.

वरील चतुःसिमेच्या आतील शेत हे आमचे पक्षकार यांनी सदरील शेताचे मालक व ताबेदार वर्षा पि.गुलाबसिंग राठोड (वर्षा भ्र. मनोज जाधव)रा. छत्रपती संभाजीनगर ता.जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) यांच्या कडुन कायमस्वरुपी खरेदी घेण्याचा करार दिनांक ०९.१०.२०२४ रोजी करुन घेतला आहे व बयाना पोटी कांही रक्कम त्यांना पंचासमक्ष दिली आहे व उर्वरीत रक्कम दि.५.१२.२०२४ रोजी पर्यंत देवुन सदरील शेताचे नोंदणीकृत खरेदीखत करुन घेण्याचे ठरले आहे.

तरी या जाहिर प्रगटणाद्वारे सुचीत करण्यात येते की, सदरील चतुःसिमेच्या आतील शेत आमचे पक्षकारांनी नोंदणीकृत खरेदीखताद्वारे खरेदी घेतल्यास कोणाचाही आक्षेप असल्यास सदरील प्रगटण जाहिर झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत वरील पत्यावर किंवा आमचे पक्षकारास कळवावे. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपास आमचे पक्षकार बांधील राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहिर प्रगटण देण्यात येत आहे.

**दिनांक :- ०९/११/२०२४**
**तर्फे,**
**ॲड.डि.जी. महाजन**
**कंधार**

**जाहिर प्रगटण देणार**
**जीवन पि. केशवराव लाडेकर,**
**रा. मुक्ताईनगर, कंधार ता. कंधार जि. नांदेड**
**मो.नं. ९७३०५७४०९०**

# सिद्धेश्वर सहकारी कारखाना उध्वस्त करणाऱ्यांना त्याची जागा दाखवा : अब्दुल सत्तार

सिल्लोड प्रतिनिधी : सिद्धेश्वर महाराजांच्या नावाने तालुक्यात असलेला सहकारी साखर कारखाना उद्ध्वस्त करणाऱ्यांना त्यांची जागा दाखवा असा घणाघात शिवसेना महायुतीचे उमेदवार अब्दुल सत्तार यांनी विरोधकांवर केला. कारखाना विकणारे कोण होते असा सवाल करीत ते आज विधानसभा लढत आहेत अशा लोकांना त्यांची जागा दाखवा असे स्पष्ट करीत येत्या २० तारखेला धनुष्यबाण निशाणीवर मतदान करण्याचे आवाहन शिवसेना महायुतीचे उमेदवार अब्दुल सत्तार यांनी केले.

शिवसेना, महायुतीचे उमेदवार अब्दुल सत्तार यांच्या प्रचारार्थ घाटनांद्रा सर्कलच्या विविध गावांमध्ये प्रचार सभा, कॉर्नर सभा व पदयात्रा संपन्न झाल्यात यावेळी मतदारांना संवाद साधतांना ते बोलत होते.

पुढे बोलत असताना ना. अब्दुल सत्तार यांनी मतदारसंघात जवळपास २५ हजार कोटी रुपयांचे विकास कामे सुरू असल्याचे सांगितले. मतदारसंघाच्या प्रत्येक गावात विकास कामे केली. मात्र विरोधकांना हा विकास दिसत नाही. पाच वर्षे घारात बसणाऱ्यांना विकास कसा दिसेल असा टोला त्यांनी विरोधकांना लगावला.

याप्रसंगी अब्दुल सत्तार यांनी मतदारसंघात केलेल्या सर्वांगीण विकासाचा लेखाजोखा आपल्या भाषणात मांडला. विरोधकांनी त्यांच्या ताब्यात असलेल्या सहकारी संस्था लुटल्या असल्याचा आरोप अब्दुल सत्तार यांनी केला. नॅशनल सहकारी सूतगिरणी, जिनिंग प्रेसिंग, तालुका दूध संघ यांसारख्या सहकारी संस्था आम्ही उभ्या केल्या. तर मार्केट कमिटी, सहकारी जिनिग अशा विविध संस्था सक्षम करण्यासाठी काम केले असल्याचे अब्दुल सत्तार म्हणाले.

याप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा. गाढे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती केशवराव पा. तायडे, माजी सभापती डॉ. संजय जामकर, कौतीकराव मोरे, राजेंद्र ठोंबरे रघुनाथ मोरे, राहुल सपकाळ आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते व पंच क्रोशीतील मतदारांची उपस्थिती होती.

# आयकर विभागाची कार्यवाही निष्फळ संचेती परिवाराला 'क्लीन चिट'

## प्राप्तिकर विभागाची कार्यवाही निष्फळ; बाळासाहेब संचेती यांचा पत्रकार परिषदेत दावा



वैजापूर : प्राप्तिकर विभागाने गेल्या बुधवारी वैजापूर शहरातील नावाजलेले व्यावसायिक तथा काँग्रेसचे नेते बाळासाहेब संचेती यांच्या वैजापूर अर्जंट को-ऑपरेटिव्ह बँकेसह घर व अन्य प्रतिष्ठानांवर छापे टाकून कार्यवाही केली. या कार्यवाहीत आपण प्राप्तिकर विभागाला पुर्णपणे सहकार्य करुन त्यांना हवी असलेली सर्व माहिती व कागदपत्रे दिली आहेत. मात्र या तपासणीत प्राप्तिकर विभागाला कुठलाही गैरव्यवहार आढळला नसुन त्यांनी बँकेचे कामकाज व अन्य प्रतिष्ठानाचे व्यवहार सुरू करण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे वैजापूर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेचे सर्व व्यवहार आता सुरळीतपणे सुरू आहेत अशी माहिती बँकेचे चेअरमन बाळासाहेब संचेती यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली. मोंढा मार्केट परिसरात असलेल्या संचेती फायनान्सच्या कार्यालयात आयोजित या पत्रकार परिषदेला माजी चेअरमन विशाल संचेती व बँकेचे संचालक सौरभ संचेती उपस्थित होते. बाळासाहेब संचेती यांचे वडील दिवंगत बन्सिलाल संचेती यांनी लावलेले मर्चंट बँकेचे ईवलेसे रोप आता वटवृक्षात रूपांतर झाले असून या बँकेत जवळपास सहाशे कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. ग्राहकांच्या विश्वासामुळेच मागील अनेक वर्षांपासून ही बँक बाळासाहेब संचेती यांच्या नेतृत्वाखालील संचालक मंडळाच्या ताब्यात बिनविरोध असून बँकेचा प्रगतीचा आलेख चढता आहे असे संचेती म्हणाले. संचेती यांचे बँकेसह अन्य व्यवसाय असून भागीदारी आहे. याशिवाय स्वतःचा शेती व्यवसाय देखील आहे. ते म्हणाले, एटीआय (ऍडजेस्टेबल टॅक्स इन्कम) योजनेअंतर्गत मागील काही वर्षांपासून गरिबांसाठी घरे बांधून देण्याचे काम सुरू आहे. या योजनेअंतर्गत करदात्याला करा मध्ये काही प्रमाणात सूट मिळते. शिवाय मागील काही वर्षात शेतीउत्नातही वाढ झाली. तथापि पुरेशा प्रमाणात कर मिळत नसल्याने प्राप्तिकर विभागाने ही कार्यवाही केल्याची शक्यता त्यांनी वर्तवली. याबाबत सीए मार्फत उत्तर देण्यात येईल असे बाळासाहेब म्हणाले. या कार्यवाहीची माहिती देतांना बाळासाहेब म्हणाले कि छाप्याच्या कार्यवाहीत घरातील सदस्यांना स्थानबद्ध करुन चौकशी करण्यात आली.त्याचप्रमाणे बँकेतील नातेवाईकांचे दोन लॉकर्स व स्ट्राँग रूमचीही तपासणी करण्यात आली. तसेच बँकेतील आमच्या खात्यांची तपासणी केली. मात्र यात काही आढळून आले नाही. ही कार्यवाही राजकीय हेतूने प्रेरित आहे का यावर भाष्य करण्यास बाळासाहेब यांनी टाळले. दरम्यान, दोन दिवसात बँकेतून ग्राहक आणि पाच ते सहा कोटी रुपये काढले असले तरी भरणा देखील सुरू असून बँकेचे सर्व व्यवहार सुरळीतपणे सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ठेवीदारांचा विश्वास आजही कायम आहे असे ते म्हणाले.

कार्यवाहीचा ' राजकिय अँगल '

सध्या विधानसभा निवडणुकीचा प्रचार जोरात सुरू असून या प्रचारात महाविकास आघाडीचे उमेदवार असलेले डॉ . दिनेश परदेशी यांचे निकटवर्तीय बाळासाहेब संचेती हे मागील काही दिवसांपासून वैजापूर तालुक्यातील नांदूर मधवेश्वर कालव्यावरील पाणी आरक्षणाचा प्रश्न तसेच अन्य समस्यांवर लक्ष वेधून लोकप्रतिनिधींवर टीका करत आहे. या पार्श्वभूमीवर त्यांच्यावर कार्यवाहीचा बडगा उगारला गेला काय यावर ठामपणे बोलण्यास बाळासाहेब संचेती यांनी नकार दिला. असे असले तरी प्रचाराच्या पुढील आठ दिवसात आपण प्रचारात सहभागी होणार असून पुन्हा बोलणार आहोत. टीका करणे हा राजकारणाचा भाग असल्याने त्याचा व प्राप्तिकर विभागाच्या कार्यवाहीशी कोणीही संबंध जोडू नये असे सुतोवाच त्यांनी पत्रकार परिषदेत केले.

# गंगापूरात मतदार जनजागृती अभियान



तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१० नोव्हेंबर : मतदानासाठी टक्केवारी वाढावी यासाठी मतदार जनजागृती कक्ष स्वीप १११ कक्षाच्या वतीने गंगापूर खुलताबाद मतदारसंघात जनजागृती करण्यात येत आहे . निवडणूक निर्णय अधिकारी डॉ . सुचिता शिंदे , तहसिलदार नवनाथ वगवाड , स्वरूप कंकाळ , स्वीप नोडल अधिकारी समाधान आराख , विलास केवट यांच्या मार्गदर्शनात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे .

जनजागरण रॅली , संकल्प पत्र लेखन , रांगोळी स्पर्धा , वक्तृत्व स्पर्धा ,निबंध स्पर्धा , पथनाट्य , प्रबोधनपर भारुड व लोकशाही दिंडी या उपक्रमांच्या माध्यमातून प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजावला पाहिजे असे आवाहन करण्यात येत आहे . गोंधळी गोंधळी आम्ही लोकशाहीचे गोंधळी , चल रे मित्रा चला रे दोस्ता मतदान करुया ,गोमू संगतीने मतदानाला येशिल का, आली निवडणूक विधानसभेची, बुरगुंडा होईल गं अशा प्रबोधनात्मक गीतांमधून खुलताबाद, गंगापूर, जामगाव, वाळूज, रांजणगाव, शिल्लेगाव, लासूर स्टेशन इत्यादी ठिकाणी जनजागृती करण्यात आली आहे.

स्वीप सदस्य जनार्दन राऊत , कडुबा हारदे ' दादासाहेब गावंडे , सागर घोणशेट्टे , सदाशिव बागडे ' कल्याण राऊत ' हरिश्चंद्र खोसे ' प्रदिप जाधव ' सचिन वालतुरे ' अश्विनी महाले ' गायत्री परदेशी ' उज्वला ठोंबरे , मिरा गायकवाड हे सदस्य जनजागृतीचे कार्य करीत आहेत.

# स्वातंत्र्यवीर सावरकरांना शिव्या घालणाऱ्या हाताला निवडून देणार का? - राज ठाकरे



पुणे, १० नोव्हेंबर : आमच्या छत्रपतींचा अपमान आमच्याच महाराष्ट्रात करणार्या लोकांना तुम्ही निवडून देणार का? महाराष्ट्रात येऊन स्वातंत्र्यवीर सावरकरांना शिव्या घालणार्या हाताला निवडून देणार का? असे प्रश्न उपस्थित करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी मतदारांना साद घातली. पुण्यातील कसबा मतदारसंघातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) उमेदवार गणेश भोकरे यांच्या प्रचारार्थ आयोजित आज जाहीर सभेत ठाकरे बोलत होते. फडके हौद चौकात झालेल्या सभेवेळी मनसेचे नेते व प्रवक्ते अविनाश अभ्यंकर व अनिल शिदोरे, उमेदवार गणेश भोकरे, मनसेचे प्रदेश सरचिटणीस रणजित शिरोळे व ॲड. गणेश सातपुते, मनसे नेते राजेंद्र ऊर्फ बाबू वागस्कर, महिला सेनेच्या शहराध्यक्षा वनिता वागस्कर आदी उपस्थित होते.

केवळ मेट्रो आणि उड्डाणपूल झाले म्हणजे शहराचा विकास होत नाही. येथील आमदार, खासदार निवडून येतात, त्यांच्याकडे कोणतेही व्हिजन नाही, नियोजन नाही. परिणामी शहराचा बोजवारा उडाला आहे. आपण शिक्षित-अशिक्षित आहोत का यापेक्षा आपण सुज्ञ आहोत का, याचा विचार होणे ही आजच्या काळाची गरज आहे मात्र, आपण आपला इतिहास, स्वाभिमान विसरलो आहोत. केवळ जय भवानी, जय शिवाजी अशा घोषणा देऊन चालणार नाही, तर इतिहास समजून घेऊन तो जपण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असेही ठाकरे म्हणाले.

# छत्रपती संभाजीनगरच्या बिअरची चव आता देशाच्या राजधानीपर्यंत




छत्रपती संभाजीनगर- गेल्या पंधरा वर्षांपासून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचलेल्या छत्रपती संभाजीनगरच्या 'कांगारू' बिअरची चव आता देशाच्या राजधानीपर्यंत पोहोचली आहे. राजधानी दिल्लीत गेल्या काही महिन्यांपासून 'कांगारू बिअर' विक्रीसाठी उपलब्ध करवून देण्यात आली असून ग्राहकांनी या बिअरला चांगलीच पसंती दिली असल्याचे पाहायला मिळत आहे.

वाळूज एमआयडीसीतील लीला सन्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे उत्पादन असलेल्या 'कांगारू बिअर' अतिशय स्मूथ आणि तितकीच चवीला आकर्षक आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात सहजपणे उपलब्ध होणारी कांगारू १०००० या बिअरला ग्राहक प्रथम पसंती देतात. बिअरच्या उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल आणि पाणी याचा सर्वोत्तम संयोग जुळवून बनवलेल्या 'कांगारू बिअर'च्या स्ट्राँग आणि माईल्ड या दोन्ही प्रकारांना चांगलीच मागणी असते.

महाराष्ट्रभर 'कांगारू बिअर'ने आपला खास ग्राहकवर्ग तयार केला असताना आता देशाची राजधानी दिल्लीत ही बिअर ग्राहकांना उपलब्ध करवून देण्यात आली आहे. विशेष म्हणजे पहिल्या दिवसापासून ग्राहकांनी या नव्या चवीला आपली पसंती दिली आहे. दिल्लीच्या सर्व भागांमध्ये 'कांगारू १००००' बिअर मिळत असून ग्राहकांनी भरभरून प्रतिसाद दिला असल्याचे पाहायला मिळत आहे.

'कांगारू बिअर' हा ब्रँड महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचवला असून आम्ही थेट राजधानी दिल्लीत जाऊन ग्राहकांना आपल्या ब्रँडकडे आकर्षित करण्यात यशस्वी ठरत आहोत. दिल्लीतील ग्राहकांनी 'कांगारू बिअर' चवीला खूप छान व स्ट्राँग असल्याच्या प्रतिक्रिया दिल्या, अशी माहिती लीला सन्सचे संचालक केशव लीलाजी यांनी दिली.

# भोकर मतदारसंघात अपक्ष उमेदवारांची भुमिका महत्वाची

**तभा वृत्तसेवा**

**अर्धापूर,दि. १० नोव्हेंबर**

भोकर मतदारसंघात अंतिम २५ उमेदवार रिंगणात उभे असून प्रथम लढत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी होणार असल्याचे चित्र असतांना यात अपक्ष म्हणून शेख जाकेर, संतोष गव्हाणे यांची भूमिका महत्वाची ठरणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

भोकर मतदारसंघ पूर्वी काँग्रेसचा गड समजला जायायच्या परंतु माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण भाजपात गेले त्यामुळे काँग्रेस आघाडीला लगाम लागला. भोकर मतदारसंघात होणाऱ्या प्रमुख लढतीतील चार उमेदवार हे अर्धापूर तालुक्यातील आहेत.हि निवडणूक भाजप - काँग्रेस अशी सरळ लढत होण्याची परिस्थिती होती.परंतू यात सामाजिक क्षेत्रासह संघटनात्मक कामगिरी करणारे संतोष गव्हाणे हे अपक्ष उमेदवार म्हणून रिंगणात उभे आहेत.याचा फटका लोकसभेला आघाडी घेतलेल्या महाविकास आघाडीला बसण्याची शक्यता नाकरता येत नाही. तसेच सामाजिक कार्यकता म्हणून परिचित तथा अल्पसंख्यांक प्रतिनिधी म्हणून ओळखले जाणारे शेख जाकेर हे देखील अपक्ष निवडणूक लढवीत आहेत. या निवडणुकीत दोन्ही अपक्षांच्या भूमिकेकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. मागील लोकसभा निवडणूकीत काँग्रेस ला काही ठिकाणी लाभ मिळाला होता परंतू आता थेट माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वा खाली भाजप ची निवडणूक होत आहे.शिवाय दोन्ही अपक्ष उमेदवारांचा जनसंपर्क हा तगडा समजला जातो या फटका काँग्रेस ला बसण्याची शक्यता असल्याचे बोललं जात आहे. शेवटी सुजाण मतदार आपले मत कोणाच्या पारड्यात टाकणार हे अंतिम निकालावरचं स्पष्ट होणार.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सिल्लोड यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३९८ / २०२४

१/- जमोद्दी महेबूव शहा, वय ८४ वर्ष, धंदा घरकाम, रा. सिल्लोड, ता. सिल्लोड, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २/- गणी शहा मेहेबूव शहा, वय ४० वर्ष, धंदा व रा. वरीलप्रमाणे. ३/- नाजेर शहा मेहेबूब शहा, वय ३७ वर्ष, धंदा व रा. वरीलप्रमाणे. ४/- शकेर शहा मेहेवूव शहा, वय २८ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरूद्ध

महाराष्ट्र सरकार मार्फत जिल्हाधिकारी

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे वावत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. राजेश अ. गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत बद्रोदिन शर्कोद्दिन रूज तूळनिसा यांचा दि. १०/१०/१९६९ रोजी मौजे डकला, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क. १ ते ४ हे वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क. १ ते ४ हे मयत बद्रोदिन शर्फोद्दिन रूज तूळनिसा यांचे वारस असुन त्यांना मयत बद्रोदिन शर्मोद्दिन रूज तूळनिसा यांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आजरोजी दि. ४/१/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे. पु. ता. ७/११/२०२४

आदेशावरुन

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सिल्लोड)

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | | | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | 91- Mukhed | Tushar Govindrao Rathod | | | | | |
| | | | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

**Name of constituency : 91- Mukhed**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 90 - Deglur (S.C.) | Jitesh Raosaheb Antapurkar | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

**Name of constituency : 90 - Deglur (S.C.)**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 85 - Bhokar | Sreejaya Ashok Chavan | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

**Name of constituency : 85-Bhokar**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापनेची पृष्ठभूमी

## विशेष

**रवींद्र माधव साठे**

१९२५ च्या विजयादशमीस डॉ. हेडगेवार यांनी नागपूर येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. त्यावेळी लोकांनी संघाचे आकलन वेगवेगळ्या पद्धतीत केले. आपल्याकडे हत्ती आणि सहा आंधळ्या माणसांची एक कथा प्रचलित आहे. त्यांत हत्तीचा जो अवयव हातास लागतो, त्यानुसार ती आंधळी व्यक्ती हत्तीचे वर्णन करते. मात्र, प्रत्यक्षात त्यांच्या कल्पनेपेक्षा हत्ती मोठा आहे, हे स्वाभाविकपणे कोणास कळत नाही. त्याचप्रमाणे डॉ. हेडगेवारांच्या संघाकडे लोकांनी आपापल्या चष्म्यातून (Perception) बघितले. काहींना संघ म्हणजे व्यायामशाळा वाटली. काहींनी संघाचे वर्णन अर्धसैनिक दल म्हणून केले. काहींना मुस्लिमांना विरोध करण्यासाठी ते प्रतिक्रिया म्हणून वाटले. काहींनी संघावर ब्रिटिशांचे हस्तक म्हणून आरोप करण्यास मागे-पुढे पाहिले नाही. संघ शाखेचे स्वरूप बघून लोकांनी डॉक्टरांकडून विचित्र प्रकारांच्या अपेक्षा व्यक्त केल्या होत्या. वानगीदाखल पुढील प्रतिक्रिया.

''आपला केशव मोठा कर्तृत्ववान आहे. किती कमी कालावधीत त्याने संघटन उभे केले आणि मोठे केले. त्याच्याबरोबर शिक्षित युवकांचा गट आहे. आपल्या बेबीच्या विवाहात पारंपरिक बँडवाल्याला न बोलावता केशवच्या संघाचाच बँड मागवू.''


''केशवरावांनी नवी व्यायामशाळा का काढली? आमची व्यायामशाळासुद्धा खरे म्हणजे चांगल्या प्रकारे चालली आहे. त्यांना आपण सांगूया की, आपण दोघे मिळून एक उत्तम व्यायाम शाळा चालवूया.''

''आपल्या राजकीय पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन नागपूरमध्ये करण्याचा निर्णय तर आपण घेतला, त्याच्यासाठी लागणारे धनही आपण एकत्रित करू, परंतु याची व्यवस्था करायला व्हॉलंटियर कुठून आणणार? डॉ. हेडगेवारांकडे युवकांचा चांगला गट आहे. त्यांना आपण सांगू की, तुमचे १०० चांगले व्हॉलंटियर गणवेश व बॅज घालून तीन दिवस आमच्या अधिवेशनात पाठवा.''

डॉ. हेडगेवार यांना प्रारंभी लोक असेही विचारत की, ''आपण मुस्लिमविरोधी आहात का?'' डॉक्टर म्हणत, ''नाही.'' मग लोक पुन्हा विचारत, ''तुम्ही ख्रिश्चनविरोधी आहात का?'' डॉक्टर म्हणत, ''नाही.'' लोक विचारत की, ''मग तुम्ही नेमके काय आहात?'' डॉक्टर त्यावर म्हणत की, ''आम्ही हिंदू अभिमुख आहोत. आम्ही ना मुसलमानांच्या विरोधात, ना ख्रिश्चनांच्या विरोधात आहोत तर आम्ही हिंदूंचा विचार करतो.'' डॉक्टरांना संघ स्थापन करण्याची कल्पना अचानक सुचली नाही. त्यांच्या बाल्यकाळापासून नागपुरात घडणाऱ्या राजकीय व सामाजिक घटना, पुढे त्यांचे प्रत्यक्ष क्रांतिकार्य आणि सार्वजनिक कार्यातील त्यांचे अनुभव याच्या आधारे त्यांच्या मनात स्थित्यंतर घडत गेले आणि संघासारखी संस्था निर्माण करण्याचे त्यांनी योजले.

मनुष्याच्या जन्मकाळापासून त्याच्यातील मूळ सहज प्रवृत्ती आणि बाह्य परिस्थिती एकमेकांवर क्रिया-प्रतिक्रिया करत असतात. डॉ. हेडगेवार यांचा परिवार वैदिक संस्कार संपन्न धार्मिक, स्वावलंबी व स्वाभिमानी होता. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श ठेवून चालणारे भोसले यांचे नागपुरातील राज्य, स्वातंत्र्य आंदोलनात आत्मसमर्पण करणारे वीर पुरुष, सीताबर्डीची लढाई, अप्पासाहेब भोसले यांचे असफल षडयंत्र, शनिवार वाड्यावर युनियन जॅक फडकणे, बाबासाहेब नरगुंदकर व उमाजी नाईक यांचा विद्रोह, चंद्रपूरमध्ये व्यंकटराव गौड यांचा सशस्त्र उठाव, चापेकर बंधूंचे आत्मबलिदान, केसरी, काळ, भाला व देशसेवक आदी वर्तमानपत्रांतून देशभक्त पत्रकारांनी केलेले राष्ट्रीय जागरण, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या 'मॅझिनी' व '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' या पुस्तकांचे वितरण आदी घटनांचा डॉक्टरांच्या मनावर परिणाम होणे स्वाभाविक होते. ब्रिटिशांच्या साम्राज्यवादाची त्यांना प्रारंभापासून चीड होती. साम्राज्यवादी भूमिकेशी कोणत्याही प्रकारची सहानुभूती व्यक्त करणे ही मुळात राष्ट्रवादाशी प्रतारणा आहे, असे ते म्हणत. १८९९ मध्ये टिळक युगाचा प्रारंभ झाला. डॉक्टर स्वतः क्रांतिकारी स्वभावाचे होते. १९०२ मध्ये नागपूरमध्ये लोकमान्य टिळकांच्या भाषणामुळे ते प्रेरित झाले. बंगालमध्ये अनुशीलन समितीच्या माध्यमातून क्रांतिकारी चळवळीत त्यांनी सहभाग घेतला, विभिन्न प्रदेशातील क्रांतिकार्यात समन्वय ठेवण्याची त्यांच्याकडे जबाबदारी होती. गंगाप्रसाद पाण्डे, रामलाल वाजपेयी, डॉ. खानखोजे, त्रैलोक्यनाथ चक्रवर्ती, राजगुरू आदी क्रांतिकारकांना डॉक्टरांनी केलेली मदत सर्वविदित आहे.

त्यांच्या क्रांतिकार्याच्या जीवनकाळातच डॉक्टरांचे मन मात्र वेगळ्या निष्कर्षाकडे झुकत होते. क्रांतिकारकांचे हौतात्म्याबद्दल त्यांच्या मनात असीम आदर आणि कृतज्ञता होतीच; परंतु त्याहीपेक्षा जनसामान्यांमध्ये विशुद्ध राष्ट्रभक्तीची भावना स्थायी स्वरूपात जागृत करणे, अनुशासनबद्धता व निःस्वार्थी भाव दृढ करणे, राष्ट्रासाठी क्षणशः आणि कणशः झिजण्याची भावना निर्माण करणे, हेही त्यांच्या दृष्टीने परम आवश्यक होते. डॉक्टर टिळक युगापासूनच काँग्रेसचे सक्रिय कार्यकर्ता होते. त्यांनी हिंदू महासभेचेही काम केले. त्यावेळी काँग्रेसचे स्वरूप एक राजकीय पक्ष म्हणून नव्हे तर ब्रिटिश साम्राज्यविरोधी लढणारा सामायिक मंच होता. पण पुढे काँग्रेसचे स्वरूप बदलत गेले व त्याचा राजकीय पक्ष (दल) झाला. त्याची सर्वसमावेशकत्वाची भूमिका हळूहळू संकुचित आणि संकीर्ण होत गेली. अल्पसंख्य समाजास गोंजारण्याचे राजकारण सुरू झाले. १९०६ साली झालेली मुस्लिम लीगची स्थापना व वसाहतवादी ब्रिटिश शासनाने तिला दिलेले संरक्षण, १९०९ मधील मोर्ले-मिंटो सुधारणा, १९१६ रोजीचा लखनौ करार, १९२२ मध्ये झालेले खिलाफत आंदोलन, असहकार आंदोलनानंतर केरळात झालेले मोपल्यांचे दंगे यामुळे हिंदू राजकारणाच्या आवश्यकतेला एक मजबूत अशी पृष्ठभूमी तयार झाली होती. यांस प्रतिक्रिया म्हणून काही हिंदू संघटनांची निर्मिती त्यावेळी



झाली, परंतु तसे प्रतिक्रियात्मक काम डॉक्टरांना उभे करायचे नव्हते. कारण, एखाद्या घटनेच्या प्रतिक्रियेच्या स्वरूपांत जे कार्य सुरू होते, त्या घटनेचा प्रभाव व परिणाम ओसरताच ते टिकत नाही, याचा डॉक्टरांना अनुभव आला होता. त्यामुळे डॉ. हेडगेवार यांना हिंदू संघटनेच्या स्थायी, प्रगतिशील, सर्वंकष, सर्वव्यापी व सकारात्मक स्वरूपाची संघटना स्थापना करायची होती. डॉ. हेडगेवार हे मुसलमानांच्या विरोधात नव्हते. या देशावर प्रेम करणाऱ्या सर्वांना ते हिंदू मानत. हिंदुस्थान आणि हिंदू हे येथील समीकरण असून येथील हिंदू समाज इमारतीच्या आधारशिलेसारखा आहे, ही त्यांना अनुभूती झाली होती. संघाची स्थापना त्यांनी प्रतिक्रिया म्हणून किंवा कोणास विरोध करण्यासाठी केली नाही. रा. स्व. संघ किंवा हिंदूंचे संघटन ही राष्ट्रीय आवश्यकता असून 'ना भय देत काहुको, ना भय जानत आप,' असे संघाचे ते वर्णन करत. हिंदू राष्ट्र हे वादातीत सत्य असून या देशात एक जरी हिंदू शिल्लक राहिला तरी हे हिंदू राष्ट्रच राहील, अशी त्यांची धारणा होती. भारताच्या इतिहास, वर्तमान आणि भविष्याचा साकल्याने वेध घेत येथील राष्ट्रीयता व राष्ट्रवादाला जडलेल्या मूळ प्रश्नांचा डॉ. हेडगेवारांनी अभ्यास केला. राष्ट्रीयता, देशभक्ती, सामूहिकता, सामाजिक संवेदनशीलता आणि ऐक्य भावना या गोष्टींचा संचार समाजजीवनात होणे अत्यंत गरजेचे आहे, असे त्यांचे मत होते. हिंदू समाज हा येथील राष्ट्रीय समाज आहे, हा त्यांचा सिद्धांत होता. परंतु हिंदू समाज व्यक्तिगतदृष्ट्या मोक्षवादी असून सामाजिकदृष्ट्या जातीयवादी आहे, हे वास्तव त्यांनी ओळखले होते. या मानसिकतेतून हिंदू समाजास बाहेर काढून त्याच्यात जातीपलीकडील सामूहिक भावना कशी निर्माण करता येईल, यावर त्यांचे चिंतन चालू असे. व्यक्ती हा सर्वप्रथम राष्ट्राचा अंश असतो. त्यामुळे व्यक्तीच्या मनात जोपर्यंत राष्ट्रप्रेमाची भावना जागृत होणार नाही, तोपर्यंत विशुद्ध राष्ट्रीयत्वाची कल्पनाही साकार होणार नाही. व्यक्ती-व्यक्तीमध्ये असे मानसिक उत्थान झाले तरच राष्ट्राचे उत्थान होऊ शकेल, अशी डॉक्टरांची धारणा होती. हिंदू समाजाच्या सामाजिक व राजकीय स्तरांतील दुर्बलतेसाठी केवळ ब्रिटिशांना दोष देणे डॉक्टरांना मान्य नव्हते. कारण हिंदू समाज दुर्बळ बनला होता तो अंतर्गत जातिभेद, मतभेद व स्वार्थलोलुपतेमुळे. त्यामुळे हिंदू समाजाच्या आंतरिक शक्तीस साद घालण्याची गरज होती. त्यासाठी आवश्यक होते राष्ट्रीयत्वाचे जागरण.

स्वातंत्र्यवीर सावरकर आणि डॉ. हेडगेवार यांच्या हिंदू राष्ट्र संकल्पनेत एक महत्त्वाचा मुद्दा अध्याहृत होता. त्या पैलूचे नाव आहे विचारसृष्टीतील स्वराज्य. डॉ. हेडगेवारांनी संघ स्थापना का केली, याचे उत्तर आपणांस त्यात सापडते. ही कल्पना मूळ मांडली ती थोर तत्वचिंतक कृष्णचंद्र भट्टाचार्य यांनी. १९३१ मध्ये त्यांनी चंद्रनगर येथे विचारसृष्टीतील स्वराज्य (Swaraj in Ideas) या भूमिकेचे निरूपण केले. वस्तुतः त्यापूर्वीच्या आदल्याच दशकात डॉ. हेडगेवार व स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी या भूमिकेला साकार केले होते.

भट्टाचार्य म्हणतात, ''आजकाल राजकीय क्षेत्रात आम्हाला स्वयंनिर्णयाचा अधिकार मिळावा व अधिकाराच्या रूपातले स्वराज्य प्राप्त व्हावे, या मागणीचा सर्वत्र गजर चालू आहे. राजकीय क्षेत्रात एका व्यक्तीचे दुसऱ्या व्यक्तीवर जे वर्चस्व असते, ते प्रकर्षाने जाणवते. परंतु जेव्हा एक संस्कृती दुसऱ्या संस्कृतीवर विचारसृष्टीच्या क्षेत्रातही वर्चस्व गाजवते, त्यावेळी ते अधिक परिणामकारक असते; पण ते आपल्यास जाणवत नाही. राजकीय क्षेत्रातील वर्चस्वाचा परिणाम मनुष्याच्या बाह्य जीवनावर जाणवतो. मात्र, विचारसृष्टीच्या क्षेत्रातील सांस्कृतिक आक्रमण मनुष्याच्या अंतर्जीवनावर होते. त्यामुळे ते जाणवत नाही.'' या मुद्द्यास पुष्टी देण्यासाठी मुघल व ब्रिटिशांचे उदाहरण बोलके आहे. मुघलांनी येथे आक्रमण केले. येथील मठ, मंदिरे फोडली. महिलांवर अत्याचार केले व जिझिया कर लादला. या गोष्टींनी बाह्य जीवनावर परिणाम केला म्हणून त्या जाणवल्या. ब्रिटिशांनी १५० वर्षांच्या राज्यात भारतीयांच्या मन आणि मस्तिष्कावर सांस्कृतिक आक्रमण केले व भारतीयांचे मानसिक खच्चीकरण केले, पण ते जाणवले नाही. ब्रिटिशांनी हिंदूंचे जे अ-राष्ट्रीयकरण (denationalisation of Hindu mind) केले, ते डॉक्टरांनी ओळखले होते. म्हणून रा. स्व. संघाच्या माध्यमातून हिंदूंची आपला देश, संस्कृती व इतिहासाशी त्यांनी नाळ जोडण्याचा प्रयत्न केला. जात-पात, भाषा-प्रांत यावर उठून समस्त हिंदूंचा देहस्वभाव बदलून एक राष्ट्रीयत्वाची भावना त्यांना विकसित करावयाची होती. संघाची स्थापना करण्यापूर्वी डॉ. हेडगेवार यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांसह डॉ. मुंजे व अनेक हिंदू राष्ट्रवादी नेत्यांची भेट घेतली होती. हिंदू संघटनांमधले चढ-उतार, त्यांची सैद्धांतिक भूमिका, संघटनात्मक रचना, त्यांचा झालेला विकास व संस्थांची घसरण यामागच्या तात्कालिक व सार्वकालिक कारणांचा तपशिलात अभ्यास केल्यानंतर डॉक्टरांना नवी संघटना स्थापन करण्याची तीव्र आवश्यकता भासू लागली.

क्रांतिकार्यातील योगदान, देशहितैषी सार्वजनिक कार्यात सक्रियता, जनआंदोलनातील सहभाग, देश-विदेशातील विचारधारांचा परिचय आणि हे सर्व करत असताना साध्य-साधन-विवेक याबद्दल चालणारे डॉक्टरांचे सततचे चिंतन यातून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विचार विकसित झाला व डॉक्टरांनी आपल्या डोळ्यांपुढे पुढील लक्ष्य ठेवले. ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळविणे व हिंदू राष्ट्र स्वतंत्र करणे हे तात्कालिक लक्ष्य तर हिंदू राष्ट्राचे परम वैभव हे अंतिम लक्ष्य होते.

अंतिम साध्यासाठी साधन म्हणून धर्म संरक्षण आणि त्यासाठी आधार हिंदूंची विजयशाली संघटित कार्यशक्ती तयार करून ही सुसंघटित अवस्था प्राप्त करण्यासाठी प्रत्येक हिंदूच्या हृदयांत राष्ट्रासाठी समर्पणाचा संस्कार निर्माण करणे. अशा सुसंस्कारित लोकांचे (स्वयंसेवक) अनुशासनबद्ध संघटन उभे करणे. तात्कालिक लक्ष्याच्या प्राप्तीसाठी काँग्रेस हे उपयुक्त साधन, हिंदू महासभेची त्यास जोड आणि अंतिम लक्ष्य प्राप्तीसाठी स्थायी साधन म्हणजेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची निर्मिती आणि त्याचे कार्य हा संकल्प त्यांनी केला.

डॉ. हेडगेवारांनी हिंदू संघटनेचा छोटा मंत्र दिला व तो प्रत्यक्षात आणण्यासाठी शाखारूपी सोपे तंत्र दिले. १९२५ साली पेरलेल्या या बीजाचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. यंदा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आपल्या कार्याची जन्मशताब्दी साजरी करत आहे. ज्या हिंदू समाजात चार जणांची तोंडे केवळ अन्त्ययात्रेच्या वेळी एका दिशेला एकत्र होतात, असे म्हणण्याची वेळ आली होती, त्याच समाजात लक्षावधी लोकांची राष्ट्रोत्थानासाठी रा. स्व. संघासारखी एक देशव्यापी संघटना आज उभी आहे आणि एवढेच नव्हे, त्याच्या राष्ट्रवादी विचारांची म्हणजेच 'हिंदुत्वाची' महती भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय जीवनाचे एक वैचारिक अधिष्ठान म्हणून प्रभावीपणे समोर आली आहे. यातच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेची उपलब्धी आहे, असे म्हटले तर वावगे नाही.

(लेखक महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सभापती व सावरकर दर्शन प्रतिष्ठानचे सचिव आहेत)

## रविवारची पत्रे

### कशी वाढेल मतदानाची टक्केवारी

कुठल्याही निवडणुकीत मतदानाच्या टक्केवारीला फार महत्त्व असते. तो लोकशाही व्यवस्थेचा प्राण आहे. या प्राणवायूची शुद्धता कायम राहावी यासाठी काही बंधने निवडणूक आयोगाने घालून दिलेली आहेत. यालाच आचारसंहिता म्हणतात. निवडणुकीत विविध प्रकारांची प्रलोभने मतदारांना दाखविली जातात. खरे तर हे नियमबाह्य वर्तन ठरत असते. परंतु निवडणूक आयोग योग्य वेळेत कठोर कारवाई करू शकत नसल्याने फक्त दमदाटी करून दंडात्मक कारवाई करून मोकळे होत असते. कारण, जवळपास सगळेच पक्ष निवडणूक काळात निवडणूक नियमांचे उल्लंघन करीत असतात. यातून कुणीही सुटलेले नाहीत. यासाठी एकमेकांविरोधात आघाडी उघडलेली पाहायला मिळते. मतदानाची टक्केवारी वाढल्यास यांस काही प्रमाणात आळा बसू शकतो. मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी फक्त ईव्हीएमवर अवलंबून असता कामा नये. यासाठी विविध पर्यायांचा वापर केला गेला पाहिजे. बॅलेट पेपर, क्यूआर कोड, टपालाद्वारे मतदान, ओटीपी इत्यादी पर्यायांचा विचार केला गेला पाहिजे. तसेच मतदान हे कुठूनही करता आले पाहिजे. असे झाले तर मतदानासाठी विशिष्ट तारखेची गरज पडणार नाही. यामुळे मतदान यंत्रणेवरील, निवडणूक आयोगावरील व सुरक्षा यंत्रणेवरील भार कमी होण्यास मदत होणार आहे. यामुळे निवडणूक खर्चात मोठी बचत होऊ शकते. आपण आज डिजिटल युगात वावरत असल्याने याचा आग्रह निवडणूक आयोगाकडे लावून धरला गेला पाहिजे. मतदानाची प्रक्रिया यामुळे वेगवान आणि मतदारांच्या सोयीनुसार कुठूनही पार पाडता येईल. मतदानासाठी कमीत कमी १५ दिवसांची मुदत घालून दिली गेली पाहिजे. यामुळे बोगस मतदानाला काही प्रमाणात आळा बसू शकतो. मतदानाची टक्केवारी कमी राहात असल्याने विविध पक्षांचा कल मते खरेदी करण्याकडे वळलेला आहे. याला आळा घालण्यासाठी मतदानाची टक्केवारी मोठ्या प्रमाणावर वाढली पाहिजे. मतदानाच्या अधिकाराचा वापर न करणाऱ्यांना याबाबतची विचारणा करून योग्यरीत्या दंडित केले गेले पाहिजे. मतदानाची टक्केवारी वाढल्याशिवाय लोकशाही व्यवस्थेला चांगले दिवस पाहायला मिळणार नाहीत. निकोप व्यवस्थेसाठी मतदान प्रक्रियेत अनेक बदल करावे लागणार आहेत. कमी मतदान हा लोकशाही व्यवस्थेला लागलेला कलंक आहे. तो कलंक धुवून काढण्यासाठी निवडणूक आयोगाने पुढाकार घेतला पाहिजे.

**मिलिंद गड्डमवार**/९५११२१५२००

### जनता आणि कायदे

सरकार कायदे तयार करीत असते आणि जनता त्याची अंमलबजावणी करीत असते. कायदे जनतेच्या हितासाठी असतात. परंतु, कायद्यात सरकारने सतत बदल केला तर लोकांच्या मनात गोंधळ निर्माण होतो. जे ज्येष्ठ नागरिक आहेत ते तर अधिक चिंतातुर होतात. उदा. आयकर कायदा, आधार आणि रेशनकार्ड, सिलेंडर इत्यादी कायद्याबाबतीत सरकारने सतत बदल केले; जे कायदा, नियम पालन करतात, त्यांना निश्चित मानसिक त्रास होतो. कोणी शंभर किंवा पाचशे रुपये दिले की ती खरी आहे की नाही, यासंबंधी शंका निर्माण होऊ लागते. कारण त्यासंबंधी नियम बदलत आहे. काही लोक कायदा तोडून व्यवहार करतात. त्यासाठी सरकार पुन्हा कायद्यात बदल करते आणि कायदा पालन करणाऱ्या लोकांना मात्र खूप त्रास होतो. कायदा तोडणारे पुन्हा नवीन मार्ग शोधण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठीच सरकारला नोटाबंदी करावी लागली. मात्र, सामान्य लोकांना त्रास सहन करावा लागला. देशात कायद्याची संख्या अधिक असते. त्या देशातील लोक कमी संस्कारित असतात, असे विद्वान लोक म्हणतात. ज्या देशात अधिकाधिक चांगले लोक राहतात त्या देशात कायद्याची, नियमाची संख्या कमी असते. देशाचा विकास जसजसा होत जातो, तसतसे त्या विकास कार्यामध्ये अडचणी निर्माण होतात. कायदा न पालन करण्याची वृत्ती वाढत जाऊन त्यातून मोठे अपघात होत जातात. जे पाहून वागतात त्याचा जीव जातो आणि कायदा मोडणारे घरीच नाही तर तुरुंगातदेखील सुखात राहतात. त्यात राजकीय नेतेही असतात. कायदे तयार करणे सोपे आहे, परंतु मनाला शिस्त लावणे फार कठीण आहे. त्याकरिता आपल्याला माणुसकीचे शिक्षण घेणे गरजेचे आहे. ते प्राप्त झाले तर देशातील कायद्याची संख्या कमी होईल आणि लोकांना अधिकाधिक चांगल्या पद्धतीने आपले जीवन जगता येईल... अगदी शांतपणे!

**शशिकांत पांडे**/७५८८७४१९९६

### उशिरा सुचलेले शहाणपण...

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी निवडणुकीतून माघार घेणार असल्याचे जाहीर केले आहे. त्याआधी १३ जागांवर निवडणूक लढवणार असल्याची घोषणा केली होती. मात्र, अचानक निवडणुकीतून माघार घेत असल्याचे म्हटलं तसेच राज्यातील ज्या मराठा बांधवांनी उमेदवारी अर्ज दाखल केले, त्यांनी त्यांचे अर्ज आता मागे घ्यावेत, असं आवाहनही त्यांनी केलं. या मागचे मुख्य कारण कोणताही पक्ष फक्त मराठ्यांचा पक्ष म्हणून उभा राहिला असता तर त्यांची पंचाईत झाली असती. मराठा मतं मोठ्या प्रमाणात आहेत; त्याच प्रमाणात ओबीसी मतंही आहेत. मराठा समाज आणि ओबीसी समाज यांच्यातील दरी मोठ्या प्रमाणावर होऊन मतविभागणी झाली असती, त्याचा मोठ्या प्रमाणावर फटका महाविकास आघाडीला बसला असता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विरोध करून पाटीदार आरक्षणाच्या मुद्द्यावरून हार्दिक पटेल यांचं नेतृत्व समोर आलं. त्याच धर्तीवर जरांगे यांनी राज्याचे माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्य केले. गुजरात विधानसभा निवडणुकीच्या आधी याच प्रकारचे हार्दिक पटेल यांचे पाटीदार आंदोलन चालू होते आरक्षणासाठी. मनोज जरांगे यांच्यासारखी त्यांची मागणी होती. कोणत्याही आंदोलनातील सभेतील गर्दी निवडणुकीत मतात परिवर्तित होईलच, याची शाश्वती नसते. किंबहुना आंदोलक नेत्याला निवडणुकीच्या राजकारणात डावललेही जाते, असा इतिहास आहे. त्याची पुनरावृत्ती गुजरातेत बघायला मिळाली. हार्दिक पटेल, अल्पेश ठाकोर आणि जिग्नेश मेवाणी या तिघांनाही गुजरातमधील जनतेने फारसा कौल दिला नाही. समाजाच्या मागण्या एका जागी आणि राजकारणातील पसंती दुसऱ्या जागी असा काहीसा प्रकार बघायला मिळाला. सर्वात महत्त्वाची बाब काँग्रेसने सोडचिठ्ठी दिल्यानंतर भाजपातर्फे निवडून आलेल्या हार्दिक पटेल यांनी आपल्या आमदारकीच्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात भाषण करताना या दरम्यान आपल्या पाटीदार आंदोलनाबाबत आता आपणास पश्चात्ताप होतो. आपण आंदोलन करतो तेव्हा आपणास कायदा करणे किती सरळ सोपी गोष्ट आहे असे वाटते, पण आमदार झाल्यानंतर कळते की हे तेवढे सोपे नाही. जरांगे हे फडणवीसांबाबत जेवढी खालच्या पातळीवर टीका करतील त्याचा फटका महाविकास आघाडीला बसल्याशिवाय राहणार नाही. कारण मागणी आणि पसंती वेगळी असते. गुजरातमध्ये त्याचा प्रत्यय या आधी विधानसभा निवडणुकीत दिसला आहे.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

### डिजिटल अरेस्ट

गेल्या काही दिवसांत वर्तमानपत्रातून 'डिजिटल अरेस्ट' या विषयावरील अनेक बातम्या वाचण्यात आल्या. सायबर गुन्हे करणाऱ्या चाणाक्ष व्यक्ती आपले सावज हेरून विविध प्रकारे नागरिकांना आर्थिक फटका देत आहेत. याला बळी पडणाऱ्या व्यक्ती निवृत्त ऑफिसर्स, डॉक्टर्स, आयटी क्षेत्रातील अभियंते आदी आहेत. मानवी तस्करी, विवाहबाह्य संबंध, आर्थिक घोटाळा यासारखी कारणे सांगून फोनवर ते मोठ्या रकमा उकळतात. कधी तर व्हिडीओ कॉल करून पोलिस स्टेशनमधून बोलत असल्याचा देखावा उभा करतात. सामान्य आणि सभ्य व्यक्ती घाबरतात आणि त्यांचे ऐकून बळी पडतात. ते म्हणतील तेवढी रक्कम त्यांच्या खात्यात जमा करतात. त्यांनी कथन केलेला गुन्हा जर आपण केलेलाच नाही तर घाबरायचे कशाला? सायबर गुन्हेगार कॉल करताना मुख्यतः व्हॉट्सॲपचा उपयोग करतात. त्यामुळे तो कॉल कुठून केला हे शोधणे जरा कठीण होते. हे कॉल भारतातून किंवा पाकिस्तान, म्यानमार, कंबोडिया या ठिकाणांहून आलेले असू शकतात. मुळात देशात 'डिजिटल अरेस्ट' असा कुठलाही प्रकार नाही. कॉल करणारा आपल्याला गुन्ह्यात सहभागी असल्याचे सांगून डिजिटल अरेस्ट केल्याचे धमकावत असेल तर न घाबरता तो कॉल फसवणुकीसाठी आहे, हे समजून घ्यावं. आपले बँकेचे डिटेल्स कॉल करणाऱ्या अनोळखी व्यक्तीला देऊ नये. नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टलवर ऑनलाईन तक्रार करता येते. आपल्या जवळच्या पोलिस स्टेशनची मदत घेता येऊ शकते. आलेला कॉल कोणाचा आहे हे ओळखणारा ॲप आपल्या मोबाईलवर अवश्य ठेवावा. अनोळखी आणि देशाबाहेरून आलेले कॉल्स स्वीकारू नये. मोबाईलचा वापर करताना अतिशय सावध असायला हवं.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

### जीवनाला 'वन्स मोर' नाही

आपले जीवन एक शाळाच आहे असे म्हणता येईल. आपल्या जीवनाची खरी सुरुवात आपल्या जन्मापासूनच होते तर या जीवनाचा अंत मृत्यूने होतो. आपण लहान असताना आपल्याला कुणाशीच काही देणे घेणे नसते. मनसोक्त खेळतो, बागडतो. आज प्रत्येक मनुष्य वेगवेगळ्या पद्धतीने स्वतःचे जीवन जगत आहे. मात्र खचून न जाता जीवनात संघर्ष करायला शिका. कारण रात्रीनंतर दिवस हा येणारच आहे. मनमुरादपणे जीवनातील प्रत्येक दिवसाचा आनंद राहा. जीवन हे एकदाच मिळते. मनसोक्त जीवनाचा आनंद घ्या आणि दुसऱ्यांना पण द्या. जीवनात छोट्या छोट्या गोष्टीतून आनंद मिळवता आला पाहिजे. आपल्या आसपास आपण वेगवेगळ्या मनोवृत्तीचे लोक बघत असतो. नकारात्मक विचारसरणीचेच लोक कधी कुणाच्या दुःखात किंवा सुखातही सहभागी होताना दिसत नाही. कधी कुणाच्या चांगल्या कामाची प्रशंसाही करताना दिसत नाही. कुणाला आनंद होईल असे काम करत नाही. दुसरीकडे सकारात्मक विचारांच्या लोकांचा चेहरा नेहमी प्रसन्न व हसतमुख दिसतो. त्यांना बघून आपल्यालाही आनंद होत असतो. नकारात्मक लोकांच्या चेहऱ्यावर नेहमी उदासीनता दिसते. काही ना काही विचारात असतात. अशा लोकांकडे दुर्लक्ष करूनच आपण आनंदी होऊ शकतो. कारण अशी लोकं किंवा दुःखदायक आठवणी जीवनातून डिलीट केल्या तरच आपण प्रसन्न राहू शकतो. दुसऱ्याचे चांगले केल्याने कुठेतरी आपलेही चांगलेच होत असते. जीवनात माणूस पैशाने किती समृद्ध आहे हे महत्त्वाचे नाही तर विचाराने किती समृद्ध आहे, हे महत्त्वाचे आहे. पैशाने भौतिक सुखसुविधा विकत घेऊ शकतो. मनाला जे समाधान पाहिजे ते पैशाने विकत मिळत नाही. जसं एखाद्या गरजू व्यक्तीला मदत केल्याने जे मनाला समाधान मिळते ते पैशाने विकत मिळणार नाही. समाधानाएवढे सुख नाही आणि लोभाएवढे दुःख नाही. दुसऱ्यांना मदत करायला पण शिका. केवळ पैसे देणेच मदतीचा मार्ग नाही तर भुकेलेल्याला अन्न देऊन, तहानलेल्याला पाणी देऊनही आनंद मिळवायला आपण शिकले पाहिजे. चांगल्या गोष्टी, चांगल्या आठवणी एकमेकांना शेअर करा. राग, द्वेष, ईर्षा लगेच रिमूव्ह करा. हानिकारक व्हायरस आपल्या मनात प्रवेश करू देऊ नका. कारण या व्हायरसचा प्रभाव आपल्या विचारांवरही पडत असतो. ज्यामुळे आपल्या मनाची सिस्टिम बरोबर काम करीत नाही. नको असलेल्या फाईल मनातून डिलीट करून मनाला रिफ्रेश करून पुन्हा आपले जीवन सुरळीत करण्याचा प्रयत्न करा. जीवनाची फाईल एकदा डिलीट झाली की पुन्हा परत डाऊनलोड करण्याचे ऑप्शन नसते. कारण जीवनाला वन्स मोर नाही.

**प्रीती खोब्रागडे**/भंडारा

रविवारची पत्रे व वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

# काँग्रेसचे ३७० कलमाला समर्थन म्हणजेच संविधानाला संपवण्याचा कट!

## दखल

**पंकज जयस्वाल**

एकीकडे राहुल गांधी पूर्ण देशात फिरून संविधान धोक्यात आहे, असं वारंवार सांगत आहेत; जणू हेच संविधानाचे खरे रक्षक आहेत. मात्र, सत्य परिस्थिती लोकांना समजली आहे. आणिबाणीपासून ते वेळोवेळी संविधान बदलणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विरोधात जाऊन कायदे आणणे अशा अनेक गोष्टी काँग्रेस शासनाच्या काळात घडल्या. संविधान आणि आरक्षण कोणाला वाचवायचं आहे आणि कोणाला घालवायचं आहे, हे ६ नोव्हेंबर २०२४ ला जम्मू-काश्मीर विधानसभेत पास केलेला ठराव; ज्यात ३७० कलम पुन्हा आणण्याची मागणी केली आहे आणि याचं समर्थन केलं काँग्रेसने. मग आपणच विचार करावा संविधान विरोधी कोण?


**कलम ३७० संविधान आणि आरक्षण विरोधी कसे होते?**

कलम ३७० मुळे जम्मू-काश्मीरमध्ये लोक विशेषतः अनुसूचित जाती-जमाती आणि महिलांना वाईट वागणूक दिली गेली. संविधानाने दिलेला आरक्षणाचा हक्क आणि सोयी-सवलती काढून टाकल्या. तेथील स्वच्छता कामगारांच्या समुदायाला 'वाटल' म्हणजेच खालच्या दर्जाची काम करणारी लोकं, अशा अपमानास्पद शब्दांचा सामना करावा लागला. सोप्या भाषेत सांगायचे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं संविधान १९५४ मध्ये काँग्रेसशासित नेहरू सरकारच्या सांगण्यावरून राष्ट्रपतींनी जम्मू-काश्मीरसाठी पूर्णपणे शिथिल करून टाकले. एक प्रकारे भारतीय संविधानाचा अपमान करून पाकिस्तानी हस्तक्षेपाला परवानगी दिली. तिथे संविधान कमकुवत केल्यामुळे सर्वात मोठा फटका बसला तो अनुसूचित जाती-जमाती, ओबीसी आणि महिलांना. जम्मू-काश्मीरमध्ये ४२ हजार लोक मारले गेले आहेत. कारण कलम ३७० मुळे फुटीरतावादाला चालना मिळाली आणि त्यामुळेच तेथे दहशतवाद निर्माण झाला.

**भाजपा सरकारने २०१९ मध्ये ३७० कलम रद्द केल्यामुळे काय बदल झाला?**

सर्वात महत्त्वाचं म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं संविधान पूर्णपणे जम्मू आणि काश्मीरमध्ये लागू झाले. सर्वांना भारतीय म्हणून इतर राज्यांमध्ये जे अधिकार आहेत ते मिळाले, वंचित जातींना त्यांचा सन्मान मिळाला. आरक्षणाचा अधिकार, निवडणुकीत उभे राहण्याचा अधिकार, बोलण्याचा अधिकार असे अनेक अधिकार मिळाले. मोदी सरकारने ३७० कलम रद्द केल्यामुळे १९९३ च्या सफाई कर्मचारी कायद्यासह घटनेतील सर्व तरतुदी राज्यात लागू करण्याची परवानगी दिली. गेल्या चार वर्षांत जम्मू-काश्मीरमधील ओबीसी समुदायाची ओळख पहिल्यांदाच झाली आहे. उपेक्षित समुदायासाठी हा एक मोठा विजय आहे. कारण ते त्यांच्या घटनात्मक अधिकारांचा उपयोग करू लागले. ३७० काढून टाकल्यामुळे उर्वरित देशातील अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी दिलेली तरतूद आता जम्मू आणि काश्मीरमधील समुदायासाठी उपलब्ध आहे. वन हक्क कायदा, अत्याचार प्रतिबंधक कायदा आणि जम्मू-काश्मीरमधील वाल्मीकि समुदायासाठी अधिवास हक्कदेखील कलम ३७० रद्द केल्यानंतरच लागू केले गेले. पंतप्रधान मोदींनी जम्मू-काश्मीरच्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी आरक्षणासाठी विधेयक मंजूर केले. जम्मू-काश्मीरच्या इतिहासात प्रथमच अनुसूचित जमातीसाठी ९ जागा राखीव ठेवण्यात आल्या असून अनुसूचित जातींसाठीही जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

उपेक्षित समुदायांवर सकारात्मक प्रभावाव्यतिरिक्त या प्रदेशात महिलांच्या समानतेची प्रगती पाहणे आनंददायी आहे. पूर्वी जर जम्मू आणि काश्मीरमधील एखाद्या महिलेने राज्याबाहेरील पुरुषाशी लग्न केले तर तिला जम्मू आणि काश्मीरमध्ये मालमत्ता खरेदी करण्याचा अधिकार नव्हता. या भेदभावपूर्ण प्रथेमुळे महिलांचे हक्क आणि त्यांचे जीवन साथीदार निवडण्याचे स्वातंत्र्य मर्यादित होते. फुटीरतावादी नेत्यांची मुले




ऐश्वर्यामध्ये राहत असताना, इतरांनी संघर्षाचे कठोर परिणाम सहन केले. कलम ३७० रद्द केल्याने या 'इतरांना' संरक्षण मिळाले आहे. २०१६ ते २०१९ दरम्यान राज्यात दगडफेकीच्या तब्बल ५०५० घटनांची नोंद झाली, जी कलम रद्द केल्यानंतर केवळ ४४५ इतकी कमी झाली; आश्चर्यकारकपणे ९२ टक्के घट झाली. ऑगस्ट २०१६ ते ऑगस्ट २०१९ दरम्यान निषेध आणि दगडफेकीच्या घटनांमध्ये १२४ निष्पाप जीव गमावले गेले. त्यानंतरच्या चार वर्षांत कलम रद्दनंतर अशा मृत्यूची कोणतीही नोंद नाही. शिवाय, कलम ३७० नंतरच्या काळात कायदा आणि सुव्यवस्थेच्या परिस्थितीत नागरिकांच्या मृत्यूची घटना विस्मयकारक शून्यावर घसरली. याचाच अर्थ प्रदेशात पसरलेल्या शांततेची जबरदस्त भावना कोणीही नाकारू शकत नाही.

आपण सर्वांनीच विचार करावा, काँग्रेस आणि काँग्रेससोबत असणारे पक्ष जसे शरद पवार गट, उद्धव ठाकरे गट हे संविधानाचे रक्षक आहेत की मारेकरी? कोणाला संविधान नकोय ही जम्मू-काश्मीरमधील विधानसभेत झालेली घटना स्पष्टपणे सर्व भारतीयांचे डोळे उघडण्यासाठी पर्याप्त आहे. मतदान करताना आपण हे नक्कीच लक्षात ठेवाल, अशी आशा करतो.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

### मविआच्या 'महाराष्ट्रनामा'चे प्रकाशन : महिलांना वर्षाला ५०० रुपयात ६ सिलेंडर, २.५ लाख सरकारी पदांची भरती, कंत्राटी भरती बंद, १०० युनिट मोफत वीज

# खोके सरकार सत्तेतून खाली खेचून मविआचे सरकार आणा: खर्गे

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.१० नोव्हेंबर : महाविकास आघाडी राज्यात सत्तेत आल्यानंतर महिलांना वर्षाला ५०० रुपयात ६ सिलेंडर, २.५ लाख सरकारी पदांची भरती, कंत्राटी भरती बंद, १०० युनिट मोफत वीज, अशी विविध आश्वासने व योजनांचा समावेश असलेल्या महाराष्ट्रनामा या निवडणूक जाहीरनामाचे रविवारी प्रकाशन करण्यात आले. सत्तेत आल्यानंतर पहिल्या १०० दिवसात काय कामे करणावर व पाच वर्षांत काय काम करणार याचा त्यामध्ये माहिती देण्यात आली असून काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या प्रमुख उपस्थितीत व राज्यातील मविआच्या नेत्यांच्या हस्ते संयुक्तपणे त्याचे प्रकाशन करण्यात आले यावेळी खर्गे यांनी महाराष्ट्राची निवडणूक देशाचे भविष्य बदलणारी आहे . राज्यातील जनतेने खोके सरकार सत्तेतून खाली खेचून मविआचे सरकार आणावे, असे आवाहन केले:

यावेळी खर्गे म्हणाले की, महाराष्ट्रात सर्व जाती धर्माचे लोक मुंबईकडे आर्थिकदृष्ट्या, रोजगारासाठी, उत्पादन, गुंतवणुकीच्या दृष्टीने अपेक्षेने पहातात. देशभरातून लोक मुंबईत स्वप्न घेऊन येतात व मुंबई त्यांना सामावून घेते, त्यांच्या स्वप्नांचा बळ देते. सामाजिक बदलातही महाराष्ट्र आघाडीवर असतो.



महाराष्ट्राची निवडणूक फक्त महाराष्ट्रासाठी नाही तर देशाचे भविष्य बदलणारी निवडणूक आहे. महाराष्ट्राच्या जनतेसाठी शेतकरी, तरुण, महिलांसाठी हे सरकार घालवणे गरजेचे आहे.'.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, भाजपा युती सरकारला दीड वर्षात शेतकऱ्यांची आठवण आली नाही पण आता त्यांना शेतकऱ्यांची आठवण आली असून कर्जमाफी करण्याच्या वल्गणा करु लागले आहेत. महागाई, बेरोजगारी, महिला, शेतकरी दिसले नाहीत आता त्यांना पराभव दिसत असल्याने त्यांना यांची आठवण झाली आहे. महाराष्ट्रातील स्वाभिमानी जनतेने परिवर्तन करण्याचा मानस बनवला आहे.

शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते खा. संजय राऊत म्हणाले की, महाराष्ट्र कधी कोणाचा गुलाम बनला नाही व बनणार नाही हा जाहिरनामा महाराष्ट्राचा स्वाभिमान दाखवणारा आहे. 'एक रहेंगे तो सेफ रहेंगे' म्हणणारे नरेंद्र मोदी जोपर्यंत महाराष्ट्रात येत राहतील तोपर्यंत महाराष्ट्र अनसेफ राहिल .'

खा. वंदना चव्हाण यांनी मविआच्या जाहिरनाम्याबद्दलची सविस्तर माहिती दिली. यावेळी काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल, काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत, सरचिटणीस अविनाश पांडे, खासदार अभिषेक मनु सिंघवी, प्रविण खेरा, सचिव बी. एम. संदीप, वॉर रुम प्रभारी वामशी रेड्डी, काँग्रेस वर्किंग कमीटीचे सदस्य खा. डॉ. नासीर हुसेन, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे, वंदना चव्हाण, शिवसेनेचे खासदार संजय राऊत, अरविंद सावंत, प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे आदी उपस्थित होते.

## जम्मू-काश्मीरमध्ये चकमकीच्या तीन घटनांत नायब सुभेदार शहीद, तीन दहशतवाद्यांचा खात्मा

श्रीनगर, १० नोव्हेंबर : जम्मू-काश्मीरमधील किश्तवाड जिल्ह्यातील जंगल परिसरात रविवारी दहशतवादी आणि सुरक्षा दलांमध्ये चकमक झाली. यात लष्कराचा नायब सुभेदार राकेश कुमार शहीद झाले असून चार जवान जखमी आहेत. दरम्यान, जम्मू-काश्मीरमध्ये गेल्या १५ तासांत चकमकीच्या तीन घटना समोर आल्या आहेत. या घटनांत सुरक्षा दलांनी तीन दहशतवाद्यांचा खात्मा केल्याची माहिती आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, पहिली चकमक श्रीनगरच्या बाहेरील जबरवान जंगल परिसरात झाली. येथे दोन ते तीन दहशतवाद्यांना सुरक्षा दलांनी घेराव घातला आहे. अनेक तासांपासून दहशतवादी ठार झाले आहेत. तर, तिसरी चकमक सोपोरमध्ये झाली, या चकमकीत एक दहशतवादी मारला गेला आहे.

लष्करी अधिकाऱ्यांनी सांगितले की, अलीकडेच दोन ग्राम संरक्षण रक्षकांच्या गोळीबार सुरू झाला. सुरुवातीच्या गोळीबारात लष्कराचे चार जवान जखमी झाले होते आणि त्यांना रुग्णालयात नेण्यात आले होते, जिथे तिघांची प्रकृती चिंताजनक आहे. तसेच या चकमकीत अन्य एक पॅरा ट्रूपर शहीद झाला आहे.

## दलित-ओबीसींचे आरक्षण कमी करून मुस्लिमांना देण्याचा काँग्रेसचा प्रयत्न : अमित शाह

जळगाव, १० नोव्हेंबर : काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात मुस्लिमांना १० टक्के आरक्षण देण्याची घोषणा केली आहे. मूळात आरक्षणाची मर्यादा ही ५० टक्क्यांपेक्षा जास्त होऊ शकत नाही. त्यामुळे ओबीसी आणि दलितांचे आरक्षण कमी करून ते मुस्लिमांना देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे, असा आरोप केंद्रीय गृहमंत्री, भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शाह यांनी केला. जळगाव येथे महायुती उमेदवारांच्या प्रचार सभेत ते बोलत होते.

शाह पुढे म्हणाले, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, माजी पंतप्रधान मनमोहन आणि माजी केंद्रीय मंत्री शरद पवारांनी त्यांची सत्ता असताना महाराष्ट्राला फक्त १ लाख ९१ हजार कोटी रुपये एवढाच निधी दिला. मात्र मोदी सरकारच्या काळात १० लाख ९० हजार कोटी दिले आहेत. जेव्हा फडणवीस मुख्यमंत्री होते, तेव्हा महाराष्ट्र प्रगतीच्या वाटेवर होता. महाराष्ट्राला नंबर एकवर नेण्याचा आमचा प्रयत्न असेल, म्हणून महायुतीला समर्थन द्या. आमच्या सर्व उमेदवारांना मोठ्या बहुमताने निवडून द्या आणि मोदींचे हात मजबूत करा, देशाला सुरक्षित करा, मुस्लिम आरक्षणाला अटकाव करा, असे आवाहनही त्यांनी केले.

सत्तेच्या भुकेने महाविकास आघाडी अंध झाली आहे. पवारांसारख्या नेत्यांनी राम मंदिर अडकवून ठेवलं. मोदींनी पाच वर्षांत राम मंदिराचे काम सुरु केले. यंदा ५५० वर्षानंतर रामलल्लाने दिवाळी अयोध्येत साजरी केली. औरंगाबादच्या नामांतराला देखील मविआने विरोध केला. कलम ३७० हटवण्यास देखील विरोध केला होता. वक्फ बोर्ड कायद्यातील सुधारणेला देखील विरोध केला. मात्र वक्फ बोर्ड कायद्यात बदल करायचा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी निश्चय केला आहे. मविआ सत्तेत आली तर ते वक्फ बोर्डाच्या बाजूने निर्णय घेतील, असेही शाह म्हणाले.

काँग्रेस काळापेक्षा मोदी सरकारच्या काळात राज्याच्या दहा लाख करोड रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली. या अगोदर एवढी मदत झाली नव्हती. विविध सरकारी विकास योजना, गरिबांसाठी योजना आणल्या. लाडकी बहीण योजना महिलांसाठी फायदेशीर असताना हे त्यालाही विरोध करत आहेत. मात्र पुन्हा महायुती सरकार आल्यावर २१०० रुपये रुपये देण्यात येतील. नाशिक-पुणे रेल्वेला आम्ही मंजुरी दिली आहे. ६७ लाख गरिबांची बँक खाती उघडली आहे. १२.३५ लाख गरिबांच्या घरी एलपीजी सिलेंडर पोहोचवले. एकनाथ शिंदे यांचे सरकार आल्यापासून महाराष्ट्रात उद्योग येत आहेत, असेही शाह यांनी सांगितले.

# अमित शाहांचे राहुल गांधींना आव्हान, उद्धव ठाकरेंना सल्ला

मुंबई, १० नोव्हेंबर : राहुल गांधींनी वीर सावरकरांसाठी दोन चांगले शब्द बोलून दाखवावे. वीर सावरकरांचे नाव कोणत्याही काँग्रेस नेत्याने घेतले का? बाळासाहेब ठाकरे यांचे गुणगान कोणी काँग्रेस नेता करू शकतो का? उद्धवजी तुम्ही कोणासोबत बसला आहात, जी लोक कलम ३७० ला विरोध करत आहे, जी लोक राम मंदिरास विरोध करतात, जी लोक सावकरांसंदर्भात चांगले बोलू शकत नाही? संभाजीनगर नावाला विरोध करणाऱ्यांसोबत तुम्ही बसला आहात. सीएए, युसीसीला विरोध करणाऱ्यांसोबत बसला आहोत. वक्फ बिलाच्या सुधारणेला विरोध करणाऱ्यांसोबत बसला आहात. तुम्हाला कुठे बसायचं हे तुम्हीच ठरवा, असा सल्ला केंद्रीय गृहमंत्री, भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शाह दिला.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपकडून मुंबईत संकल्प पत्र प्रकाशित करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्रातील जनतेने आम्हाला तिसऱ्यांदा कौल द्यावा. तुम्ही आम्हाला पहिल्यांदा जनादेश दिला. नंतर २०१९मध्ये आम्हाला कौल दिला. पण काही लोकांनी सत्तेसाठी धोका दिला. पण ते जास्त काळ टिकू शकले नाही. आम्ही मोदींच्या नेतृत्वात लढत आहोत. आघाडीत अंतर्गत मतभेद आहेत. मी उद्धव ठाकरे यांना विचारतोय की, सावरकरांबद्दल राहुल गांधीना दोन शब्द चांगले बोलायला सांगाल का. काँग्रेसच्या नेत्यांना बाळासाहेब ठाकरेंबद्दल दोन शब्द बोलायला सांगाल का. मी उद्धव ठाकरेंना विनंती करतो हे जरा विचाराच, असं खुलं आव्हान अमित शाह यांनी उद्धव ठाकरेंना दिलं आहे.

महाराष्ट्र अनेक युगापासून देशाचे नेतृत्व करत आहे. भक्ती आंदोलनाची सुरुवात महाराष्ट्रात झाली. जेव्हा गरज पडली तेव्हा गुलामीतून मुक्तीचे आंदोलन शिवाजी महाराजांनी इथूनच सुरू केली. सामाजिक क्रांतीची सुरुवातही महाराष्ट्रातूनच झाली. महाराष्ट्रातील जनतेचे प्रतिबिंब, आज महायुतीने शेतकऱ्यांचा सन्मान करण्याची, महिलांचा स्वाभिमान वाढवण्याची आणि वारसा पुनरुज्जीवित करण्याची शपथ घेतली आहे. महायुती सरकारने महिला, शेतकऱ्यांसाठी काम केले आहे. मजबूत, समृद्ध आणि सुस्कृंत महाराष्ट्रासाठी संकल्प पत्र आहे. ज्या संकल्प पत्राचं लोकार्पण झाले ते महाराष्ट्रातील जनतेच्या आकांक्षेचं प्रतिबिंब आहे.

शरद पवार ज्या पद्धतीने आश्वासन देतात, ज्या पद्धतीने मुद्दे उपस्थित करतात, त्याचा वास्तवाशी किलोमीटरपर्यंतही संबंध नसतो. खोटे आरोप करून नरेटिव्ह तयार करतात. नकली जनादेश घेण्याचं काम करतात. यावेळी ते होणार नाही. यावेळी महाराष्ट्राची जनता आमच्यासोबत आहे. शरद पवारांना विचारतो दहा वर्षे तुम्ही केंद्रात मंत्री होता. २००४ ते २०१४ पर्यंत महाराष्ट्राच्या विकासासाठी काय केलं ते सांगा. तुमच्या सरकारमध्ये दहा वर्षात महाराष्ट्रावर किती अन्याय झाला ते सांगा.

आज मी आंबेडकरांच्या भूमीवर उभा आहे. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच मुख्यमंत्र्यांनी जम्मू-काश्मीरच्या भूमीवर भारतीय राज्यघटनेनुसार शपथ घेतली आहे. कलम ३७० हटवल्यानंतर ही निवडणूक झाली. याचा देशाला अभिमान आहे. मी महाराष्ट्रातील जनतेला महायुती सरकारला सलग तिसऱ्यांदा जनादेश द्यावा, अशी विनंती करतो. मी म्हणतो की, काँग्रेसने आश्वासने दिली तर ती विचारपूर्वक केली पाहिजेत, कारण ते आश्वासने पूर्ण करत नाहीत आणि मला उत्तर द्यावे लागेल. तेलंगणा, हिमाचल ही त्याची उदाहरणे आहेत. त्यांच्या आश्वासनांची विश्वासार्हता नरकात गेली आहे.


**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 99 - Partur | Babanrao Dattatreya Yadav (Lonikar) | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

**Name of constituency : 99-Partur**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**



**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 232 - Kaij (S.C.) | Namita Akshay Mundada | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

**Name of constituency : 232 - Kaij (S.C.)**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**



**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 109-Aurangabad East | Atul Moreshwar Save | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

**Name of constituency : 109 - Aurangabad East**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**



**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 103-Bhokardan | Santosh Raosaheb Danve | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

**Name of constituency : 103 - Bhokardan**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# चार विधानसभा मतदारसंघात १५२३ मतदान केंद्रावर १४ लक्ष ४ हजार मतदार बजावणार मतदानाचा हक्क

**✻ सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजतापर्यंत मतदान** **✻ मतदान केंद्रावर मोबाईल सोबत नेण्यास प्रतिबंध** **✻ सैन्य दलात असलेले २६१२ मतदार करतील मतदान**

### ३५९१ ज्येष्ठ व दिव्यांग मतदार गृहभेट पोस्टल मतपत्रिकेतून करणार मतदान...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० नोव्हेंबर -**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता जिल्ह्यातील उमरगा, तुळजापूर, उस्मानाबाद आणि परंडा या विधानसभा मतदारसंघातील १५२३ मतदान केंद्रावर २० नोव्हेंबर रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजतापर्यंत मतदान होणार आहे. या निवडणुकीत १४ लक्ष ४ हजार १२ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहे. या मतदारांव्यतिरिक्त सैन्य दलात कार्यरत असलेले जिल्ह्यातील २६१२ मतदार ऑनलाईन पद्धतीने मतदानाचा हक्क बजावणार आहे.

मतदान केल्याचा गोपनीयतेचा भंग होऊ नये यासाठी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाच्या दिवशी सर्व मतदारांना मतदान कक्षात मोबाईल सोबत घेऊन जाण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघात अनुक्रमे उमरगा विधानसभा मतदारसंघातील ३२१, तुळजापूर मतदारसंघात ४१०, उस्मानाबाद मतदारसंघात विधानसभा मतदार ४१६ आणि परंडा विधानसभा मतदारसंघात ३७६ केंद्र असे एकूण १५२३ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. नवीन मतदार नोंदणी तसेच दुरुस्ती व आवश्यक वगळणीअंती २९ ऑक्टोबर २०२४ रोजी अंतिम केलेल्या मतदार यादीनुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी उमरगा विधानसभा मतदारसंघात १ लक्ष ६६ हजार ३० पुरुष, १ लक्ष ४९ हजार ३५५ स्त्री व ९ तृतीयपंथी असे एकूण ३ लक्ष १५ हजार ३९४ मतदार, तुळजापूर विधानसभा मतदारसंघात २ लक्ष १ हजार २५ पुरुष, १ लक्ष ८२ हजार ४५ स्त्री आणि ७ तृतीयपंथी असे एकूण ३ लक्ष ८३ हजार ७७ मतदार, उस्मानाबाद विधानसभा मतदारसंघात १ लक्ष ९६ हजार



३५२ पुरुष, १ लक्ष ७८ हजार ३९९ स्त्री आणि १७ तृतीयपंथी असे एकूण ३ लक्ष ७४ हजार ७६८ मतदार आणि परंडा विधानसभा मतदारसंघात १ लक्ष ७५ हजार २२१ पुरुष, १ लक्ष ५५ हजार ५४६ स्त्री आणि सहा तृतीयपंथी असे एकूण ३ लक्ष ३० हजार ७७३ मतदार मतदानाचा हक्क बजावतील.

यामध्ये ७ लक्ष ३८ हजार ६२८ पुरुष, ६ लक्ष ६५ हजार ३४५ स्त्री आणि ३९ तृतीयपंथी असे चारही मतदारसंघात १४ लक्ष ४ हजार १२ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहे.

ज्या मतदारांचे वय ८५ वर्षापेक्षा जास्त आहे असे वयस्क मतदार जिल्ह्यातील एकूण चारही मतदारसंघात ३००८ इतके आहे. तर दिव्यांग असलेले ५८३ मतदार आहे. उमरगा विधानसभा मतदारसंघातील ८५ वर्षावरील ६१३ आणि दिव्यांग १९४ असे ८०७ मतदार १६ ते १८ नोव्हेंबर दरम्यान ४० नियुक्त ग्रुप भेट मतदान पथकाच्या माध्यमातून विशेष गृहभेट पोस्टल मतपत्रिकेतून घरीच मतदान करणार आहे.

तुळजापूर विधानसभा मतदारसंघात ५८३ मतदार हे ८५ वर्षावरील आणि ९३ मतदार हे दिव्यांग असे एकूण सात ६७६ मतदार ९ ते १० नोव्हेंबर दरम्यान गृहभेट मतदान पथकाच्या माध्यमातून घरीच मतदान करतील. उस्मानाबाद विधानसभा मतदारसंघात ८५ वर्षावरील १११७ आणि दिव्यांग १६९ एकूण १२८६ मतदार हे १५ ते १७ नोव्हेंबर दरम्यान २५ गृह भेट मतदान पथकाच्या माध्यमातून मतदान करतील आणि परंडा विधानसभा मतदारसंघातील ८५ वर्षावरील ६९५ मतदार आणि १२७ दिव्यांग मतदार असे एकूण ८२२ मतदार हे १६ ते १८ नोव्हेंबर दरम्यान ३७ गृहभेट पथकाच्या माध्यमातून घरीच मतदान करणार आहे.

जिल्ह्यातील ८५ वर्षावरील ३००८ आणि दिव्यांग असलेले ५८३ असे एकूण ३५९१ मतदार हे १३२ मतदान पथकाच्या माध्यमातून घरीच मतदान करणार आहे.

---

# भारतीय जनता पार्टी धाराशिव तालुका कार्यकारिणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० नोव्हेंबर -**

धाराशिव जिल्हयाचे दमदार लोकप्रिय आमदार राणाजगजितसिंह पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, भाजपा जिल्हाध्यक्ष संताजीराजे चालुक्य पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाध्यक्ष राजेंद्र बाळासाहेब पाटील यांनी भाजपा तालुका कार्यकारिणी जाहीर केली आहे.

तालुकाउपाध्यक्ष बाळासाहेब विश्वनाथ खांडेकर येवती, विजय महादेव हाऊळ जागजी, नानासाहेब परसराम वाघ तडवळा, मनोज अंकुशराव रणखांब गडदेवधरी, दत्तात्रय विनायक देशमुख पोहनेर, नवनाथ मधुकर नायकवाडी तेर, व्यंकट विनायकराव पाटील महाळंगी, तानाजी हारिराम गायकवाड टाकळी बें, प्रमोद देशमुख ढोकी, अहमद पठाण ताकवीकी, गणेश उध्दव पाटील वरुडा, दत्तात्रय (बप्पा) लक्ष्मण पडवळ उपळा, सुरेश नरसु फेरे तावरजखेडा, युवराज तुकाराम ढोबळे समुद्रवाणी, झुंबर आबा बोडके ढोकी.

सरचिटणीस हिम्मत भुजंगराव भोसले गावसुद, गोपाळ बबन कदम वाणेवाडी, निलकंठ श्रीमंत पाटील लासोना, नितेश शिवाजी इंगळे बेंबळी, भास्कर लक्ष्मण माळी तेर, नामदेव अण्णासाहेब नायकल सांजा, प्रविण माणिकराव भद्रे पाटोदा, दशरथ भागवत पाटील उपळा, काकासाहेब हरिशचंद्र शेलार मेडसिंगा, लिंबराज वसंतराव साळुंके करजखेडा, अनिल अजिनाथ शिंदे घाटंग्री, अमोल सुरेश पाटील आरणी, विलास जगनाथ रसाळ ढोकी, प्रदिप वीर आळणी, दयानंद भोईटे सकनेवाडी.

चिटणीस हरिप्रसाद गणेश तिवारी ढोकी, काकासाहेब अभिमान शेळके बामणी, संतोष लक्ष्मण आगलावे बेंबळी, विजय तुकाराम हाजगुडे किणी, सतिष यशवंतराव जाधव चिलवडी, अतुल राजेसाहेब देशमुख आंबेजवळगा, अमर गौतमराव बाकले सारोळा, बजरंग खंडेराव पाटील ईला, उत्कर्ष राजेंद्र लोखंडे येडशी, विनोद राजेंद्र गरड खेड, पवन वाघमोडे गोवर्धन वाडी, रमेश भासले हिंगळजवाडी, बालाजी संपतराव भोसले गौडगाव, तात्याराव शिंदे वाडीबामणी, अजित मोतीलाल पवार पाडोळी. कोषाध्यक्ष नवाब पठाण बेंबळी सहकोषाध्यक्ष संजय दाळवे कनगरा, प्रसिदधीप्रमुख अनिल भुतेकर. तालुका कार्यकारणी सदस्यपदी संजय आगळे रुईभर, कुंद व्यकटराव पाटील चिखली, सचिन ऐडके भंडारवाडी, मनोज पाटील कामेगाव, शहाजी भोसले भानसगाव, सदाभाऊ साखरे नितळी, हरिभाऊ भिंगडे देवळाली, सुधाकर पाटील टाकळी ढोकी, बाबुराव पाटील डकवाडी, रमेश वैष्णव गायकवाड अंबेहोळ, तानाजी रामहारी माने अनसुर्डा, पोपट बळीराम ढवळे बरमगाव (बु), भारत जमदाडे ढोकी, अच्युत जराड कावळेवाडी, नानासाहेब पवार रुईभर, पद्माकर निकम बेंबळी, गणेश रामभाऊ पवार वाखरवाडी, बाळासाहेब पाटील रुई ढोकी महिला मोर्चा तालुकाध्यक्ष श्रीमती उषा सुरेश यरकळ (सर्जे) रामवाडी. युवा मोर्चा तालुकाध्यक्ष अजित खापरे बेंबळी. वकिल सेल ॲड. विजयकुमार महिपती बोंदर उतमी का. अल्पसंख्याक सेल तालुका संयोजक जुनेद उबेद मोमीन तेर. किसन मोर्चा तालुका संयोजक नानासाहेब कदम आबेंवाडी. ओ.बी.सी मोर्चा तालुका संयोजक नागराज खंडु गडदे येवती. तालुका सहसंयोजक सचिन वामन घुटुकडे वाणेवाडी, एस.टी मोर्चा तालुका संयोजक सुरजित सुधाकर राऊत कोळेवाडी, व्यापारी आघाडी तालुका संयोजक विजय भास्कर मुळे पानवाडी, एस.सी. मोर्चा तालुका संयोजक राहुल अशोक जाधव कोंड, एस.सी. मोर्चा सह संयोजक त्रिंबक सुर्यवंशी पाटोदा, संस्थाचालक आघाडी तालुका संयोजक श्रीराम विजयकुमार पाटील येवती, सहकारी आघाडी तालुका संयोजक दिलीप एकनाथ पाटील वाघोली, सोशल मिडीया तालुका संयोजक प्रशांत श्रीमंत रणदिवे सारोळा, सोशल मिडीया तालुका हसंयोजक अमोल व्यंकट हुबाले येवती, सोशल मिडीया तालुका सहसंयोजक महेश लांडगे मेडसिंगा, भटक्या विमुक्त जाती तालुका संयोजक बालाजी तेरकर गावसुद, अपंग आघाडी तालुका संयोजक पवन ढेकने कौडगाव बावी, व्यावसाय आघाडी तालुका संयोजक शिराज अहमद मुल्ला ढोकी, सांस्कृतीक विभाग आघाडी तालुका संयोजक प्रमोद गुणवंतराव माने अनसुर्डा.

सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना आ. राणाजगजितसिंह पाटील, माजी आ. सुजीतसिंह ठाकुर, भाजपा जिल्हाध्यक्ष संताजीराजे चालुक्य पाटील यांच्या सह भाजपच्या सर्व जेष्ठ पदाधीकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या.

---

# तुळजापूरचा कायापालट हेच ध्येय : आ. राणाजगजितसिंह पाटील

## तुळजापूर शहरात महायुतीचे मोठे शक्तीप्रदर्शन... रेकॉर्डब्रेक गर्दी...





**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० नोव्हेंबर -**

तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्राचा कायापालट हेच आपले ध्येय आहे. जगदंबेच्या आशीर्वादाने मागील पाच वर्षांत तुळजापूर मतदारसंघाची सेवा करण्याचे भाग्य लाभले. तीर्थक्षेत्र तुळजापूर रेल्वेच्या राष्ट्रीय नकाशावर नोंदविता आले. जागतिक दर्जाचे धार्मिक पर्यटन तुळजापूर शहरात विकसित करण्यासाठी दोन हजार कोटी रूपयांचा विकास आराखडा अंतिम करण्यात आला आहे. रोजगार निर्मितीकडे आपले विशेष लक्ष आहे. तुळजापूरचा कायापालट होत आहे. जिल्ह्याचाही सर्वार्थाने कायापालट करण्यासाठी आपल्या सर्वांचे सहकार्य आणि सोबत महत्वपूर्ण असल्याचे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले.

तुळजापूर शहरात महायुतीचे उमेदवार आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रचारार्थ रविवारी सायंकाळी भव्य आशीर्वाद यात्रा पार पडली. यावेळी ते बोलत होते.

रविवारी सायंकाळी ४ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून सामूहिक अभिवादन करून आशीर्वाद यात्रेस प्रारंभ झाला. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते भवानी रोड, महाद्वार रोड, कमान वेस गल्ली या प्रमुख मार्गावरून तुळजाभवानी मंदिरापर्यंत ही आशीर्वाद यात्रा काढण्यात आली. त्यानंतर आशिर्वाद यात्रेचे भव्य सभेत रूपांतर झाले.

तुळजाभवानी मंदिरासह परिसरात विकासकामे करून, पर्यटक व भाविकांच्या संख्येत दुपटीने वाढ होण्यासाठी आवश्यक ती विकासकामे सुरू करण्यात आली आहेत. त्यामुळे स्थानिक व्यापाऱ्यांना आणखी पर्यायी व्यवसाय करून आपले उत्पन्न दुपटीने वाढविता येणार आहे. तुळजापूरकरांना विश्वासात घेवूनच सर्व विकासकामे करायचे आहेत. ठाकरे सरकारने रेल्वे प्रकल्पासाठी एक रूपयाही दिला नाही, अडीच वर्षे काम थांबले होते. त्यासाठी आपण परिवहन मंत्र्यांवर हक्कभंग आणला. शेवटी साडेचारशे कोटी रूपयांचा निधी महायुती सरकारनेच उपलब्ध करून दिला आणि रेल्वेमार्गाचे काम चालू झाले.

केंद्र सरकारच्या प्रशाद योजनेसाठी तीर्थक्षेत्र तुळजापूरचा विकास आराखडा तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने पाठवावा, यासाठी आपण पाठपुरावा केला होता.

मात्र ठाकरे सरकारने ऐकले नाही. शेतकर्यांना कर्जमाफी, वीजबिल माफी महायुती सरकारनेच दिली. मुलींना मोफत उच्च शिक्षण दिले, लाडक्या बहिणींना महिन्याला दीड हजार रूपये लाभाची योजना सुरू केली. त्यामुळे विरोधकांना अडीच वर्षात महायुती सरकारने काय केले, हे विचारण्याचा नैतीक अधिकार राहिला नाही.

नळदुर्गला बसवसृष्टी उभारली जात आहे, तुळजापुरात अहिल्यादेवी होळकरांचे स्मारक, बौध्द विहार, शादीखान्याचे भूमिपूजन केले. हा फक्त विकासाचा ट्रेलर आहे. विकासाचा पिक्चर अजून बाकी आहे आणि त्यासाठी सर्वांची साथ हवी असल्याचे मत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केले.

---

### राज्यस्तरीय लांब उडी स्पर्धेसाठी जाधव हिची निवड

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१० नोव्हेंबर -**

वाशी येथील अजिंक्य विद्यामंदिर ची विद्यार्थिनी कल्याणी जाधव हिची राज्यस्तरीय लांब उडी मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विभागीय स्पर्धेत तिने प्रथम क्रमांक पटकावला होता.

विभागीय स्तरावरील मैदानी क्रिडा स्पर्धा झाल्या होत्या. या स्पर्धेत वाशी येथील अजिंक्य विद्यामंदिर या शाळेची विद्यार्थिनी कल्याणी बालाजी जाधव हिने १४ वर्ष वयोगटातून प्रथम क्रमांक पटकावला होता. तिच्या या यशामुळे रत्नागिरी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी तिची निवड झाली. तिचा यशाबद्दल संस्थेचे संस्थापक श्रीधर पवार यांनी तिचा सत्कार केला. याप्रसंगी विभागीय स्पर्धेत सहभागी झालेल्या नेहा नितीन भंडारे, मार्गदर्शन करणारे शिक्षक शिंदे व ढेपे यांचाही सत्कार मुख्याध्यापक लक्ष्मीकांत पवार व संस्थापक श्रीधर पवार यांनी केला.

---

# सरकार बदलल्याशिवाय शांत बसणार नाही : शरद पवार



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० नोव्हेंबर -**

हे सरकार बदलल्याशिवाय मी म्हातारा होणार नाही. शांत बसणार नाही', असे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले आहे. आता एक म्हातारा खांद्यावर बसून आलेला पहिला का? असेही पवार म्हणाले. परंडा विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार यांच्या प्रचारासाठी दि.१० नोव्हेंबर रोजी आठवडा बाजार येथे आयोजित केलेल्या सभेत शरद पवार बोलत होते.

यावेळी खासदार ओमराजे निंबाळकर, शिवसेना जिल्हाप्रमुख रणजित पाटील, मेघराज पाटील, ॲड. हनुमंत वाघमोडे, रमेश परदेशी, राहुल बनसोडे, सुजित देवकते, श्रीहरी नाईकवाडी, नसीर शहा बर्फीवाले, नंदू शिंदे आदीसह महाविकास आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

परंडा विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार मैदानात आहेत. तर त्यांच्या विरोधात शिवसेना शिंदे गटाचे तानाजी सावंत निवडणूक लढवत आहेत. या लढतीकडे पूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. संविधान बदलण्यासाठी ४०० पार ची घोषणा केली.

मात्र तुम्ही लोकांनी निर्णय हाती घेतला. तुम्ही आम्ही एकत्र झालो आणि महाराष्ट्रातील ४८ खासदारापैकी ३१ खासदार तुम्ही निवडून दिले आणि घटना वाचवायचे काम तुम्ही केल्याचे शरद पवार यावेळी म्हणाले.

ही विधानसभा तुमच्या विचाराच्या लोकांच्या हातात पाहिजे. सत्ता हातात आल्यावर लोकांचे प्रश्न सोडवता येतात असेही शरद पवार बोलले.

दुष्काळाला तोंड देणारा, रोजगार हमीच्या कामावर जाणारा तुमच्यासारखा शेतकरी ऊस उत्पादन करतोय. माझा बळीराजा सुखी झाला पाहिजे, त्याच्या घरातील मुले उच्चशिक्षित झाली पाहिजेत. त्यासाठी आम्ही काम हातात घेतले आहे. महाविकास आघाडीचे संघटन उभे केले आहे. महिलांना अधिकार दिले की महिला काहीही करू शकतात.

महिलांना संधी देण्यासाठी महालक्ष्मी योजना काढल्याचे शरद पवार यांनी यावेळी म्हटले.

---

# तुळजाभवानी मंदिरात दर्शनाला आलेल्या सोलापूरच्या महिलेचे मंगळसूत्र चोरी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१० नोव्हेंबर -**

तुळजाभवानी मंदिरात दर्शनासाठी आलेल्या महिलेचे २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र चोरीला गेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, निकिता अक्षय कुंदारम (वय २६, रा. हुचन नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, त्या १० नोव्हेंबर रोजी पतीसह तुळजाभवानी मंदिरात दर्शनासाठी आल्या होत्या.

त्यावेळी गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील २० ग्रॅम वजनाचे, अंदाजे ९० हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र चोरून नेले. या घटनेची माहिती मिळताच तुळजापूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे. अज्ञात चोरट्याचा शोध घेतला जात आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंदिरात अशा प्रकारच्या चोऱ्यांचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे भाविकांनी आपल्या मौल्यवान वस्तूंची काळजी घेण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

---

# शेतकऱ्यांनी मूग, उडीद व सोयाबीन खरेदी केंद्रावर जावून नोंदणी करा

### जिल्हा पणन अधिकारी यांचे आवाहन....

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० नोव्हेंबर -**

खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये जिल्हयात आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत नाफेडमार्फत तालुकानिहाय १७ केंद्रावर मुग, उडीद व सोयाबीन या पिकाची ऑनलाईन शेतकरी नोंदणीस १ ऑक्टोबरपासून सुरूवात झाली आहे. शेतकऱ्यांनी आपल्या जवळच्या खरेदी केंद्रावर स्वतः जावून ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी यांनी केले आहे.

शेतकऱ्यांनी पिकांच्या नोंदणीसाठी आपले आधार कार्ड, राष्ट्रीयकृत बँकेचे छापील पासबुक (अकाउंट नंबर व आय.एफ.एस.सी.कोड स्पष्ट दिसावा), ऑनलाईन पीक पेरा असलेला ७/१२ उतारा घेवून पिकाची नोंदणी करावी.

शासनाकडून मूग, उडीद, सोयाबीन या पिकांसाठी नोंदणी कालावधी निश्चित करण्यात आला आहे. यामध्ये मूग आणि उडीद या पिकासाठी १ ऑक्टोबरपासून सुरुवात झाली आहे. तर त्यांचा खरेदी कालावधी हा १० ऑक्टोबरपासून ७ जानेवारी २०२५ पर्यंत असणार आहे.



तर सोयाबीन पिकासाठी १५ ऑक्टोबर २०२४ पासून खरेदीस सुरुवात झाली आहे. ही खरेदी १२ जानेवारी २०२५ पर्यंत नाफेडकडून करण्यात येणार आहे. मुग, उडीद, सोयाबीन या पिकांच्या आधारभूत किंमतीही निश्चित करण्यात आल्या आहेत. यामध्ये मुग पिकासाठी ८ हजार ६८२ रूपये प्रति क्विंटल, उडीद पिक ७ हजार ४०० रूपये प्रति क्विंटल, सोयाबीन ४ हजार ८९२ रूपये प्रति क्विंटल दराने निश्चित करण्यात आला आहे.

याबरोबरच तालुकानिहाय खरेदी केंद्र आणि सबएजंट संस्थेची नेमणूकही करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी शासनमान्य हमीभाव खरेदी केंद्रावर सोयाबीन शेतमाल घेवून येतांना व्यवस्थितरित्या वाळवून आणावा.

जेणेकरून आर्द्रता मोजतांना १२ टक्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे. जास्त आर्द्रतेमुळे शेतमाल परत नेण्याची वेळ येणार नाही, असेही आवाहन जिल्हा पणन अधिकारी एम.व्ही. बाजपेयी यांनी केले आहे.


# नमिता मुंदडा यांच्या प्रचारार्थ अंबाजोगाईत उद्या केंद्रीय मंत्री नितीन गडकरी सभा

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१० नोव्हेंबर**

भाजपा महायुतीच्या अधिकृत उमेदवार सौ.नमिता अक्षय मुंदडा यांच्या प्रचारार्थ अंबाजोगाईत मंगळवार, दिनांक १२ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता श्री शंकर महाराज वंजारी विद्यार्थी वसतिगृह येथे देशाचे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग विभागाचे मंत्री ना.नितीन गडकरी, भाजपा राष्ट्रीय सचिव, लोकनेत्या आ.पंकजाताई मुंडे यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. अशी माहिती केज भाजपा महायुतीच्या वतीने देण्यात आली आहे.



केज विधानसभा मतदारसंघ सार्वत्रिक निवडणुक २०२४ निमित्त भाजपा महायुतीच्या अधिकृत उमेदवार सौ.नमिता अक्षय मुंदडा यांच्या प्रचारार्थ अंबाजोगाईत मंगळवार, दिनांक १२ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता श्री शंकर महाराज वंजारी विद्यार्थी वसतिगृह येथे देशाचे केंद्रीय रस्ते विकास आणि महामार्ग मंत्री आदरणीय ना.नितीनजी गडकरी, भाजपा राष्ट्रीय सचिव, लोकनेत्या आ.पंकजाताई मुंडे यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. अशी माहिती केज भाजपा महायुतीच्या वतीने देण्यात आली आहे. तरी या सभेसाठी भाजपा, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट), रिपाइं (आठवले गट) आणि महायुतीच्या घटक पक्षांचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे अशी नम्र विनंती व आवाहन ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, युवा नेते अक्षय मुंदडा व केज विधानसभा मतदारसंघ भाजपा महायुतीच्या वतीने करण्यात आले आहे.



**सभेस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे केज भाजपा महायुतीचे आवाहन**

# तुम्ही आमदार निवडून द्या; मी या मतदारसंघाचं सोन करीन– शरद पवार

ज्यानी २०१९ च्या निवडणुकीत कृषीमंत्र्यांना निवडून दिलं त्यांनीच परळीतील नागरिकांची झोप उडवली– राजेसाहेब देशमुख

शरद पवार यांच्या परळीतील सभेने महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या विजयावर शिक्कामोर्तब

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१० नोव्हेंबर**



बीड जिल्ह्याचा आणि परळी विधानसभा मतदारसंघाचा मोठ्या प्रमाणावर विकास बाकी आहे. जनतेच्या अनेक समस्या आमच्याकडे आलेल्या आहेत. तुम्ही राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या आणि महाविकास आघाडीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांना बहुमताने निवडून द्या, मी या मतदारसंघाचं सोने करून दाखवीन. या भागात मोठ्या प्रमाणावर उद्योग आणून तरुणांच्या हाताला काम मिळवून देऊ. त्याचबरोबर जनतेचा मूलभूत विकास करून दरडोई उत्पन्नात वाढ करण्याचा प्रयत्न आहे. एकही शेतकऱ्यांची समस्या उरणार नाही असा इथला आमदार काम करेल असा शब्द शरद पवारांनी परळीच्या भव्य विराट सभेस उपस्थित जनतेला दिला. स्व.रघुनाथराव मुंडे आणि माजी नगराध्यक्षा राधाबाई बियाणी यांनी आमच्या उमेदीच्या काळात पक्षाचे चांगले काम केले आहे. परंतु स्वर्गीय रघुनाथराव मुंडे यांचा अकाली मृत्यू कशामुळे झाला? याचं कोडं अद्याप उलगडलं नाही. म्हणून त्यांची आजही आठवण येत असल्याचा उल्लेखही त्यांनी आवर्जून केला. परळी विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ आयोजित केलेल्या जाहीर सभेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी प्रतिपादन केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या झालेल्या जाहीर सभेने महाविकास आघाडीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या विजयावर एक प्रकारे शिक्कामोर्तब झाला आहे.यावेळी व्यासपीठावर शरदचंद्र पवार यांच्यासह पक्ष निरीक्षक जीवनराव गोरे, राष्ट्रवादी काँग्रेस केंद्रीय महिला आघाडीच्या अध्यक्षा खासदार फौजिया खान, काँग्रेसच्या खासदार रजनीताई पाटील, बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे, होळकर घराण्याचे वंशज भूषणसिंह राजे होळकर, राष्ट्रवादी काँग्रेस डॉक्टर सेलचे प्रदेशाध्यक्ष डॉ. नरेंद्र काळे, माकपचे नेते ऍड. अजय बुरांडे, राजेभाऊ फड, राजेश देशमुख, प्रभाकर वाघमोडे, ज्येष्ठ नेते बाळासाहेब देशमुख, आष्टी विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार महबूब शेख, ज्येष्ठ नेते फुलचंद कराड ,ज्येष्ठ नेत्या सुदामतीताई गुट्टे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अनिल मुंडे, शहराध्यक्ष सय्यद हनीफ सय्यद करीम उर्फ बहादुर भाई, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज, शहराध्यक्ष जीवनराव देशमुख, यांच्यासह महाविकास आघाडीचे नेते पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी खासदार फौजिया खान, खासदार रजनीताई पाटील, खासदार बजरंग सोनवणे, वैद्यनाथ देवल कमिटीचे विश्वस्त राजेश देशमुख, माकपचे कॉम्रेड अजय बुरांडे उत्तम माने आदींची भाषणे झाली.

# पंकजा मुंडे यांची धारुर येथे महायुतीचे उमेदवार प्रकाशदादा सोळंके यांच्या प्रचारार्थ जोरदार सभा

## मी अधिकृत काम करते. अनधिकृत कामे किंवा बंडखोरी स्वीकारता येणार नाही

**तभा वृत्तसेवा**
**धारूर दि.१० नोव्हेंबर–**

भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजा मुंडे यांनी धारुर शहरात महायुतीचे अधिकृत उमेदवार प्रकाशदादा सोळंके यांच्या प्रचारार्थ एक भव्य जाहिर सभा आयोजित केली. या सभेतील त्यांच्या भाषणात त्यांनी महायुतीची एकजुट, कार्यकर्त्यांचे योगदान आणि प्रकाशदादा सोळंके यांच्या विजयावर जोरदार प्रकाश टाकला.



सभेत बोलताना पंकजा मुंडे यांनी भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांना प्रेरित केले, देशाचे नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्राप्रमाणे, 'देश प्रथम' हे आपले लक्ष्य आहे. त्यांनी महायुतीच्या कार्यकर्त्यांचे कौतुक करून सांगितले की, आमच्याकडे सच्चे व प्रामाणिक कार्यकर्ते आहेत आणि या युतीधर्माच्या पालनासाठी मी येथे आले आहे.

बंडखोरीवर बोलताना पंकजा मुंडे यांनी स्पष्ट केले की, मी अधिकृत काम करते. अनधिकृत कामे किंवा बंडखोरी स्वीकारता येणार नाही. त्यांनी असे म्हटले की, कोणी गैरवापर करत असेल तर भुलथापांना बळी न पडता महायुतीचे उमेदवार प्रकाशदादा सोळंके यांना प्रचंड मतांनी विजयी करण्याची गरज आहे. महायुतीचे मुख्यमंत्री करण्यासाठी आपल्याला हात वर करणारा आमदार आवश्यक आहे. त्यासाठी प्रकाश दादा सोळंके यांना निवडून द्या, असे त्यांनी आवाहन केले. यावेळी महायुतीचे उमेदवार प्रकाशदादा सोळंके, राष्ट्रवादी युवकाचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, माजी नगराध्यक्ष डॉ. स्वरुपसिंह हजारी, माजी जि.प. सभापती जयसिंगभैय्या सोळंके यांच्यासह महायुतीच्या घटक पक्षातील अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. या सभेला पंचक्रोशीतील मतदारांची मोठ्या संख्येत उपस्थिती होती.

# संदिप भैय्या येणाऱ्या काळात महत्वाच्या पदावर असतील–शरद पवार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० नोव्हेंबर**

बीड मतदारसंघातून महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आ.संदिप क्षीरसागर यांच्या प्रचारासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे खा.शरदचंद्र पवार यांनी रविवार दि.१० रोजी बीड शहरात सभा घेतली. यावेळी राज्यात सत्ता आल्यानंतर संदिपभैय्या महत्वाच्या पदावर बसलेले असतील, त्यांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्या, असे उद्‌गार बीडच्या सभेत खा.शरद पवार यांचे होते. बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे शनिवार दि.९ नोव्हेंबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार), भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) व मित्र पक्षांची महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार विद्यमान आ.संदिप क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ, खा.शरदचंद्र पवार यांनी विजयी सभा घेतली. यावेळी राज्यात आणि देशातील जनतेच्या मनात या सरकारच्या धोरणामुळे एकप्रकारची अस्वस्थता आहे. बळीराजाला आपला जीव द्यावा लागत आहे. राज्यात उद्योगधंद्याची गरज असतांना उद्योगधंदे बाहेर पाठवले जात आहेत. आमचे सरकार आल्यानंतर उद्योगधंदे वाढीसाठी आम्ही करू. अडचणीच्या काळात संदिप भैय्या विचारासोबत आणि भूमिकेसोबत राहिले त्यामुळे आता तुम्ही संदिप भैय्यांच्या मागे उभे रहावे. यावेळी खा.बजरंग सोळंके, राजे भूपनसिंह होळकर, माजी आ.सय्यद सलिम, माजी आ.बदामराव पंडित, माजी आ.पृथ्वीराज साठे, माजी आ.संगिताताई ठोंबरे, प्रा.नितेश कराळे, रविंद्र दळवी आदि उपस्थित होते.



# माजलगावात आज महर्षि योगीश्वर याज्ञवल्क्य जयंती महोत्सव

## तिन दिवस विवीध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१० नोव्हेंबर**

शहरातील भट गल्ली येथील श्रीराममंदिर येथे महर्षि योगीश्वर याज्ञवल्क्य जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन दि. ११ ते १३ नोव्हेंबर दरम्यान विवीध कार्यक्रमाने महोत्सव साजरा करण्यात येणार असल्याची माहिती स्वागतोत्सुक मधुकर रामदासी यांनी दिली आहे.

महर्षि योगीश्वर याज्ञवल्क्य जयंती महोत्सवात दि. ११ सोमवारी सकाळी ९ ते १२ वेळेत महागणपती पूजन, गोपुजन, पुण्याहवाचन वेदपारायण, दु. २ ते ५ संहिता पारायण, सायं. ६ ते ८ सायंपूजा, अष्टोरशत १०८ पुष्पार्चना व पारायण, दि. १२ मंगळवारी स. ८.३० ते १२ बृहदारण्यक उपनिषद् पारायण, दु. २.३० ते ५ संहिता पारायण, दि. १३ बुधवारी सकाळी ८ ते १०.३० पारायण समापन, ११ ते १२.३० ह.भ.प. लक्ष्मीप्रसाद पटवारी यांचे व्याख्यान व यानंतर महाप्रसादाचे आयोजन दु. २ ते ५ या वेळेत करण्यात आले आहे. दि. ११ सकाळी ९ वाजता डॉ. प्रकाश आनंदगांवकर, भागवताचार्य आबादेव जोशी, चंद्रकांत झेंड, मधुकर रामदासी, अनंत भोले, नंदकुमार आनंदगावकर, दिगंबर महाजन, वेदमुर्ती योगेश जोशी, नारायण जोशी यांच्या हस्ते दिपप्रज्वलन व ग्रंथपुजन होणार आहे. या महोत्सवात भाविक – भक्तांनी सहभागी व्हावे असे आवाहन स्वागतोत्सुक मधुकर रामदासी, योगेश मुळे, किरण जोशी, ऋषिकेश पोखरकर यांनी केले आहे.

# शिवसेना महविकास आघाडीचा धर्म पाळण्यास वचनबद्ध

मोहन जगताप यांना मतदारसंघातून बहुमत देणार–सतीश बप्पा सोळंके
मित्र पक्षाच्या एकाही कार्यकर्त्याला वाऱ्यावर सोडणार नाही– मोहन जगताप

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१० नोव्हेंबर**

शिवसेना हा महाविकास आघाडीचा प्रमुख घटक असून लोकसभा निवडणुकीत देखील आम्ही आघाडीच्या उमेदवारास बहुमताने विजयी करण्यात मोठी भूमिका निभावली होती.आता माजलगाव विधानसभा निवडणुकीत देखील शिवसेना आघाडीचा धर्म पाळून संपुर्ण ताकदीने महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन जगताप यांना मोठे बहुमत देऊन विजयी करण्यासाठी सर्व शिवसैनिक जिवाचे रान करणार असल्याची ग्वाही शिवसेनेचे माजी तालुकाप्रमुख सतीश सोळंके यांनी दिली.तर माझ्यासाठी जिवाचे रान करणाऱ्या मित्र पक्षाच्या एकाही कार्यकर्त्याला वाऱ्यावर सोडणार नाही, त्यांना निश्चितपणे न्याय दिला जाईल अशी ग्वाही महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन जगताप यांनी दिली.

माजलगाव तालुक्यातील श्री क्षेत्र गंगामसला येथे रविवारी आयोजित शिवसेना बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी शरद पवार, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस यांच्या आयोजित बैठकीत ते बोलत होते यावेळी बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे माजलगाव विधानसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन जगताप, दयानंद स्वामी,सहाल चाऊस, नितीन नाईकनवरे, कचरू खळगे, अरूण इंगळे,शिवसेनेचे अनंत सोळंके, गणेशराव सोळंके,रमेश खामकर,माउली काशीद ,लक्ष्मण सोळंके, उपसरपंच प्रमोद सोळंके,माजी सरपंच सत्यभान गवळी, रंगनाथ पंडित, विक्रम सोळंके,मोहन सोळंके,सचिन सोळंके, संदिप सोळंके ,महेश सोळंके,अभिजित सोळंके, किशोर सोळंके,अमोल सोळंके,योगेश सोळंके ,सलीम पठाण,शेख गुलाब बाशू मिया, शेख राशिद,शेख बाबू, मजीद खान,जमील पठाण, कयुम खान, वाहेद शाह,शंकर माने ,खुर्शीद पठाण, कैलास धरपडे यांचेसह अनेकांची उपस्थीती होती. यावेळी पुढे बोलताना सतीश सोळंके म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत शिवसेना आघाडीचे उमेदवार मोहन जगताप यांच्या विजयासाठी जीवाचे रान करून त्यांना निवडून आणणार आहे.त्यासाठी आम्ही मेहनत घेऊन तालुक्यातील प्रत्येक बुथवर लीड देऊ, गंगामसला काय तालुक्यातून मोठे मताधिक्य देऊ अशी ग्वाही दिली.

# ग्रामीण भागात कुंडलिक खांडेंना संपर्क वाढला

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० नोव्हेंबर**

कायम लोकांच्या अडी अडचणीला धावून जाण्याचे आणि त्यांच्या सुखदुःखात सहभागी होण्याचे कार्य कुंडलिक खांडे यांनी केले आहे. अनेक नेते केवळ निवणूक आली की लोकांच्या भेटीगाठी घेतात आणि त्यांच्या समस्या सोडविण्याचे दिखावा करतात मात्र खांडे यांनी निवडणूक असो किंवा, नसो त्यांचे सामाजिक कार्यापासून आणि लोकांना मदत करण्यापासून कधीच बंद राहिले नाही. त्यामुळेच या विधानसभा निवडणूकीत खांडे यांना ग्रामीण भागातून जोरदार समर्थन मिळत असल्याचे दिसत आहे. गावागावात सध्या एकच नारा येत आहे तो म्हणजे कुंडलिक खांडे है हमारा.



शासकीय योजनांच्या माध्यमातून गोरगरिबांना आणि निराधारांना कायमची मदत मिळावी यासाठी खांडे हे कायम तत्पर असतात. प्रस्थापित घराणेशाहीला मुक्त करून बीड तालुक्याचा विकास करून राज्यात बीड मतदारसंघाची आणखी वेगळी ओळख निर्माण करण्याचा निर्धार केला आहे म्हणून महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे प्रमुख छत्रपती संभाजीराजे,ना.बच्चू कडू आणि माजी खा. राजू शेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली आपण बीड विधानसभा मतदार संघाचा चेहरा मोहरा बदलणार असून जनतेने मला मतदानरुपी आशिर्वाद द्यावेत असे आवाहन बीड मतदारसंघातील प्रचार दौऱ्याच्या निमित्ताने महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे उमेदवार कुंडलिक खांडे यांनी रविवार दि.१० नोव्हेंबर रोजी बीड तालुक्यातील विविध भागांचा दौरा करताना केले.

# विकासाचा दृष्टिकोन व कामात प्रामाणिकपणा म्हणून पवारांना पाठिंबा–कालिदास आपेट

**ऑटो रिक्षा समोरील बटन दाबून पवार लक्ष्मण माधवराव यांना विजयी करण्याचे केले आव्हान**



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१० नोव्हेंबर**

विधानसभा निवडणूक २०२४, २२८ गेवराई विधानसभा मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार पवार लक्ष्मण माधवराव यांच्याकडे विकासाचा दृष्टिकोन आहे. तसेच ते जे काम करतात ते काम प्रामाणिकपणे करतात, म्हणून शेतकरी संघटना लक्ष्मण पवार यांना पाठिंबा देत आहे. असे महाराष्ट्र शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदासजी अपेट हे शेतकरी संघटनेचे पाठिंबाचे पत्र लक्ष्मण पवार यांना देताना म्हणाले.

यावेळी बोलताना कालिदासजी आपेट पुढे म्हणाले की मागील दहा वर्षातील लक्ष्मण पवारांची काम करण्याची पद्धती पाहिली असता निश्चित रित्या येणाऱ्या काळात लक्ष्मण पवार हे शेतकऱ्यांचे प्रश्न सभागृहामध्ये मांडतील यात तिळमात्र शंका नाही.त्यांनी संपूर्ण गेवराई मतदार संघामध्ये रस्त्यांचे जाळे निर्माण केले आहे. येणाऱ्या काळात मुबलक वीज व मुबलक पाणी मिळावे यासाठी लक्ष्मण पवार यांचे प्रयत्न सुरू आहेत. शासनाच्या योजना जर तळागाळापर्यंत पोहोचावयाच्याअसतील तर लोकप्रतिनिधी प्रामाणिक असणे आवश्यक आहे. दहा वर्षातील लक्ष्मण पवारांच्या कामावरून हे निश्चित लक्षात येते की ही व्यक्ती जनतेप्रती प्रामाणिक आहे. निश्चितच स्वतःचा स्वार्थ साधणारी नाही, म्हणून अशा व्यक्तीच्या पाठीशी आपण उभे राहिले पाहिजे ही आमची भूमिका आहे.

शेतकरी संघटनेच्या पाठिंब्याचे पत्र अपक्ष उमेदवार पवार लक्ष्मण माधवराव यांना देताना कालिदासजी आपेट यांनी गेवराई विधानसभा मतदारसंघातील जनतेला असे आव्हान केले की येत्या २० तारखेला ऑटो रिक्षा समोरील बटन दाबून लक्ष्मण पवार यांना प्रचंड बहुमताने विजयी करा.अपक्ष उमेदवार पवार लक्ष्मण माधवराव यांनी शेतकरी संघटनेने दिलेल्या पाठिंबाबद्दल कालिदासजी आपेट व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे आभार व्यक्त केले. तसेच त्यांना अस्वस्थ केले सर्वसामान्य माणसांच्या व शेतकऱ्यांच्या अडचणी कमी करताना मी माझी संपूर्ण राजकीय ताकद पणाला लावेल कारण कुठल्याही वैयक्तिक स्वार्थासाठी मी राजकारणात आलेलो नाही.यावेळी शेतकरी संघटनेचे रघुनाथरावजी नावडे, रामेश्वरजी गाडे, रामप्रसादजी गाडे ,चंद्रकांतजी गावडे, राधाकिसनजी गाडे व शेतकरी संघटनेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# मसाप केंद्रीय कार्यकारणी निवडणुकीत दगडू लोमटे यांचा दणदणीत विजय!

**२५०४ पैकी २३४२ मते घेवून विक्रमी विजय**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१० नोव्हेंबर**

मराठवाडा साहित्य परिषद छत्रपती संभाजीनगर यांच्या २२ जागांसाठी कार्यकारी मंडळाची निवडणूक पूर्ण झाली. मतमोजणी ९ नोव्हेंबर रोजी पर पडली यात अंबाजोगाईचे दगडू लोमटे यांना एकूण झालेल्या २५०४ मतपैकी २३४२ एवढी मते पडून निवडून आले.



दर पाच वर्षांनी ही निवडणूक होत असते. मागच्या कार्यकारी मंडळात ते निवडणूक आले होते. त्यांना म.सा.प. च्या संस्कृतिक विभागाचे प्रमुख म्हणून कार्यकारणीने निवड केली होती. दुसऱ्यांचा ते निवडून आले आहेत. प्रा. राम चव्हाण यांनी निवडणूक आधिकारी म्हणून काम पाहिले.

ठाले पाटील गटाचे सर्व २२ उमेदवार २३०० पेक्षा जास्त मतांनी निवडणून आले. त्यात कौतिकराव ठाले पाटील, डॉ. दादा गोरे, के. एस. अतकरे, किरण सगर, डॉ. दीपा क्षीरसागर, डॉ. ऋषिकेश कांबळे, आसाराम लोमटे, देविदास फुलारी, डॉ. संजीवनी तडेगावकर, दगडू लोमटे, हेमलता हिंगमिरे पाटील, सरोज देशपांडे, रामचंद्र काळुंखे, संजीव कुलकर्णी, रामचंद्र तिरुके, संतोष तांबे, नितीन तावडे, अनंत कराड, प्राचार्य नामदेव वाबळे, प्रा. गणेश मोहिते, जयद्रथ जाधव व सुभाष कोळकर हे निवडून आले. बीड जिल्ह्यातून डॉ. दीपा क्षीरसागर, दगडू लोमटे व अनंत कराड यांना यावेळी संधी मिळाली आहे.विजयी उमेदवारांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# पक्षविरोधी प्रचार करणाऱ्या मनोहर डाकेची हाकालपट्टी

पक्षविरोधी प्रचार करणाऱ्या मनोहर डाकेची हाकालपट्टी

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१० नोव्हेंबर**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष मनोहर डाके हे पक्षाचे अधिकृत उमेदवार मोहनराव जगताप यांच्या विरोधात असलेले अपक्ष उमेदवार रमेश कोकाटे आडसकर यांचा प्रचार करत असल्याचे कारण दाखवून प्रदेश सचिव प्रा श्रीहरी काळे यांनी त्यांची तालुकाध्यक्ष पदावरून हाकालपट्टी केली आहे.

याबाबत महाराष्ट्र प्रदेश सचिव प्रा श्रीहरि काळे यांनी ऐका पत्रद्वारे .. आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार मोहनराव जगताप यांच्या विरोधात जाहीरपणे प्रचार करू न.. अपक्ष उमेदवार रमेश कोकाटे उर्फ आडसकर यांचा जाहीर प्रचार करत असल्याचे निदर्शनात येत असून आपण त्यांना जाहीर पाठिंबा देत आहात.. आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार या पक्षांच्या ध्येय धोरणाच्या विरोधात जाहीरपणे प्रचार करत असल्यामुळे आपली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्वच पदावरून व पक्षातून हाकालपट्टी करण्यात येत आहे अशा आशयचे पत्र राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सचिव प्रा श्रीहरी काळे यांनी मनोहर डाके यांना दिले आहे.तर तात्पुरत्या स्वरूपात समन्वयक म्हणुन विश्वाबर थावरे यांची नियुकी करण्यात आली आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# केज मतदारसंघातील जनता विरोधकांच्या भुलथापांना बळी पडणार नाही; मत नमितााताई यांनाच देणार..!

## सर्वसामान्य माणूस म्हणतोय आ.नमिता मुंदडा या कर्तव्यदक्ष लोकप्रतिनिधी

केज (प्रतिनिधी)

केज मतदारसंघात निवडणुकीची रणधुमाळी जोरात सुरू झाली आहे. विरोधक केवळ विरोधाला विरोध म्हणून आरोप करीत आहेत. परंतू, केज मतदारसंघातील जनता ही फार सुज्ञ आहे. मत विकासाला द्यायचे की, पाच वर्षांत फक्त निवडणुकीपुरते मतदारांसामोर जाणारांना द्यायचे हे जनतेला सांगायची गरज नाही. कारण, सर्वांगिण विकास काय असतो हे आ.नमिता मुंदडा यांनी केज मतदारसंघाला दाखवून दिले आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणूस म्हणतोय की, आ.नमिता मुंदडा या कर्तव्यदक्ष लोकप्रतिनिधी आहेत. आम्ही विरोधकांच्या खोट्या प्रचाराला व भुलथापांना बळी पडणार नाही ; तर आमचे अमुल्य मत हे नमिताताई यांनाच देणार आहोत.

आमदार सौ.नमिता मुंदडा यांनी विधिमंडळ अधिवेशन काळात आपल्या तान्हुल्या बाळाला सोबत घेऊन उपस्थित राहून केज विधानसभा मतदारसंघाचे विविध विकासाचे प्रश्न तिथे पोटतिडकीने मांडले आहेत, सर्व प्रश्नांची सोडवणूक ही केली आहे. तसेच केज मतदारसंघासाठी कोट्यावधी रूपयांचा विकास निधी मंजूर करून आणला आहे. एवढेच नव्हे तर आठ महिन्यांच्या गर्भवती असताना देखील त्यांनी विधीमंडळ अधिवेशनाला हजेरी लावली होती. त्यांच्या मुलांची काळजी घेण्यासाठी येथे कोणीच



नसल्याने त्यांनी मुले मुंबई येथेच ठेवली होती. विविध सामाजिक उपक्रम, कार्यक्रम, लोकांच्या अडीअडचणी असल्या की, त्या मतदारसंघात आणि थोडासा मोकळा वेळा मिळाला की, मुंबईत मुलांकडे धाव घ्यायच्या अशा दुहेरी पालकत्वाची जबाबदारी आ.नमिताताई यांनी पार पाडली आहे. त्यासोबतच, लोकांच्या प्रश्नांसाठी विधानसभेत वेळोवेळी आवाज ही उठवला आहे. त्यामुळेच की, काय आ.नमिताताई सध्या केज मतदारसंघात चर्चेचा विषय ठरत आहेत. अनेकदा त्यांना आपल्या मुलांना वेळ देता येत नाही. तरी देखील एक कर्तव्यदक्ष लोकप्रतिनिधी म्हणून आ.मुंदडा या सातत्यपूर्ण कार्य करीत आहेत. 'मतदारसंघाने निवडून दिल्यामुळे जनतेचे प्रश्न विधानसभेत मांडणं हे माझं कर्तव्य आणि जबाबदारी आहे अशी प्रतिक्रिया आ.नमिताताई मुंदडा यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केली आहे. सध्या केज मतदारसंघात निवडणुकीची रणधुमाळी जोरात सुरू झाली आहे. विरोधक केवळ विरोधाला विरोध म्हणून आरोप करीत आहेत. परंतू, केज मतदारसंघातील जनता ही फार सुज्ञ आहे. मत विकासाला द्यायचे की, पाच वर्षांत फक्त निवडणुकीपुरते मतदारांसामोर जाणारांना द्यायचे हे जनतेला सांगायची गरज नाही. कारण, सर्वांगिण विकास काय असतो हे आ.नमिता मुंदडा यांनी केज मतदारसंघाला दाखवून दिले आहे. त्यामुळे केज विधानसभा मतदारसंघातील सर्वसामान्य माणूस म्हणतोय की, आ.नमिता मुंदडा या कर्तव्यदक्ष लोकप्रतिनिधी आहेत. आम्ही विरोधकांच्या खोट्या प्रचाराला व भुलथापांना बळी पडणार नाही ; तर आमचे अमुल्य मत हे नमिताताई यांनाच देणार आहोत.

# महात्मा फुले युवा दलाचा धनंजय मुंडेंना परळी विधानसभेत पाठिंबा

परळी वैद्यनाथ (दि. १०) – राष्ट्रवादी काँग्रेस सह महायुतीचे परळी विधानसभेचे अधिकृत उमेदवार धनंजय मुंडे यांना आता विविध क्षेत्रातून पाठिंबा वाढताना दिसून येत असून महात्मा फुले युवा दलाच्या वतीने धनंजय मुंडे यांना आज बिनशर्त पाठिंबा देण्यात आला आहे. महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक व प्रमुख सतीश शिंदे यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह धनंजय मुंडे यांची भेट घेऊन पाठिंब्याचे पत्र दिले.

महात्मा फुले युवा दल ही सामाजिक संघटना गेले अनेक वर्ष कार्यरत असून परळी विधानसभा मतदारसंघासह बीड जिल्ह्यात या संघटनेचे अनेक पदाधिकारी आहेत.



महात्मा फुले युवा दलाने कोणत्याही अटी शर्ती शिवाय धनंजय मुंडे यांना पाठिंबा दिला असून धनंजय मुंडे यांच्या निवडणुकीमध्ये सर्वतोपरी सहकार्य करण्याचा शब्द महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक व प्रमुख सतीश शिंदे यांनी दिला असून, धनंजय मुंडे यांनी या निर्णयाचे स्वागत करत संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

यावेळी महात्मा फुले युवा दलाचे प्रमुख ॲड.सतीश शिंदे यांच्यासह जिल्हाध्यक्ष अजय शिंदे, जिल्हा सरचिटणीस बाबा राऊत, धनंजय शिंदे, महादेव हाके, राजाभाऊ शिंदे, नवनाथ पांचाळ, गणेश माळी, पप्पू गीते, सतीश खंडागळे, जनार्दन खंडागळे, सिद्धार्थ खंडागळे, रामेश्वर क्षीरसागर, अंगद खंडागळे, पप्पू खंडागळे, सचिन खंडागळे, सलमान कुरेशी यांसह आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# मायबाप जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही–आ.संदीप क्षीरसागर

### नाळवंडी, ढेकणमोह मध्ये कॉर्नर सभा

बीड दि.१० (प्रतिनिधी):- यंदा तुतारी वाजवायची म्हणजे वाजवायची आणि परत एकदा तुम्हाला विधानसभेत प्रतिनिधीत्व करण्यासाठी पाठवायचे अशी, जनभावना ग्रामीण भागातून व्यक्त होत असून मायबाप जनतेच्या या विश्वासाला मी तडा जाऊ देणार नाही. असे आ.संदीप क्षीरसागर यांनी आपल्या कॉर्नर सभेदरम्यान म्हटले.

रविवारी (दि.१०) रोजी महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रचारासाठी बीड तालुक्यातील नाळवंडी व ढेकणमोह येथे कॉर्नर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी या भागातील नागरिकांच्या भेटीगाठी घेतल्या. आ.क्षीरसागर



यांना सर्वसामान्यांतून अतिशय सकारात्मक प्रतिसाद भेटत आहे. भेटीगाठी दरम्यान आ.क्षीरसागर यांनी, येत्या २० नोव्हेंबर रोजी तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोरील बटन दाबून विजयी करा असे आशिर्वाद उपस्थितांकडे मागितले. यावेळी माजी आ.सय्यद सलीम, शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, शिवसेना तालुकाप्रमुख गोरख शिंगण तसेच या भागातील नागरिक, तरूण, कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोहा तालुक्याच्या विकासासाठी कोट्यवधींचा निधी : आशाताई शिंदे

लोहा – आ. श्यामसुंदर शिंदे यांनी गेल्या पाच वर्षांत लोहा-कंधार तालुक्याच्या विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी आणला. शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, कामगार यांचे प्रश्न सोडविले, गोरगरीबांना मायेचा आधार दिला, प्रत्येक गावात रस्ते, पाणी, वीज, नाली बांधकामासह इतर पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या. मला मत म्हणजे विकासाला मत असे समजून तुमच्या लाडक्या बहिणीला विधानसभेत पाठवा, विकासाची चिंता करू नका, विकासाची जबाबदारी माझी आहे, असे आश्वासन महाविकास आघाडीच्या उमेदवार सौ.आशाबाई श्यामसुंदर शिंदे यांनी केले.



लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाच्या महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार सौ.आशाबाई श्यामसुंदर शिंदे यांनी लोहा तालुक्यातील देवूळघाव, मस्की,सावरगाव (न) येथे भेट देवून ग्रामस्थांशी चर्चा केली. त्यांच्या समस्या आस्थेवाईकपणे जाणून घेतल्या. त्या म्हणाल्या, तुमचे मत विकासाच्या बाजुनेच असेल, यावर माझा विश्वास आहे, आपल्या मतदारसंघाचा विकास कोणी केला याचा प्रथम विचार करुनच माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून मला आशीर्वाद द्या. मला मत म्हणजे आपल्या बहीणीला,आपल्या लेकीला मत आहे, तुम्ही माझ्यावर टाकलेला विश्वास सार्थ करून दाखवू, अशी ग्वाही त्यांन दिली.

यावेळी ग्रामस्थांच्यावतीने सौ.आशाबाई शिंदे यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.याप्रसंगी सावरगाव (न)सर्कलमधील शेकाप पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते व गावातील महीला-भगिणींसह ज्येष्ठ नागरिक.युवा मतदार उपस्थित होते.

# वाडी-तांड्यांचाही विकास करण्यासाठी महायुतीचा खासदार आवश्यक : चित्ररेखाताई गोरे

**तभा वृत्तसेवा**
**मुखेड,दि. १० नोव्हेंबर**

शहरी व ग्रामीण भागाचा समतोल विकास साधणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्वाखाली नांदेड लोकसभा मतदारसंघातील वाडी तांड्यांचाही विकास साधायचा आहे. यासाठी संसदेत आपल्या हक्काचा आणि आपल्या भारतीय जनता पार्टी महायुतीचा खासदार आवश्यक आहे. त्यासाठी वाडी तांड्यावरील मतदारांनी मनात कोणतीही किंतू परंतु न आणता भाजपा महायुतीचे उमेदवार डॉ. संतुकराव हंबर्डे यांच्या कमळ या निशाणी समोरिल बटन दाबून त्यांना प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन भाजपा महिला आघाडीच्या जिल्हा सरचिटणीस चित्ररेखाताई गोरे यांनी केले. मुखेड कंधार विधानसभा मतदारसंघातील कुरुळा तांडा येथे गृह भेटी दरम्यान त्या बोलत होत्या . यावेळी



शर्मिष्ठा संतोषराव हंबर्डे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

या देशात काँग्रेस सरकारच्या काळात महिलांवर मोठ्या प्रमाणात अत्याचार होत होते. अत्याचार केलेले गुंड उजळ माथ्याने फिरत होते. परंतु मोदी सरकारच्या काळात अशा गुंडांना फासावर लटकवले जात आहे. महिलांची छेडछाड करणाऱ्यांना कायद्याने धडा शिकविला जात आहे. त्यामुळे या देशातील मुली आणि महिला सर्वाधिक सुरक्षित झाल्या त्या केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली खालील सरकारमुळे. महिलांच्या उन्नतीसाठी ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वाधिक योजना राबवल्या . ग्रामीण भागातील महिलांना शोचासाठी उघड्यावर जावे लागत असं परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांचा सन्मान करत उघड्यावरील हागणदारी बंद करून प्रत्येकांच्या घरी शौचालय उभारून दिले . त्यासाठी अनुदानही दिले. हागणदारी मुक्ती झाल्यामुळे महिलांचा आत्मसन्मान वाढला शिवाय त्यांचे आत्मबल ही वाढले. धुरामुळे लाखो महिलांना डोळ्यांचा आजार होत असे. ही बाब लक्षात घेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी धुर मुक्त भारताची संकल्पना राबवत उज्वला गॅस योजनेतून महिलांना मोफत गॅस उपलब्ध करून दिला. त्यानंतर महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्रातील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लागू करून महाराष्ट्रातील बहिणींचा खऱ्या अर्थाने सन्मान केला. अडीच कोटी महिलांना या योजनेचा लाभ मिळाला असून भविष्यात पंधराशे रुपये ऐवजी २१०० रुपये प्रति महिना देण्याचा संकल्प महाराष्ट्रातील युती सरकारने केला आहे. त्यामुळे महिला सक्षमीकरणासाठी आणि वाडी तांड्यांचा कायापालट करण्यासाठी आता भारतीय जनता पार्टीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची वेळ आली आहे. मुखेड - कंधार विधानसभा मतदारसंघातून भाजपा महायुतीचे उमेदवार डॉ .तुषार राठोड आणि लोकसभेचे उमेदवार डॉ. संतुकराव हंबर्डे यांच्या कमळ या निशाणी समोरिल बटन दाबून महायुतीच्या दोन्ही उमेदवाराला प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# 'संत तुकारामांचे अभंग : एक चिंतन' ग्रंथाला राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

छत्रपती संभाजीनगर : मुक्ताईनगर (जि. जळगाव) येथील शिवचरण उज्जैनकर फाउंडेशनचे वाङ्ममयाच्या विविध प्रकारासाठीचे पुरस्कार घोषित झाले आहेत. त्यामध्ये 'संत तुकारामांचे अभंग : एक चिंतन' या डॉ. सुभाष बागल लिखित ग्रंथाला उज्जैनकर फाउंडेशनचा तापी- पूर्णा उत्कृष्ट संत वाङ्ममयनिर्मितीचा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे.

श्री. शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन गेल्या दहा-बारा वर्षांपासून महाराष्ट्रामध्ये, साहित्य, समाज, प्रबोधन, वैद्यकीय अशा विविध क्षेत्रामध्ये भरीव स्वरूपाचे काम करीत आहे. या फाउंडेशनचे तीन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने भरविण्यात आलेली आहेत. त्यामध्ये फोण्डा (गोवा ), पन्हाळा, अमरावती येथे झालेल्या संमेलनांचा समावेश आहे. शिवाय शिवचरण उज्जैनकर फाउंडेशनमार्फत राज्यस्तरीय शिव बाल, किशोर, युवा साहित्य संमेलनेही भरविण्यात येतात. या फाउंडेशनचे तिसरे शिव बाल, किशोर, युवा मराठी साहित्य संमेलन १४ डिसेंबर २०२४ रोजी आळंदी या ठिकाणी होत आहे. या मराठी साहित्य संमेलनामध्ये संमेलनाचे उद्घाटन सुप्रसिद्ध साहित्यिक, संत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांच्या शुभहस्ते या पुरस्काराचे वितरण होणार आहे.

डॉ. सुभाष बागल हे खुलताबाद येथील चिश्तिया कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये मराठी विभाग प्रमुख म्हणून सध्या कार्यरत आहेत. त्यांचे आतापर्यंत विविध विषयांवरील आठ ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. वेगवेगळ्या मासिकांमधून त्यांचे विविध स्वरुपाचे लेखन प्रसिद्ध झालेले असून, अनेक साहित्य संमेलनांमधून त्यांनी सहभाग नोंदविलेला आहे. गेल्या वर्षी तुकारामांच्या अभंगावर त्यांचा हा ग्रंथ प्रसिद्ध झालेला आहे. या ग्रंथावर कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयामध्ये गेल्या ३० ऑगस्ट २०२४ रोजी एक दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजनही करण्यात आले होते. संत तुकारामांच्या अभंगांचे मूलगामी चिंतन करणारा हा ग्रंथ सध्या मराठी संत वाङ्मयामध्ये चांगला चर्चे ला आहे. या पुरस्कार प्राप्तीबद्दल डॉ. सुभाष बागल यांचे शिवचरण उज्जैनकर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवचरण उज्जैनकर, (मुक्ताईनगर), फाउंडेशनचे राज्याध्यक्ष डॉ. सतीश तराळ (अमरावती), शिवचरण फाउंडेशनचे राज्य संपर्कप्रमुख डॉ. श्रीकांत पाटील, (कोल्हापूर), डॉ. प्रतिमाताई इंगोले (पुणे) इत्यादी पदाधिकारी तसेच साहित्य क्षेत्रातील प्राचार्य कोतिकराव ठाले पाटील, डॉ. दादा गोरे, डॉ. सतीश बडवे, डॉ. विद्यासागर पाटंगणकर, डॉ. अशोक देशमाने, डॉ. सर्जेराव जिगे आदींसह विविध क्षेत्रांतून अभिनंदन होत आहे.

# महिलांना आर्थिक आणि सुरक्षेचे बळ देण्यासाठी राज्यात महायुतीचे सरकार आवश्यकः संध्याताई कल्याणकर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १० नोव्हेंबर**

महिला सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारने मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण ही योजना राबवून महिलांचा खऱ्या अर्थाने सन्मान केला आहे . राज्यातील महिलांना सुरक्षित करण्यासाठीही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धाडसी पाऊल उचलले आहेत. छेडछाड करणाऱ्यांना, अत्याचार करणाऱ्या गुंडांना फासावर धडा शिकविण्याचा काम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारने केले असून भविष्यातही महिलांना आर्थिक आणि सुरक्षेचे



बळ देण्यासाठी राज्यात महायुतीचे सरकारने आवश्यक असल्याचे मत शिवालया समूहाच्या अध्यक्ष संध्याताई कल्याणकर यांनी व्यक्त केले. त्या सोमेश्वर येथे प्रचार फेरीत महिलांशी बोलत होत्या.

या राज्यात काँग्रेस सरकारच्या काळात महिलांवर मोठ्या प्रमाणात अत्याचार होत होते . अत्याचार केलेले गुंड उजळ माथ्याने फिरत होते. परंतु मोदी सरकारच्या काळात अशा गुंडांना फासावर लटकवले जात आहे. महिलांची छेडछाड करणाऱ्यांना कायद्याने धडा शिकविला जात आहे. त्यामुळे या राज्यातील मुली आणि महिला सर्वाधिक सुरक्षित झाल्या त्या केवळ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली खालील सरकारमुळे. महिलांच्या उन्नतीसाठी मुख्यमंत्र्यांनी सर्वाधिक योजना राबवल्या .

महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लागू करून महाराष्ट्रातील बहिणींचा खऱ्या अर्थाने सन्मान केला. अडीच कोटी महिलांना या योजनेचा लाभ मिळाला असून भविष्यात पंधराशे रुपये ऐवजी २१०० रुपये प्रति महिना देण्याचा संकल्प महाराष्ट्रातील युती सरकारने केला आहे. त्यामुळे महिला सक्षमीकरणासाठी आणि प्रत्येक गावांचा कायापालट करण्यासाठी आता शिवसेनेच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची वेळ आली आहे. नांदेड विधानसभा मतदारसंघातून शिवसेना महायुतीचे उमेदवार आ.बालाजी कल्याणकर आणि नांदेड लोकसभेचे उमेदवार डॉ. संतुकराव हंबर्डे यांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहनही त्यांनी केले.

# पंतप्रधान मोदी यांची 'अभूतपूर्व' जाहीर सभा जिल्ह्यात महायुतीच्या विजयाची नांदी ठरणार

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १० नोव्हेंबर**

उत्तम नियोजन, प्रभावी यंत्रणा आणि महायुतीचे शिस्तबद्ध संघटन या त्रिसुत्रीच्या बळावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कौठा येथील मैदानावर झालेली 'अभूतपूर्व' जाहीरसभा नांदेड जिल्ह्यात महायुतीच्या विजयाची नांदी ठरणार आहे. विशाल जनसमुदाय, कार्यकर्त्यांचे कठोर परिश्रम आणि महायुतीच्या एकजुटीचे प्रभावशाली दर्शन घडवून ही जाहीरसभा यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज खा. डॉ. अजित गोपछडे यांचे व सर्व कार्यकर्त्यांचे फोन करुन कौतुक केले. नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीचे



महायुतीचे उमेदवार डॉ. संतुकराव हंबर्डे व जिल्ह्यातील नऊ विधानसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची शनिवार दि. ९ नोव्हेंबर रोजी कौठा येथील मैदानावर प्रचंड जाहीरसभा झाली. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचीही यावेळी प्रमुख उपस्थिती लाभली. या सभेला अक्षरशः प्रचंड जनसागर उसळला होत. अभूतपूर्व प्रतिसादामुळे ही सभा महायुतीच्या विजयासाठी निर्णायक ठरणार हे आता स्पष्ट दिसून येत आहे. संयोजकांचे शिस्तबद्ध नियोजन हे या जाहीरसभेचे वैशिष्ट्य ठरले.भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी, रिपाइं मित्रपक्षांसह महायुतीच्या सर्व कार्यकर्त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जाहीर सभेला नांदेड जिल्ह्यातील सर्व श्रेणीतील नागरिक उपस्थित राहण्यासाठी उत्तम नियोजन केले. भाजपा नेते खा. अशोकराव चव्हाण, मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, शिवसेना उपनेते आ. हेमंत पाटील महायुतीचे सर्व पदाधिकारी, लोकप्रतिनिधी नांदेड लोकसभेचे उमेदवार सर्वश्री डॉ. संतुकराव हंबर्डे, विधान सभेचे उमेदवार मा.खा. प्रताप पाटील चिखलीकर, आ. राजेश पवार, आ. तुषार राठोड, आ. भिभराव केराम, आ. बालाजी कल्याणकर, मा. आ. जितेश अंतापुरकर , बाबुराव कदम, आनंद पा. बोंढारकर, कु.श्रीजया चव्हाण आदींनीही ही जाहीरसभा यशस्वी करण्यासाठी महत्वपूर्ण प्रयत्न केले.

प्रत्येक विधानसभा मतदारसंघनिहाय लाडक्या बहिणी, लाडके भाऊ, केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध जनकल्याणकारी योजनेचे लाभार्थी, शेतकरी सर्व श्रेणीतील व्यवसायिक, डॉक्टर्स, इंजिनिअर्स, वकील, सीए, प्राध्यापक, शिक्षक, उद्योजक, व्यापारी, महिला, युवक, विद्यार्थी आदी श्रेणीतील नागरिक प्रचंड संख्येने आपले लाडके पंतप्रधान मोदीजींचे भाषण ऐकण्यासाठी वेळेपूर्वी उपस्थित झाले होते.केंद्र आणि राज्यात एकाच विचारांचे डबल इंजिन सरकार विकासाला गती देण्यासाठी सक्षम असते याची प्रचिती आल्यामुळे नांदेड लोकसभा आणि जिल्ह्यातील विधानसभेच्या सर्व ९ जागा महायुती जिंकणार असा विश्वास यासभेत उपस्थित नागरिकांनी व्यक्त केला.

हद्दपार गुन्हेगाराला अटक

छत्रपती संभाजीनगर : अनेक गंभीर गुन्हे केलेला हद्दपार गुन्हेगार शहरात पिस्तूल घेऊन फिरताना आढळून आला. गुन्हे शाखेने त्याला ताब्यात घेतले. दोन पिस्तूल, जिवंत काडतुसांसह प्रतापनगरमध्ये अटक केली. गणेश शंकर पिंपळे (रा. जोगेश्वरी, ता. गंगापूर) असे अटक केलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे. गुन्हे शाखेने शुक्रवारी ही कारवाई केली. आरोपी गणेशवर यापुर्वी वाळूज, वेदांतनगरसह अहिल्यानगर, नाशिकमध्ये चोऱ्या, लुटमारीचे गुन्हे दाखल आहेत. गंभीर गुन्ह्यांमुळे २० फेब्रुवारी २०२४ रोजी त्याला जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले. तरीही तो शहरात गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरत असल्याची माहिती गुन्हे शाखेचे निरीक्षक संदीप गुरमे यांना मिळाली. त्याच्याकडे काडतुसांसह पिस्तूल असल्याने गुरमे यांच्या सूचनेवरून उपनिरीक्षक संदीप सोळंके, अंमलदार प्रकाश गायकवाड, अमोल शिंदे, मनोहर गिते, अमोल मुगळे यांनी प्रतापनगरात सापळा रचला. त्यात तो रंगेहाथ सापडला. दोन्ही पिस्तूल मध्य प्रदेशमधून आणल्याची कबुली दिली. पिस्तूल जप्त करत त्याला उस्मानपुरा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

## महिलेला मारहाण

छत्रपती संभाजीनगर : जुन्या भांडणाच्या कारणावरून महिलेला घरात घुसून मारहाण केल्याची घटना कासंबरी दर्गा मिटमिटा परिसरात घडली. या प्रकरणी छावणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आकाश रामफळे रा. घाटी कॉर्टर, जया श्यामसुंदर शर्मा रा. आनंदनगर अशी आरोपींची नावे आहेत. या प्रकरणी कोमल सागर शर्मा रा. कासंबरी दर्गा उस्मानिया कॉलनी मिटमिटा यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार ८ नोव्हेंबर रोजी रात्री दहा वाजेच्या सुमारास जुन्या भांडणाच्या कारणावरून आरोपी घरात घुसले. फिर्यादीला शिवीगाळ करून मारहाण करीत लोखंडी रॉड डोक्यात घातला. तसेच घरातील टीव्ही फोडून नुकसान केले. पुढील तपास छावणी पोलीस करीत आहेत.

## छातीत खुपसला वस्तारा

छत्रपती संभाजीनगर : आमच्या सोबत का राहत नाही, असे म्हणत तिघांनी एकाला मारहाण करून छातीत वस्तरा खूपसल्याची घटना गांधीनगर परिसरात घडली. या प्रकरणी क्रांती चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रॉकी चावरिया, सुमित चावरिया, शुन्य बिडलॉन रा. गांधीनगर व सोनू चावरिया रा. दलालवाडी अशी आरोपींची नावे आहेत.

## सोयगाव शहरात आज रक्तदान शिबिराचे आयोजन

सोयगाव दि.१०(प्रतिनिधी) रक्तपेढी मध्ये रक्ताचा मोठ्या प्रमाणात तुडवडा भासू लागल्याने क्रांती जनहित बहुउद्देशीय विकास संस्था आमखेडा व अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटनेच्या वतीने दि.११ सोमवारी सकाळी नऊ ते दोन या कालावधीत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.जास्तीत जास्त रक्तदात्यांनी रक्तदान करावे असे आवाहन संस्था व संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.रक्तपेढी मध्ये रक्ताचा तुटवडा मोठ्या प्रमाणात भासू लागला आहे.त्यामुळे समाजशील घटकांनी पुढे येऊन रक्तदान करावे व आपली सामाजिक बांधिलकी जपावी असे आवाहन रक्तपेढीच्या वतीने करण्यात आल्याने क्रांती जनहित बहुउद्देशीय विकास संस्था आमखेडा व अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटना सोयगाव पुढे सरसावल्या असून दि.११ सोमवारी सकाळी नऊ ते दुपारी दोन वाजेपर्यंत सोयगाव बसस्थानक मागे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.रक्तदान हे श्रेष्ठदान असून रक्तदान शिबिरात रक्तदात्यांनी मोठ्या संख्येने रक्तदान करावे असे आवाहन क्रांती जनहित बहुउद्देशीय विकास संस्था आमखेडा व अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

# खाटकांकडून गोदावरीचे पावित्र्य धोक्यात; टनाने घाण अवशेष पाण्यात

तभा वृत्तसेवा पैठण दि १० :- दक्षिण काशी मोक्षभूमी पैठणनगरीतून वाहणाऱ्या पवित्र गंगा गोदावरीचे पावित्र्य धोक्यात आणले जात असून पैठणच्या काही हरामखोर खाटकांनी कापलेल्या कोंबडीचे आणि प्राण्यांचे अवशेष थेट गोदावरीच्या प्रवाहातील पाटेगाव पूल आणि पालखी ओटा मागील पाण्यात टाकण्यात सुरुवात केली आहे.या खाटकांवर गुन्हे दाखल करण्यात यावे अशी मागणी होत आहे.

पैठणला दररोज टनाच्या आसपास चिकन आणि मटणाची विक्री होत असून हे कापणारे खाटीक गोण्या भरुन भरून घाण अवशेष गोदावरीच्या पाण्यात मिश्रित करत आहेत. अगोदर सिद्धेश्वर मंदिर परिसर, दक्षिणकाशी मैदान आणि आता थेट पाटेगाव पूल आणि पालखी ओटा घाटाच्या मागे गोदावरीत हे घाण अवशेष मोठया प्रमाणात फेकले जात असून. यावर



पशुवैद्यकीय विभाग आणि नगर परिषद स्वच्छता विभाग मूग गिळून गप्प आहे.मेलेल्या प्राणी आणि कोंबड्यांचे अवशेष गोदावरीच्या पाण्यात मिसळत असल्याने या पाण्याचे लवकरच विष तयार होणार आहे.ज्याचे परिणाम प्रवाहातून पाणी पुरवठा होणाऱ्या पाटेगांव, जुने कावसण, चणकवाडी, तेलवाडी, दादेगाव आदी गावांतील नागरिकांसह भाविक भक्तांवर होणार आहे.

# मतदार जागरूक अभियानास प्रारंभ

वाळूज महानगर (प्रतिनिधी) : ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असणाऱ्या लोक आंदोलन न्यासाच्या जागरूक मतदार हाच लोकशाहीचा आधार या संकल्पनेवर आधारित राज्यव्यापी मतदार जागृती अभियानाची सुरुवात झालेली असून बजाजनगरात ही या अभियानाला सुरुवात करण्यात आली आहे.

लोक आंदोलन न्यासाच्या कार्यअध्यक्ष कल्पना इनामदार, खजिनदार दत्ता आवारी ,नाना आवारी ,अन्सार शेख व न्यासाचे सर्व कार्यकर्ते यांनी आज छत्रपती संभाजी राजे वृक्ष बँक व बीज बँक ला भेट देऊन बजाजनगरातून मतदार जागृतीला सुरुवात केली.



**छत्रपती संभाजीनगर शहरातील प्रत्येक गावोगावी जाऊन ,शाळा कॉलेज वरती जाऊन ,लोक आंदोलन न्यासाच्या माध्यमातून मतदार जनजागृती अभियान राबवण्यात येणार आहे.**

**पोपटराव रसाळ**

**छत्रपती संभीजीराजे वृक्ष बँक व बीज बँक छत्रपती संभाजीनगर**

यावेळी पोपटराव रसाळ , हरि वाकळे,अमोल गांगर्डे ,नितीन अंभोरे, भगवान अवसरमल ,उमेश तांबट ,केदार स्वामीनाथ लक्ष्मण देशमुख ,रत्नाकर मोरे आदींची उपस्थिती होती.

## बजरंग दल यांच्या वतीने रक्तदान शिबीरात ४१ जणांनी केले रक्तदान

बिडकीन दि .१० नोव्हेंबर पैठण तालुक्यातील बिडकीन येथील स्वयंभू महादेव मंदिर विश्राम गृह बिडकीन येथे दि .१० नोव्हेंबर रोजी शिवप्रताप दिनानिमित्त बिडकीन येथे बजरंग दल यांच्या वतीने शासकीय रक्त पेढी शासकीय रुग्णालय छत्रपती संभाजीनगर यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले होते, महाराष्ट्र मध्ये रक्ताचा तुटवता भासत असल्याने छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्र मध्ये रक्ताचा तुटवता भासू देणार नाही या अनुषंगाने बजरंग दल बिडकीन यांनी धाव घेऊन शिवप्रताप दिनानिमित्त रक्त दान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते,या रक्त दान शिबीर मध्ये ४१ जणांनी रक्तदान करून सहभाग नोंदवला या रक्तदात्यांना प्रमाणपत्र देण्यात आले, या



शिबीराचे आयोजन बिडकीन बजरंग दलाच्या सर्व कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.शिवप्रताप दिनानिमित्त सायंकाळी सात वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याचे पूजन करून महाआरती आयोजन करण्यात आले होते, यावेळी शिवभक्त उपस्थित होते

## बीकेटी कंपनीत दोनशे कामगारांचे रक्तदान

वाळूजमहानगर, (प्रतिनिधी) - सध्या अनेक रक्तपिढ्यांमध्ये रक्ताचा तुटवडा जाणवत असल्याने सामाजिक बांधिलकी म्हणून वाळूज औद्योगिक वसाहतीतील मे बाळकृष्ण इंडस्ट्रीज लिमिटेड (बीकेटी) या कंपनीच्या वतीने शुक्रवारी (ता.८) रोजी घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात कामगार व कर्मचारी मिळून २२७ जणांनी उत्स्फूर्त रक्तदान केले.

सध्याच्या धावपळीच्या जगात रोड अपघात, मलेरीया, हिमोफिलीया, थायलेसीमिया, डेंगु अशा अनेक आजारांमुळे रक्तपेढीमध्ये रक्ताचा तुटवडा जाणवत आहे. परिणामी रुग्ण व रूग्णांचे नातेवाईक यांना रक्त मिळविण्यासाठी खुप अडचणी येत आहेत. त्यामुळे सामाजिक बांधिलकी म्हणून वाळूज औद्योगिक वसाहतीतील मे. बाळकृष्ण इंडस्ट्रीज लि. ही कंपनी नेहमीच सामाजिक बांधिलकी जपत असते. या कंपनीतील कामगार, कर्मचारी तसेच मे. बाळकृष्ण टायर्स संघटना



हे सातत्याने मागील १७ वर्षापासुन कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक अरविंद पोद्दार यांचा वाढदिवस रक्तदान करून साजरा करतात. त्यामुळे कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक अरविंद पोद्दार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन शुक्रवारी (ता.८) नाव्हेंबर रोजी रक्तदान शिबीर आयोजित केले होते. यात २२७ कामगार व कर्मचाऱ्यांनी या शिबीरात उत्सफुर्त पणे रक्तदान केले. या कार्यक्रमाचे उद्घाटन कंपनीचे युनीट हेड स्वप्नील व्यास यांनी रिबीन कापुन केले.

या कार्यक्रमास कंपनीचे युनीट हेड, वरिष्ठ व्यवस्थापन व बाळकृष्ण टायर्स कामगार संघटनेचे अध्यक्ष बि. बि. जाधव, उपाध्यक्ष के. एच. शिंदे, सचिव आर. पी. बनसोड तसेच संघटनेचे इतर पदाधिकारी एस. जी. राठोड, बि. एल. गाडे, एन. बि. शिंदे, एस. डी. गोरे, सुनिल मेरड व आर. व्ही. भुतकर यांच्यासह कंपनीतील कामगार आणि कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कंपनीचे बी. एस. पाठक, आबासाहेब वाघमारे, चंद्रकांत भालेराव, खालेद खान, सुशील झाल्टे, बी. बी. निकम, मंगेश तांबडे, अजय राय, व्हि. एम. कस्तुरे यांनी विशेष परिश्रम केले. वैद्यकीय महाविद्यालयाच्या विभागीय रक्तपेढीच्या (घाटी हॉस्पीटल) यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरात डॉ. गुलफाम, डॉ. विद्या, जनसंपर्क अधिकारी सुनिता बनकर आदींनी रक्त संकलन केले.

### शिवचैतन्य जागरण यात्रेला गंगापुरात उत्स्फूर्त प्रतिसाद

## माता भगिनी महिलांचा व साधुसंतांचा आदर करणे म्हणजेच हिंदुत्व : स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१० नोव्हेंबर: छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापनेसाठी अहोरात्र जिवाचे रान केले हिंदू धर्माचे रक्षण करत गोपालन , संस्कृतीचे जतन करून माता भगिनींचा आदर करणे साधुसंतांचा आदर करणे म्हणजेच हिंदुत्व आहे छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श घ्यावा असे गंगापूर येथील प्रवचनात म्हटले आहे. श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यास आयोध्या कोषाध्यक्ष, श्रीकृष्ण जन्मभूमी मथुराचे स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज यांच्या शिवचैतन्य जागरण यात्रेला गंगापुरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला यावेळी माता भगिनी पुरुष मंडळी यांचा मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

स्वामी गोविंददेवगिरीजी यांचे गंगापूर शहरात आगमन होताच हिंदू सूर्य महाराणा प्रताप चौक येथे पुष्पमाला अर्पण करण्यात आली. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज



उद्यान येथे महाराजांचे हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. यानंतर उद्यानातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या ऐतिहासिक शिल्पांची पाहणी केली तदनंतर माहेश्वरी मंगल कार्यालय येथे आगमन होताच महिलांनी औक्षण केले. स्वामी गोविंददेवगिरी महाराज यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्कावलन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी ते म्हणाले की, शिव चैतन्य यात्रा ही गुढीपाडव्यापासून सुरुवात करण्यात आली आहे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी या यात्रे निमित्त अनेक प्रवचन व्याख्यान देत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदु धर्म जपण्यासाठी गोपालन,संस्कृती, महिलांचा आदर साधुसंतांचा आदर यांचा एक आदर्श म्हणून संपूर्ण देशात जगाला संदेश देण्यासाठी दैवरुपी काम केले आहे. प्रत्येकाने देशसेवा माता भगिनींचा आदर साधुसंतांचा आदर करून संस्कृतीचे जतन करणे गरजेचे आहे त्यासोबतच गोपालन देखील करायला पाहिजे.

# नेता प्रचार दौऱ्यावर ; कार्यकर्ते प्रचार कार्यालयाच्या निवाऱ्यावर

वाळूज महानगर ( प्रतिनिधी ) पश्चिम मतदार संघातील ( उबाठा) गटातील नाराजी नाट्य काही कमी होतांना दिसत नाही. दिवसेंदिवस वाळूज महानगरातील शिवसेनेचे निष्ठावंत शिवसैनिक नाराज होऊन राजीनामे देत आहेत. काल वाळूज महानगरात राजू शिंदे यांनी काढलेल्या प्रचार रॅलीतही मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते नाराज असल्याचे त्यांच्या कृतीतून दिसत होते.

पश्चिम मतदार संघातील ( उबाठा) गटाचे उमेदवार राजू शिंदे यांनी बजाजनगर परिसरात प्रचार दौरा आयोजित केला होता. या रॅलीत मोचकेच शिवसैनिक दिसत होते , तेही फक्त सोबत होते उत्साह , जोश हे कोणाच्याच चेहऱ्यावर दिसत नसल्याचे स्पष्ट दिसत होते. काही शिवसैनिकांना विचारले असता ते म्हणाले की , आम्ही मनापासून काम करत आहोत मात्र उमेदवार नेहमी आमच्यावर अविश्वास दाखवतात. त्यामुळे आम्ही फक्त सोबत आहोत , असेच चित्र कायम राहिले तर मात्र आम्हाला वेगळी वाट धरावी लागेल असे बोलून दाखवत होते.

प्रचार रॅलीत गर्दी कमी ; कार्यालयात जास्त

प्रचार रॅली सुरु असतांना बऱ्याच शिवसैनिकांनी रॅलीतून काढता पाय घेत प्रचार कार्यालयात बसून राहणे पसंद केले. त्यामुळे प्रचार रॅलीत कार्यकर्त्यांची गर्दी कमी आणि कार्यालयातच जास्त दिसत होती. एका शिवसैनिकाने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले की , नियोजन शून्य असल्याने कोणीच कोणाला विचारत नाही , कुठे जायचे ? काय करायचे याचे योग्य नियोजन नाही या ढिसाळ नियोजनामुळे काहीच कळेना म्हणून रॅलीत कमी व कार्यालयात जास्त कार्यकर्त्यांची गर्दी दिसत आहे.

## तहसील कार्यालयातून हायवा लंपास

छत्रपती संभाजीनगर : अवैध वाळू वाहतूक प्रकरणी जप्त केलेला एक हायवा अप्पर तहसील कार्यालयाच्या आवारातून लंपास करण्यात आला. याप्रकरणी सिटी चौक पोलीस ठाण्यात आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिगंबर सुडके रा. खडीरोड बीड बायपास व रवी परमेश्वर चव्हाण रा. शहागड, ता. अंबड जि. जालना अशी आरोपींची नावे आहेत. या प्रकरणी तलाठी समाधान पैठणे रा. नंदनवन कॉलनी यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार अप्पर तहसील कार्यालयाने पकडलेला अवैध वाळू वाहतुकीचा हायवा अप्पर तहसील कार्यालयाच्या आवारात उभा केला होता. ८ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री आरोपींनी हायवा लंपास केला.

# सिडको वाळूजमहानगर वीस वर्षांपासून दुर्लक्षित 'नोटा' चालवणार; सिडको वासियांचा निर्धार

**(भाग – १)**

वाळूज महानगर (प्रतिनिधी) : सध्या निवडणुकीचे वातावरण असून प्रचार ' सभा , कॉर्नर बैठकांनी वेग पकडला आहे. निवडणुकीला सर्वच उमेदवार मत मागत गल्लो-गल्ली फिरत आहेत मात्र गेल्या कित्येक वर्षांपासून नागरिकांचा होत असलेल्या छळामुळे नागरिक त्रस्त असून , विधान सभेला उभे असलेले सर्वच उमेदवार एकाच माळेचे मणी असून , आमचा २० वर्षांत विकास न करणाऱ्यांना आम्ही मतपेटीतून उत्तर देत नोटाला प्राधान्य देऊ असा संतप्त सूर वाळूज महानगरातील पहिली एलआयजी वसाहत म्हणून स्थापन झालेल्या सिडको मधील जवळपास पावणे तीन हजार पुरुष मतदार आवळत आहेत. सिडकोत असूनही विकास होत नसल्याने शापित वसाहत म्हणून या वसाहतीकडे पाहिले जाते.

१५ वर्षापासून दुर्लक्षित वसाहत

सिडको स्थापन झाल्यानंतर पहिल्या वसाहतीकडे शासना सह



**फोटो ओळ : सिडकोच्या एलआयजी वसाहतीत अंतर्गत रस्ते असे ठिक ठिकाणी उखडले गेले आहे. तर गार्डनची अशी बकाल अवस्था झाली आहे.**

स्थानिक पदाधिकारी व पुढाऱ्यांनी आमच्या वसाहती कडे कायम दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे वडगाव लगत असलेल्या सिडको भागात आल्यावर शहरी भागात असूनही खेड्यात आलो की काय असा भास होतो. इतका दुर्लक्षित भाग अख्या वाळूज महानगर परिसरात नसेल अशी अवस्था सध्या सिडकोच्या अधिन असलेल्या वस्तीची झाली आहे.

पक्के रस्ते नाही

या वसाहतीला एकूण १० रस्ते असून गेल्या १५ वर्षांपासून या भागातील अंतर्गत रस्ते दुरुस्त करण्यात आले नाही. पावसाळ्यात सर्वच रस्त्यांना नदीचे स्वरूप येते. आपल्याकडे कोणी पाहुणे आल्यास ' तुम्ही शहरात राहता की खेड्यात ' असा प्रश्न विचारला जातो. इतकी बिकट परिस्थिती आमची आहे. त्यामुळे आम्हाला विकासापासून दूर ठेवणाऱ्यांना आम्ही खूर्चीपासून दूर ठेवण्यासाठी कार्य करणार आहोत अशी संतप्त भावना संजय मगरे यांनी व्यक्त केली.

पाणी पुरवठ्यात अनियमतता

इतर समस्यांनी आम्ही त्रस्त आहोतच त्यातच पाणी वेळेवर व अनियमित पुरवठा होत असल्याने नाहक त्रासाला सामोरे जावे लागते. किमान अंतर्गत रस्ते बनवून द्यावे ही आमची मागणी आहे परंतु आमच्या मागणीकडे आज पर्यंत कुणाचेच लक्ष गेले नाही. आता दरवाजापर्यंत लोटांगण घालत असून , त्यांचे हे नाटके आम्ही गेल्या १५ वर्षांपासून अनुभवत आहोत. यावेळेस मात्र आम्ही केवळ नोटा चालवणार असे स्वाती शिरसाट यांनी बोलून दाखवले.

सुविधा नाही तर मत नाही

आजपर्यंत तुम्ही आमचा फायदा घेतला सर्व करांचा वेळेवर भरणा करूनही आम्हा जाणून - बुजून दुर्लक्षित ठेवल्यामुळे या विधान सभेला आम्ही सर्वच रहिवासी 'नोटा' चालवणार आहोत. आम्ही कामगार आहोत , आमच्या रोजी - रोटीवर गदा नको म्हणून आमी आम्ही कोणालाही विरोध करणार नाही. आम्ही सर्वांच्या सोबत राहू व सुविधा नाही तर मत नाही असे ठरवून नोटाच चालवू असे रमेश वाघमारे यांनी सांगितले.

क्रिडांगणाची दुर्दशा

या वसाहतीच्या मध्यभागी एकच क्रिंडागण असून केवळ सुविधांअभावी बकाल झाले आहे. सर्वत्र गवत , काटेरी झुडपे वाढल्याने हे क्रिंडागण ओस पडले आहे. त्यामुळे या परिसरात नेहमी सरपटणारे प्राणी वावरत असतात. त्यामुळे महिला व लहान मुलांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे असे मत त्रिशला त्रिभुवन यांनी व्यक्त केले. यावेळी उपस्थित नागरिकांपैकी माधव वाघमारे ' चंद्रकांत धुपे , निखील निमाळजे ' योगेश चौधरी ,, सीमा वाघमारे यांच्यासह अनेकांनी आपल्या भावना व्यक्त करत सर्वच उमेदवारांना नाकारत केवळ नोंद चालविणार असल्याचे सांगितले.

## धुळ्याच्या प्रचारसभेमध्ये फडणवीसांची धावपळ

महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी धुळ्याला पंतप्रधान मोदी यांची जोरदार सभा पार पडली. यावेळी एक गंमतीदार प्रसंग घडला. या सभेत मोदींनी महाविकास आघाडीवर चांगलीच तोफ डागली. भाषण संपवत असताना मोदींनी सर्व उमेदवारांना उभे राहण्याची सूचना केली. ते म्हणाले,'मी सर्व उमेदवारांना विनंती करतो, की जे निवडणूक लढवत आहेत त्यांनी पुढे यावं.'

हे ऐकल्यावर धुळे जिल्ह्यातील महायुतीचे सर्व उमेदवार व्यासपीठावर पुढे येऊन उभे राहिले. मात्र देवेन्द्र फडणवीस आपल्या खुर्चीवर तसेच बसून होते. देवेन्द्रजी नागपूर दक्षिण-पश्चिम विधानसभा मतदारसंघामधून निवडणूक लढवत आहेत.



त्यांना बघून 'देवेंद्रजी, आपणही निवडणूक लढवत आहात' असं म्हणून पंतप्रधान मोदी हसले. त्यांनी आपले नाव घेतलेले पाहून देवेन्द्र फडणवीस उठले आणि पळतच व्यासपीठावर पुढे आले आणि इतर सर्व उमेदवारांबरोबर जनसमुदायासमोर हात जोडून उभे राहिले. नंतर सगळेच एकमेकांबरोबर गप्पा मारत व्यासपीठावरून खाली उतरले.




**सर्वाधिक साखर कारखाने असलेला जिल्हा म्हणून सोलापूर जिल्ह्याची महाराष्ट्राला ओळख आहे. याशिवाय, शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून या जिल्ह्याची ओळख होती; मात्र भाजपने जिल्ह्यामध्ये वर्चस्व मिळवले होते. लोकसभेमध्ये पवार यांनी विजयसिंह मोहिते यांच्यासह सर्वंच नेत्यांची बेरीज केल्यामुळे लोकसभेच्या दोन्ही जागा महाविकास आघाडीला मिळाल्या. या पार्श्वभूमीवर विधानसभेच्या निवडणुकीमध्ये काय होणार, याकडे लक्ष लागले आहे.**

## साखर पट्ट्यामध्ये 'कास्ट फॅक्टर' निर्णायक

सोलापूर जिल्ह्यामधील अकरा विधानसभा मतदारसंघामधील लढती निश्चित झाल्या असून माढा, बार्शी, सोलापूर दक्षिण, माळशिरस, पंढरपूर आणि सांगोला मतदारसंघामध्ये चुरशीच्या लढती होत आहेत. लोकसभा निवडणुकांनंतर येथील जिल्ह्यांमध्ये अत्यंत चुरस पाहायला मिळाली. त्यामध्ये, भाजपच्या दोन्ही विद्यमान खासदारांचा पराभव करत महाविकास आघाडीने जिल्ह्यातील माढा आणि सोलापूर या दोन्ही लोकसभा मतदारसंघांमध्ये विजय मिळवला. अठरापगड जाती, धर्माच्या सोलापूर शहर आणि जिल्ह्यामध्ये ११ मतदारसंघांमधील उमेदवार 'कास्ट व्होटिंग'साठी धडपडू लागले आहेत. जातींचे एकगठ्ठा मतदान प्लस पॉईंट ठरते, हे उमेदवार गृहीतच धरतात. मुस्लिम बहुल सोलापूर शहर मध्य मतदारसंघामध्ये भाजपचे देवेंद्र कोठे, काँग्रेसचे चेतन नरोटे, माकपचे नरसय्या आडम, 'एमआयएम'चे फारूख शाब्दी यांच्या लढतीमध्ये जात फॅक्टर निर्णायक ठरणार आहे. सोलापूर शहर उत्तर मतदारसंघामध्ये जवळपास दोन लाख लिंगायत समाजाच्या सहकार्याने भाजपचे आमदार विजयकुमार देशमुख चार वेळा आमदार झाले. ते स्वत: लिंगायत असल्याने ती जमेची बाजू ठरली. यंदा त्यांची शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महेश कोठे यांच्याशी लढत आहे. अक्कलकोट मतदारसंघ हा लिंगायत बहुल आहे. भाजपचे आमदार सचिन कल्याणशेट्टी व काँग्रेसचे माजी राज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे या दोन लिंगायत समाजाच्या उमेदवारांमध्येच यंदा लढत आहे. सोलापूर दक्षिण मतदारसंघात आतापर्यंत भाजपचे सुभाष देशमुख यांचे वर्चस्व राहिले आहे. लिंगायत, धनगर, बंजारा, मुस्लिम असे येथे मतदारांचे प्राबल्य आहे. धर्मराज काडादी, अमर पाटील, सोमनाथ वैद्य, आप्पाराव कोरे, महादेव कोगनुरे, डॉ. बसवराज बगले या प्रमुख लिंगायत समाजाच्या उमेदवारांमध्ये मतांचे विभाजन होणार आहे. इतर उमेदवारांचे धनगर, बंजारा, मुस्लिम समाजाच्या मतांचे विभाजन होणार आहे.



सांगोला या धनगर समाजाचे प्राबल्य असलेल्या मतदारसंघामध्ये आमदार शहाजी पाटील (शिवसेना- शिंदे गट), दीपक साळुंखे-पाटील (शिवसेना- ठाकरे गट) या दोन्ही मराठा उमेदवारांमध्ये लढत आहे. त्याशिवाय गणपतराव देशमुखांचे नातू शेकापचे डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्यामागे समाजाची पारंपरिक 'व्होट बँक' कायम राहते का, ते पाहावे लागेल. माळशिरस मतदारसंघामध्येही धनगर समाजाचे प्राबल्य आहे. त्यानंतर मराठा आणि दलित समाजाची मते निर्णायक आहेत. राम सातपुते (भाजप), उत्तम जानकर (राष्ट्रवादी- शरद पवार गट) यांच्यामधीलही लढत कास्ट फॅक्टरवरून रंगतदार ठरणार आहे. बार्शीमध्ये यंदाही आमदार राजेंद्र राऊत (शिवसेना- शिंदे गट) आणि दिलीप सोपल (शिवसेना- ठाकरे गट) अशी पारंपरिक लढत होत आहे. राऊत मराठा तर सोपल लिंगायत समाजाचे. या दोन्ही समाजांचे बार्शी शहरामध्ये प्राबल्य आहे. पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघामध्ये समाधान आवताडे (भाजप), भगीरथ भालके (काँग्रेस), अनिल सावंत (राष्ट्रवादी- शरद पवार गट), दिलीप धोत्रे (मनसे) यांना लिंगायत, मराठा समाजाची मते खेचण्याचे आव्हान राहणार आहे. माळशिरस विधानसभा मतदारसंघामध्ये बारा उमेदवार निवडणुकीच्या रिंगणामध्ये उतरले आहेत. यामध्ये उत्तमराव जानकर (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गट), राम विठ्ठल सातपुते (भारतीय जनता पक्ष), सूरज अशोक सरतापे (बहुजन समाज पक्ष), राज यशवंत कुमार (वंचित बहुजन आघाडी), प्रा.डॉ. सुनील सुखदेव लोखंडे (राष्ट्रीय समाज पक्ष) आदी बारा उमेदवार विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. माळशिरस विधानसभा मतदारसंघामध्ये एकूण मतदारांपैकी ४० टक्के मतदार हे मराठा समाजाचे आहेत. म्हणजेच मराठा समाजाची निर्णायक मते आहेत. मराठा समाजाला आरक्षण मिळावे, या मागणीसाठी सर्वत्र उपोषण, आंदोलने झाली. या अनुषंगाने माळशिरस तालुक्यामध्ये देखील अनेकवेळा साखळी उपोषण, 'रास्ता रोको', कॅन्डल मार्च करण्यात आले आहे. लोकसभेच्या निवडणुकीमध्येही हा प्रश्न अजेंड्यावर होता. सोलापूर जिल्ह्यामध्ये मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांना मानणारा वर्ग मोठा आहे. निवडणुकीच्या रिंगणात उभे असलेल्या उमेदवारांनी अपवाद वगळता कधीही मराठा समाजाच्या आंदोलनात अथवा उपोषणास भेट दिली नाही. त्यामुळे माळशिरस तालुक्यातील मराठा समाज आता आक्रमक झाला असून आपण नेमके कोणाला मतदान करायचे, मतदान करायचे की नाही, याबाबत अजून द्विधा मनस्थितीत आहे. मराठा समाजाने आजपर्यंतच्या प्रत्येक विधानसभा निवडणुकीत विक्रमी मतदान केले आहे; परंतु आता तसे होणार नाही. जो उमेदवार मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्याची भूमिका घेईल, त्यालाच आम्ही मतदान करू, असा सूर आहे. माळशिरस विधानसभा मतदारसंघ हा २००९ पासून राखीव आहे. दोन वेळा हनुमंत डोळस यांना, तर २०१९ला राम सातपुते यांना या मतदारसंघामधून निवडून दिले आहे. या दोघांनीही मराठा समाजासाठी आणि आरक्षणासाठी अपवाद वगळता काही केले आहे, असे म्हणता येणार नाही. सातपुते यांनी एक दोन वेळा सभागृहामध्ये हा प्रश्न उपस्थित केला होता. लोकसभा निवडणुकीमध्ये प्रणिती शिंदे यांच्याकडून पराभूत होऊनही सातपुते पुन्हा माळशिरसमध्ये उभे आहेत. पवार यांच्यामुळे माढा लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघ नेहमीच चर्चेत राहिला आहे. करमाळा मतदारसंघामध्ये संजयमामा शिंदे (अपक्ष) आणि दिग्विजय बागल (शिवसेना- शिंदे गट) यांच्यात मराठा समाजाची विभागणी होणार आहे. नारायण पाटील (राष्ट्रवादी- शरद पवार गट) यांची धनगर समाजाच्या एकगठ्ठा मतदानावर मदार राहण्याची शक्यता आहे. सांगोला, पंढरपूर आणि सोलापूर मध्य या तिन्ही मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीतील विविध पक्षांमध्ये मैत्रीपूर्ण लढत आहे. तुलनेने महाविकास आघाडीतील असंतुष्टांना शांत करणे त्यांच्या नेतृत्वास तितकेसे जमलेले नाही. महाविकास आघाडीने अलिबाग आणि सांगोल्याची जागा शेकापला सोडली आहे. त्यानुसार सांगोल्यात ज्येष्ठ नेते (कै.) गणपतराव देशमुख यांचे नातू डॉ. बाबासाहेब यांनी उमेदवारी दाखल केली, तरी या ठिकाणी ठाकरे शिवसेनेकडून माजी आमदार दीपक साळुंखे-पाटील यांनी बंड केले आहे. याचा थेट फायदा महायुतीचे उमेदवार शहाजीबापू पाटील यांना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मंगळवेढ्यामध्ये भगीरथ भालके यांनी महाविकास आघाडीतील घटक पक्ष काँग्रेसकडून उमेदवारी अर्ज दाखल केला. त्याच ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत यांचे पुतणे, साखरसम्राट अनिल सावंत यांना उमेदवारी दिली. सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातून ठाकरेंच्या शिवसेनेने अमर पाटील यांची उमेदवारी जाहीर केली. त्यानंतर याच ठिकाणी काँग्रेसने माजी आमदार दिलीप माने यांचे नाव जाहीर केले; मात्र उमेदवारी अर्ज दाखल करताना माने यांना काँग्रेसने एबी फॉर्म दिला नाही. बहुचर्चित सोलापूर शहर मध्य मतदारसंघामध्ये उमेदवारांची गर्दी आहे. बंडखोरी आणि अपक्ष उमेदवारांची संख्या अधिक असल्याने बहुतेक विजयी उमेदवारांचे मताधिक्य पाच ते आठ हजारांहून अधिक नसेल, असा अंदाज बांधला जात आहे.

### रण तापले

■■■

**गेल्या साडेतीन दशकांपासून वसई मतदारसंघावर आमदार हितेंद्र ठाकूर यांचे वर्चस्व आहे. अगोदर काँग्रेस आणि नंतर स्वत:चा बहुजन विकास आघाडी हा पक्ष काढून त्यांनी या मतदारसंघावरची आपली पकड ढिली होऊ दिली नाही. या वेळी या मतदारसंघामध्ये तिरंगी लढत होत असून महायुतीमधील नाराजीनाट्य संपायला तयार नाही. त्याचा फायदा आमदार ठाकूर यांना होण्याची शक्यता आहे.**

## महायुतीची बंडाळी ठाकुरांच्या पथ्यावर

वसई विधानसभा मतदारसंघावर गेल्या तीन दशकांपासून आमदार हितेंद्र ठाकूर यांचे वर्चस्व असून, ते मोडीत काढून या मतदारसंघाचा विकास करण्याच्या निर्धाराने महायुतीकडून स्नेहा दुबे-पंडित विधानसभेच्या निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या आहेत. त्यांचे वडील विवेक पंडित २००९ च्या निवडणुकीमध्ये विजयी झाले होते; परंतु २०१४ च्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. या पराभवाचे उट्टे काढण्यासाठी स्नेहा मैदानात उतरल्या आहेत. विकास हाच आपला प्रचाराचा अजेंडा असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. ठाकूर यांचे सर्वंच पक्षांच्या नेत्यांशी चांगले संबंध असल्याने त्यांना दुखावण्याचे धाडस कुणीच करीत नाही. विधान परिषद आणि राज्यसभेच्या निवडणुकीसाठी आमदार ठाकूर यांच्या तीन मतांची गरज यापूर्वी महायुती आणि महाविकास आघाडीला ही लागली आहे. त्यामुळे आतापर्यंत वसईतील लढती एकतर्फी होत. आता या वेळी मात्र विवेक पंडित यांच्या कन्या स्नेहा दुबे-पंडित यांनी विधानसभेच्या निवडणुकीअगोदर भाजपमध्ये प्रवेश करून उमेदवारी मिळवली आहे. आमदार ठाकूर यांनी गेल्या पाच वर्षांपूर्वी निवडणूक लढवणार नाही, अशी घोषणा केली होती; परंतु आता तेच पुन्हा मैदानात आहेत. विवेक पंडित यांनी २००९ च्या निवडणुकीत अपक्ष मैदानात उतरून बहुजन विकास आघाडीच्या उमेदवाराचा पराभव केला होता. त्याचा बदला आमदार ठाकूर यांनी २०१४ च्या निवडणुकीमध्ये पंडित यांचा पराभव करून घेतला. ठाकूर यांचे गेल्या साडेतीन दशकांपासून या मतदारसंघावर वर्चस्व आहे. मधला २००९ ते २०१४ चा काळ वगळला तर सातत्याने या मतदारसंघावर ठाकूर कुटुंबाचे वर्चस्व असल्याचे दिसून येते.



आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या विरोधात विवेक पंडित यांच्या कन्या स्नेहा दुबे-पंडित निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या आहेत. एक दशकानंतर ठाकूर-पंडित कुटुंब आमने सामने आले आहेत. गेल्या निवडणुकीमध्ये शिवसेनेकडून लढलेले विजय पाटील या वेळी काँग्रेसचे या मतदारसंघातील उमेदवार आहेत. मतदारसंघामध्ये तिरंगी लढत आहे. वसई विधानसभेमध्ये तीन लाख ५४ हजार ६५२ मतदार आहेत. वसई विधानसभेमध्ये एकूण सात उमेदवार रिंगणात आहेत; मात्र यातील तिघांची चर्चा होत आहे. यामध्ये बहुजन विकास आघाडीचे विद्यमान आमदार हितेंद्र ठाकूर, काँग्रेसकडून विजय पाटील, भाजपकडून स्नेहा दुबे, बसपकडून विनोद तांबे हे रिंगणात आहेत. या मतदारसंघामध्ये सर्वधर्मीय मतदार आहेत. यामध्ये ख्रिश्चनांची संख्या जास्त आहे. याशिवाय वसई पूर्व भागात उत्तर भारतीय मतदारही आहेत. त्यामुळे या मतदारांना आपल्याकडे खेचण्यासाठी पक्षाच्या वतीने विविध संघटना कार्यरत आहेत. त्यामुळे या विधानसभा मतदारसंघात तोच आमदार निवडून येणार आहे, जो कार्यकर्त्यांच्या जवळचा आणि परिसरातील स्थानिक स्वयंसेवी संस्थांशी जनसंपर्क आहे. त्यातच वसईमध्ये ऐन निवडणुकीच्या तोंडावर महायुतीत बिघाडी झाली आहे. निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला असताना वसईतील महायुतीमधील शिवसेना आणि राष्ट्रवादी हे घटक पक्ष नाराज आहेत. भाजपकडून आम्हाला योग्य मान सन्मान मिळत नाही, विचारात घेतले जात नाही अशी तक्रार दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी केली आहे. या नाराजीमुळे तसेच आमंत्रण न मिळाल्याचे सांगत शुक्रवारी झालेल्या भाजप नेत्या स्मृती ईराणी यांच्या सभेलाही दोन्ही पक्षांचे नेते गैरहजर होते.

वसई विधानसभा मतदारसंघामध्ये भाजपाच्या स्नेहा दुबे-पंडित या महायुतीच्या उमेदवार म्हणून निवडणूक लढवत आहेत. अर्ज भरण्याच्या आदल्या दिवशी त्यांची उमेदवारी जाहीर झाली आणि त्यांना पक्षामध्ये प्रवेश देण्यात आला. सध्या स्नेहा दुबे यांचा प्रचार सुरू असला तरे महायुतीमधील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि शिवसेना (शिंदे गट) भाजपवर नाराज आहेत. ईराणी यांची शुक्रवारी वसईमध्ये सभा झाली. या सभेला देखील दोन्ही पक्षांचे नेते गैरहजर होते. त्यामुळे महायुतीमध्ये असलेली धुसफूस समोर आली आहे. 'मी पक्षाचा जिल्हाध्यक्ष आहे; मात्र मला कार्यक्रमाला या असे कळवलेच नव्हते, तर मी कसा जाऊ?' असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेसचे वसई विरार जिल्हाध्यक्ष राजाराम मुळीक यांनी केला. आम्हाला मान सन्मान दिला जात नाही, विचारात घेतले जात नाही, असा आरोप त्यांनी शिवसेना जिल्हाध्यक्ष नीलेश तेंडोलकर यांनीही संताप आणि नाराजी व्यक्त केली आहे. उमेदवारी अर्ज भरून आज १३ दिवस उलटून गेले. अद्यापही आम्हाला काहीच विचारण्यात आलेले नाही. ईराणी यांच्या सभेचे अधिकृत आमंत्रण देण्यात आले नाही. कार्यक्रम सुरू असताना ऐनवेळी फोन केला गेला. त्यामुळे मी त्या सभेला गेलो नाही असे ते म्हणाले. पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी महायुतीच्या सर्व घटकपक्षांना सोबत घेऊन काम करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या होत्या; मात्र पालकमंत्र्यांच्या सूचनेकडेही दुर्लक्ष केले जात असल्याचे ते म्हणाले. महायुतीला पोषक वातावरण आहे; परंतु एकांगी कारभार घातक ठरू शकतो, असा इशारा त्यांनी दिला. महायुतीमधील शिवसेना आणि राष्ट्रवादी हे घटक पक्ष नाराज असल्याचे भाजपने मान्य केले आहे. आमच्याकडून निश्चित काही त्रुटी राहिल्या आहेत. त्यामुळे समन्वय राहून गेला; परंतु मी या नाराज नेत्यांची भेट घेऊन निश्चितपणे त्यांची नाराजी दूर करीन, असे भाजपचे जिल्हाध्यक्ष महेंद्र पाटील यांनी सांगितले. आम्ही सर्व घटकपक्षांना सोबत घेऊन काम करत आहोत, असेही पाटील यांनी स्पष्ट केले. या नाराजीनाट्यावर पडदा पडला, तरी प्रचाराचे १५ दिवस वाया गेले आहेत. ते कसे भरून काढणार, हा प्रश्नच आहे.

### लक्षवेधी लढत

■■■

**भाजपचा बालेकिल्ला अशी ओळख असलेल्या कामठी विधानसभा मतदारसंघामधून पक्षाने या वेळी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना उमेदवारी दिली आहे. गेल्या वेळी बावनकुळे यांना पक्षाने डावलले होते, त्यांनाच उमेदवारी देण्याची वेळ पक्षावर आली. निष्ठेचे फळ त्यांना मिळाले. त्यांच्या विरोधात काँग्रेसचे सुरेश भोयर रिंगणात आहेत. भाजपचे प्रदेशाध्यक्ष निवडणूक लढवत असल्याने ही लढत लक्षवेधी झाली आहे.**

## भाजप प्रदेशाध्यक्षांसाठी प्रतिष्ठेची लढत

नागपूर शहराला लागून असलेल्या कामठी विधानसभा मतदारसंघातील लढत भाजप आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासाठी प्रतिष्ठेची आहे. कामठी मतदारसंघ शहरी आणि ग्रामीण असा संमिश्र स्वरुपाचा आहे. २००४ पासून येथून सातत्याने भाजप विजयी होत आहे. यंदाच्या निवडणुकीमध्ये कामठीतून एकूण १९ उमेदवार रिंगणात असले, तरी खरी लढत बावनकुळे आणि भोयर यांच्यात होणार आहे. या मतदारसंघामध्ये दलित आणि मुस्लिमांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या मतांवर काँग्रेसची भिस्त आहे; परंतु या मतदारसंघातून मुस्लिम उमेदवार उभे असल्याने काँग्रेसच्या मतपेढीला धक्का बसण्याची शक्यता आहे. त्यातच ओबीसी मतदारांवर बावनकुळे यांची पकड कायम आहे. ते या मतदारसंघामधून २००४, २००९ आणि २०१४ असे सलग तीन वेळा विजयी झाले होते. विजयाची हॅट्रीक करूनही त्यांना पक्षाने २०१९ मध्ये अनपेक्षितपणे उमेदवारी नाकारली होती. त्यांच्याऐवजी भाजपचे जिल्हा परिषदेचे सदस्य टेकचंद सावरकर यांना उमेदवारी दिली होती. सावरकर ११ हजार १३६ मतांनीच विजयी झाले होते. २०१४ च्या मताधिक्याच्या तुलनेत २०१९ मध्ये भाजपचे मताधिक्य ७० टक्क्यांहून अधिक घटले होते. गेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये तर महायुतीला या मतदारसंघामधून महाविकास आघाडीपेक्षा फारच कमी मते मिळाल्याने भाजपने सावरकर यांच्याऐवजी पुन्हा बावनकुळे यांना रिंगणात उतरवण्याचा निर्णय घेतला. लोकसभेला बसलेल्या धक्क्यातून सावरण्यासाठी भाजपचे हे पाऊल आहे. दुसरीकडे काँग्रेसकडून पुन्हा भोयर यांनाच उमेदवारी देण्यात आली आहे.

### जिल्हा वार्तापत्र

२०१९ च्या तुलनेत कामठी मतदारसंघाचे एकूण राजकारण बदलले आहे. भोयर यांनी लोकसभा निवणुकीमध्ये या भागातून काँग्रेसला मताधिक्य मिळवण्यासाठी प्रयत्न केले होते व त्यात त्यांना यश आले. त्यामुळे भोयर यांच्या पाठीशी काँग्रेसने पूर्ण ताकद लावली आहे. लोकसभा निवडणुकीत कामठीमध्ये काँग्रेसला भाजपपेक्षा सुमारे १८ हजार मते अधिक मिळाली. यामुळेच बावनकुळे यांना सर्व समाजांना बरोबर घेऊन त्यांचा पाठिंबा मिळवावा लागणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून भाजपची एकहाती सत्ता असलेला कामठी विधानसभा मतदारसंघ हिसकावून घेण्याची तयारी या वेळी काँग्रेसने केली आहे. काँग्रेसचे नेते यासाठी जोरदार कामाला लागले आहेत. बावनकुळे यांच्या नेतृत्वात ही निवडणुकी लढली जात आहे, तर दुसरीकडं काँग्रेसचे सुनील केदारही अधिक सक्रिय झाले आहेत. सामाजिकदृष्ट्या चार समाजाची मते निर्णायक आहेत. यातून भाजप कशी तरेल, याकडे सर्वांचं लक्ष लागले आहे. कामठी विधानसभा आणि बावनकुळे असे समीकरण झाले आहे. गेली अनेक वर्षे त्यांनी या मतदारसंघाचं प्रतिनिधित्व केले. नागपूर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष झाल्यानंतर त्यांनी मतदारसंघ पिंजून काढला, याचा लाभ त्यांना झाला. ते कामठीचे आमदार झाले, तेव्हापासून सतत निवडून येत आहेत;मात्र, २०१९ मध्ये पक्षाची त्यांच्यावर अवकृपा झाली आणि वरिष्ठांनी नाराजी भोवली. शेवटपर्यंत त्यांना उमेदवारी दिली नाही. मुलगा किंवा पत्नीला उमेदवारी मिळेल, अशी अपेक्षा होती; मात्र सावरकर यांना उमेदवारी देण्यात आली. ते निवडून आले. सावरकर यांना १ लाख १८ हजार १८२ मते मिळाली, तर भोयर यांना १ लाख ७ हजार ६६ मते मिळाली. या निवडणुकीत भाजपचे मताधिक्य प्रचंड घटले. २०१४ मध्ये ४० हजारांचे मताधिक्य होते ते १२ हजारांवर आले. यामुळे भाजपने पुन्हा बावनकुळे यांच्यावरच विश्वास दाखवला आहे. या मतदारसंघात कुणबी, तेली, बौद्ध आणि मुस्लिम समाजाची मते मोठ्या प्रमाणात आहेत. या वेळी बहुसंख्य समाज हा काँग्रेसच्या बाजूने असल्याने भाजप सावध पवित्रा घेत आहे. बसप, वंचित बहुजन आघाडी, रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवारांवरही बरेच काही अवलंबून आहे. धार्मिक ध्रुवीकरणाचा या मतदारसंघात फारसा प्रभाव नाही; परंतु सामाजिक ध्रुवीकरणाची शक्यता अधिक आहे.



■■■

## मुद्दे आणि गुद्दे

गुन्हे आणि अपराध करणाऱ्याला पाठीशी घालणारा कुणीही असो, शिक्षा झालीच पाहिजे अशी लोकांची अपेक्षा आहे. आपण निवडून देत असलेल्या उमेदवारांचे चारित्र्य स्वच्छ असावे, त्यांना खरोखरीच देशाच्या आणि राज्याच्या प्रगतीची तळमळ असायला हवी, अशी लोकांची अपेक्षा आहे. खरा आणि कोणत्याही दबावाशिवाय मिळणारा न्याय लोकांना हवा आहे.

लोकांना नेमके काय हवे आहे हे आपल्या राजनेत्यांना माहीत आहे. कारण अखेरीस तेदेखील याच समाजाचा एक भाग आहेत. लोक कसे जगतात हे त्यांना माहीत आहे. लोकांच्या नेमक्या अडचणी आणि प्रश्न त्यांना माहीत आहेत. गेली अनेक वर्षे ही आणि अशाच प्रकारची आश्वासने देऊन ते निवडून येत आहेत. कारण निवडून आल्यावर आपल्याला फारसे काही करायचेच नाही, हे त्यांना माहीत आहे. लोक ओरडतात. अलीकडे माध्यमांचा वापर करूनजास्त काळ ओरडतात आणि मग वाट्याला आलेले स्वीकारून पुन्हा एकदा नित्य जगण्याची धडपड सुरू करतात हे त्यांना माहीत आहे. निवडणुका येतात आणि जातात. कुणी जिंकतात. कुणी हरतात. कुणी सत्तेवर येतात. कुणी विरोधी पक्षात बसतात. पण मग लोकांचे आणि जनतेचे कल्याण करण्यासाठी, त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी निवडून दिलेले हे नेते आणि आमदार नक्की काय करणार आहेत? पुन्हा एकदा मागील पानावरून तसेच सारे चालू राहणार असेल तर ही निवडणुकीची नाटके आणि एवढा प्रचंड खर्च करायचाच कशासाठी? हे कुठे तरी थांबायला हवे. नवी सुरुवात व्हायला हवी. आपण ज्या शिवाजी महाराजांचे, बाबासाहेबांचे आणि इतर अनेक आदर्श राज्यकर्त्यांचे दाखले देतो, त्यांना खरोखरीच अभिप्रेत असलेला राज्यकारभार करण्याची निवडणुकीसाठी उभे राहणाऱ्या आणि ती जिंकणाऱ्या प्रत्येकाची इच्छा असायला हवी.



■■■

# महायुती सरकारने शेतकरी, महिला, तरूणांसाठी अनेक योजना राबवल्या

## शेतकरी नेते पाशा पटेल यांची गोरेगाव येथील प्रचारसभेत माहीती



**विजय गुंडेकर**
**हिंगोली, १० नोव्हेंबर**

महायुती सरकारने शेतकऱ्यांसाठी दरवर्षाला १२ हजारांचा सन्मान निधी, एक रूपयांत पीकविमा, मागेल त्याला सौरपंप, अतिवृष्टी आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत आदी योजना राबवल्या आहेत. शेतकरी, महिला आणि तरूणांसाठी विविध कल्याणकारी योजना महायुती सरकारने राबवल्या असून शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव देण्याचे काम केले आहे. त्यामुळे विरोधकांच्या पोटात दुखत आहे. महायुती सरकार शेतकऱ्यांच्या हिताचे सरकार असून शेतकऱ्यांनी महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहावे त्यासाठी भाजप-महायुतीचे अधिकृत उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांना प्रचंड मताधिक्याने पुन्हा एकदा निवडून देण्याचे आवाहन शेतकरी नेते पाशा पटेल यांनी केले.

गोरेगाव येथे आयोजित प्रचारसभेत कृषी मुल्य आयोगाचे माजी अध्यक्ष तथा शेतकरी नेते पाशा पटेल, भाजप महायुतीचे अधिकृत उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे, डॉ रवी कावरखे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना पाशा पटेल यांनी महाविकास आघाडी सरकारवर सडकून टीका केली. अडीच वर्ष सत्तेत असतांना या सरकारने शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव दिला नाही. परंतु केंद्रात जेव्हापासून नरेंद्र मोदी सरकार आले आहे तेव्हापासून शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव दिल्या जात आहे. बाजार समित्यामध्ये, हमीभाव खरेदी केंद्रात रेकॉर्ड तोड मालाची खरेदी कली जात आहे. शेतकऱ्यांना तत्काळ मालाचा पैसा मिळत आहे. केवळ मालाला भाव नाही तर शेतकऱ्यांना सक्षम बनविण्यासाठी कृषी विभागाच्या मार्फत अनेक योजना राबवल्या जात आहे. महायुतीचे सरकार संवेदनशील सरकार आहे. शेतकऱ्यांच्या हिताचे सरकार आहे.

यावेळी पुढे बोलतांना पटेल म्हणाले की, ग्रामीण भागातील महिलांना सक्षम करण्यासाठी महायुती आणि केंद्रतील एनडीए सरकारने लखपती दिदी योजना आणली आहे. राज्यात आतापर्यंत ११ लाख महिलांना लखपती बनविण्याचे काम केले आहे. याशिवाय महिलांसाठी शौचालये, उज्वला गॅस योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, एसटीमध्ये अर्धे तिकीट, तीन गॅस सिलेंडर मोफत, महिला बचत गटांना कमी व्याजदरात कर्ज, मालाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच तरूणांसाठी रोजगार निर्मिती होत आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात उद्योग येत असून अनेक बेरोजगार तरूणांच्या हाताला काम मिळत आहे. याशिवाय रस्ते, पाणी, वीज यांवरही महायुती सरकारने लक्ष केंद्रीत केले असून राज्यभर हायवेचे जाळे विणले आहे. सर्वच क्षेत्रात महायुती सरकारने मागील दोन वर्षात महाराष्ट्राला प्रगतीपथावर नेले असून महायुती सरकार हे जनतेच्या हिताचे सरकार आहे.

हिंगोली विधानसभा मतदारसंघाचे भाजप महायुतीचे अधिकृत उमेदवार तान्हाजी मुटकुळे हे सामान्य शेतकरी कुटुंबातील आहेत. त्यांना शेतकऱ्यांच्या अडीअडचणी चांगल्या पध्दतीने माहीती आहे. त्यामुळे त्यांनीमागील दहा वर्षात सिंचन, पाणी आणि वीज मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत. त्यामध्ये त्यांना यशही आले आहे. शाश्वत विकास करण्याचे त्यांचे स्वप्न असून त्यांच्या पाठीशी जनतेने उभे रहावे असे आवाहन पाशा पटेल यांनी केले.

# जरांगेंच्या नावाचा वापर उमेदवारांनी न करण्याचे आवाहन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० नोव्हेंबर**

मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी त्यांच्या आंदोलकांना निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करण्याचे आवाहन केले होते परंतु काही आंदोलकांनी उमेदवारी अर्ज कायम ठेवले आहेत. या आंदोलकांनी जरांगे यांच्या नावाचा किंवा फोटोचा निवडणुकीत कुठेही वापर करू नये असे आवाहन सकल मराठा समाजाच्या बैठकीतून करण्यात आले आहे.

येथील शासकीय विश्रामगृहात सकल मराठा समाजाचे विनायक भिसे, पप्पू चव्हाण, बालाजी वानखेडे, माधव कोरडे, कल्याण देशमुख आदींनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी विनायक भिसे यांनी भूमिका मांडतांना सांगितले की, मराठा आरक्षणसाठी मनोज जरांगे यांनी रक्ताचे पाणी केले. तब्बल १४ महिने आरक्षणाचा लढा दिला. सर्व समाजाला एकत्र आणण्याचे काम केले. त्यानंतर जरांगे यांनी विधानसभा निवडणुकीतून मराठा आरक्षणात सहभागी आंदोलकांना त्यांचे उमेदवारी अर्ज मागे घेण्याचे आवाहन केले होते. परंतु हिंगोली मतदारसंघातून डॉ रमेश शिंदे, कळमनुरी मतदारसंघातून अजित मगर तसेच सवंडकर यांनी त्यांचे उमेदवारी अर्ज मागे घेतले नाहीत. त्यांना संविधानाने निवडणुक लढविण्याचा अधिकार दिला आहे. त्यांनी निवडणुक लढवावी परंतु जरांगे यांच्या नावाचा किंवा त्यांच्या फोटोचा कुठेही निवडणुक प्रचारात वापर करू नये, असे आवाहन सकल मराठा समाजाच्यावतीने करण्यात आले आहे. मनोज जरांगे यांच्या आदेशानुसार सकल मराठा समाज त्यांच्या पाठीशी आजही कायम असल्याचे यावेळी भिसे यांनी सांगितले.

## संक्षिप्त वृत्त

### जिल्ह्यातील मतदान केंद्रांची यादी प्रसिध्द

हिंगोली-महाराष्ट्र राज्य विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ ची आदर्श आचारसंहित दि. १५ ऑक्टोबर, २०२४ पासून लागू झाली आहे. विधानसभा निवडणुकीसाठी बुधवार, दि. २० नोव्हेंबर, २०२४ मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी जिल्ह्यातील तिन्ही विधानसभा मतदार संघांतील मतदान केंद्राची यादी प्रसिध्द झाली असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी कळविले आहे. निवडणूक आयोगाच्या पूर्व मान्यतेने, मतदान क्षेत्रासाठी किंवा प्रत्येकाच्या समोर नोंदविलेल्या मतदारांच्या गटासाठी मतदान केंद्रांची यादी प्रसिध्द केली असल्याचे जिल्हाधिकारी श्री. गोयल यांनी सांगितले आहे. यामध्ये मतदान केंद्राचे ठिकाण, परिसर, मतदान केंद्राची इमारत, मतदान केंद्राच्या व्याप्तीनुसार मतदान क्षेत्र याची सर्व माहिती या यादीमध्ये नमूद आहे. ९२-वसमत विधानसभा मतदार संघामध्ये ३२७ मतदान केंद्र असून, ९३-कळमनुरी विधानसभा मतदार संघात ३४५ आणि ९४-हिंगोली विधानसभा मतदार संघात ३४३ अशा एकूण १०१५ मतदान केंद्राची यादी प्रसिध्द करण्यात आली असल्याचे गोयल यांनी सांगितले.

# विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात वाहनांची तपासणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० नोव्हेंबर**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ च्या पार्श्वभूमीवर शहरात येणाऱ्या सर्व चौकांमध्ये बॅरीकेटींग लावून पथकांच्यावतीने वाहनांची कसून तपासणी करण्यात येत आहे.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली बाहेर गावाहून शहरात येणाऱ्या वाहनांची कसून तपासणी करण्यासाठी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. येथील खटकाळी बायपास, नांदेड नाका, नर्सी फाटा, अकोला बायपास आदी ठिकाणी पोलिसांनी बॅरीकेटींग लावली असून शहरात येणाऱ्या वाहनांची पथकामार्फत तपासणी करण्यात येत आहे. तसेच शहरातही रात्रीच्या वेळी फिरणाऱ्या वाहनांचीही तपासणी पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# पहिल्या दिवशी ७०० मतदारांचे गृहभेटीद्वारे मतदान

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० नोव्हेंबर**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूक प्रक्रिया राबविण्यासाठी लोकशाहीचा लोकोत्सव सुरू आहे. या मतदारराजाच्या एकेका मतासाठी निवडणूक यंत्रणा जेव्हा गृहभेटीद्वारे ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांच्या घरी पोहचून त्यांचे मतदान करून घेत आहे. हिंगोली विधानसभा मतदारसंघातील सेनगाव तालुक्यातील हुडी या गावात मतदान केंद्राचे फिरते पथक आज (दि. १०) दुसऱ्या दिवशी रविवारी पोहचले. हुडी येथील ज्येष्ठ मतदार असलेले १०२ वर्षीय मारोतराव हरजी कुटे यांनी गृहभेटी मतदान अभियानाच्या फिरत्या पथकाच्या माध्यमातून मतदानाचा हक्क बजावत आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडले. हुडी या गावातील ४ ज्येष्ठ व दिव्यांग मतदारांनी पहिल्याच गृहभेटीतून १०० टक्के मतदान झाले आहे. त्यांच्यासोबत श्रीमती पारूबाई सटवाराव पोले या ८७ वर्षीय, श्रीमती पंचफुलाबाई शंकरराव पोले या ८७ वर्षीय आजींनीसुद्धा मतदानाचा हक्क बजावला. तर कान्हू मेघा जाधव ७७ वर्षीय दिव्यांग मतदारानेही मतदानाचा हक्क बजावत भारत निवडणूक आयोगाच्या वतीने आलेल्या गृहभेटी फिरते मतदान पथकाचे आभार मानले. या पथकामुळे या वयातही मला मतदान करता आल्याचे समाधान श्री. जाधव यांनी व्यक्त केले. कान्हू मेघा जाधव यांनीही टपाली मतदानातून लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी आपले अमूल्य मत दिल्यामुळे झालेला आनंद त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसून आला. जिल्ह्यात ९ आणि १० नोव्हेंबर रोजी टपाली मतदान प्रक्रिया पार पडली आहे. तसेच जामदया येथील नामदेव किसन चिबडे (९५) आणि वत्सलाबाई नामदेव चिबडे (९०) या ज्येष्ठ मतदार असलेल्या दाम्पत्यानेही गृहभेटी मतदानातून मतदानाचा हक्क बजावत राष्ट्रीय कर्तव्य पार पाडले. एकही मतदार मतदानापासून वंचित राहू नये, यासाठी भारत निवडणूक आयोग प्रयत्नशील असून, त्यासाठी जिल्ह्यात निवडणूक विभागाची पथके गठित करण्यात आली आहेत. ही पथके घरोघरी जावून ज्येष्ठ आणि दिव्यांग मतदारांचे मतदान करून घेत आहेत. पथक प्रमुख देविदास इंगळे, बीएलओ शिक्षक माणिक सिताफळे, अविनाश चव्हाण, तलाठी मदन राठोड आणि सूक्ष्म निरीक्षक पोलीस कर्मचारी यांचा समावेश होता.

जिल्ह्यातील ९२-वसमत, ९३-कळमनुरी व ९४-हिंगोली विधानसभा मतदार संघाची अधिसूचना १५ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध झाली असून, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल हे तिन्ही मतदार संघातील निवडणूक प्रक्रियेत जातीने लक्ष घालत आहेत. त्यांच्या सोबतीला अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, टपाली मतदानाचे जिल्हा समन्वयक तथा उपजिल्हाधिकारी अनिल माचेवाड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे, निवडणूक निर्णय अधिकारी विकास माने, प्रतिक्षा भुते, समाधान घुटुकडे हे त्याकामी आपापली कर्तव्ये पार पाडत आहेत.

हिंगोली जिल्ह्यातील तिन्ही विधानसभा मतदारसंघात ज्येष्ठ नागरिकांचे ८८८, दिव्यांग १५७ आणि अत्यावश्यक सेवेतील २५ असे एकूण १ हजार ७० मतदार असून पहिल्या दिवशी गृहभेटी मतदान अभियानाद्वारे ७०० ज्येष्ठ व दिव्यांग मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असल्याचे सांगितले आहे. सर्व विधानसभा निहाय टपाली आणि गृह मतदानाची प्रक्रिया सुरू झाली आहे.

९२-वसमत विधानसभा मतदार संघात ज्येष्ठ २४५, दिव्यांग ५६, अत्यावश्यक सेवेतील ०३ मतदार असून १८८ ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग ५० मतदारांनी मतदानांचा हक्क बजावला आहे. ९३-कळमनुरी विधानसभा मतदारसंघातील ज्येष्ठ २५०, दिव्यांग ५६ आणि १५ अत्यावश्यक सेवेतील मतदारांचा समावेश असून १२६ ज्येष्ठ मतदार, ३६ दिव्यांग मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. तर ९४-हिंगोली विधानसभा मतदार संघातील ज्येष्ठ मतदार ३९३, दिव्यांग ४५ आणि अत्यावश्यक सेवेतील ७ मतदाराचा समावेश असून २६७ ज्येष्ठ आणि ३३ दिव्यांग मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. असे एकूण ५८१ ज्येष्ठ आणि ११९ दिव्यांग मतदारांनी पहिल्या दिवशी मतदानाचा हक्क बजावत आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडले. यावेळी घरबसल्या मतदान करता येत असल्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद स्पष्टपणे दिसून आला तर निवडणूक आयोगाच्या गृहभेटी मतदान अभियानाचे कौतुक केले.

# मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत- जिल्हाधिकारी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० नोव्हेंबर**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ९४-हिंगोली विधानसभा मतदारसंघांमध्ये स्वीपच्या माध्यमातून मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी केले. येथील शिवाजीराव देशमुख सभागृहात आयोजित मतदार जनजागृती कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी ९४-हिंगोली विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी समाधान घुटुकडे, जिल्हा स्वीप नोडल अधिकारी प्रशांत दिग्रसकर, डायट प्राचार्य दिपक साबळे, ज्येष्ठ अधिव्याख्याता अमोल निळेकर, स्वीप नोडल अधिकारी नितीन नेटके उपस्थित होते.

मतदारसंघातील जास्तीत जास्त मतदारांना मतदान केंद्राकडे वळवून मतानाचा टक्का वाढविण्यासाठी निवडणूक विभाग प्रयत्न करत आहे. याकामी मोठ्या प्रमाणावर मतदारसंघात विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून मतदार जनजागृती करण्यात येत आहे. सर्वांनी आपापल्या प्रयत्नातून प्रत्येक व्यक्ती मतदान करेल, यासाठी प्रयत्नशील राहून मतदानाचा टक्का वाढवावा, असे आवाहन श्री. गोयल यांनी केले.

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ९४-हिंगोली विधानसभा मतदारसंघांमध्ये स्वीपच्या माध्यमातून मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी विविध कार्यक्रम राबवले जात आहेत. स्वीप अंतर्गत दिनांक ८ ते १९ नोव्हेंबर २०२४ दरम्यान घ्यावयाच्या उपक्रमामध्ये मतदार शपथ, निवडणूक गीत, रांगोळी, पथनाट्य, मतदान जनागृतीविषयक चित्रकला, पोस्टर स्पर्धा, मानवी साखळी, संकल्प पत्र, मॅरेथॉन, पायी रॅली, सायकल मोटार तथा मोटर सायकल रॅली व घरोघरी प्रत्यक्ष भेट या उपक्रमाचा समावेश केला गेला आहे.

शाहीर प्रकाश दांडेकर व इतर कलावंत यांच्याद्वारे कार्यक्रमाची सुरुवात मतदान जागृती गीताने झाली. जिल्हा स्वीप नोडल अधिकारी प्रशांत दिग्रसकर यांनी आपल्या प्रास्ताविकेमधून स्वीप अंतर्गत झालेल्या उपक्रमाचा व येत्या काही दिवसात होणाऱ्या कार्यक्रमाच्या नियोजनाचा आढावा स्पष्ट केला.

उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते स्वाक्षरी मोहिमे अंतर्गत मी मतदान करणारच.! अशा आशयाच्या बोर्डवर स्वाक्षऱ्या करून १०० टक्के मतदान करण्याचा निर्धार केला. विधानसभा निवडणुकीत निःपक्षपणाने, कोणत्याही गैर मार्गाचा अवलंब न करता, शांततापूर्ण वातावरणात, कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता मतदान करण्यासंदर्भात उपस्थित सर्वांनी शपथ घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वीप सदस्य राजकुमार मोरगे यांनी केले तर आभार स्वीप नोडल अधिकारी नितीन नेटके यांनी मानले.

कार्यक्रमासाठी तालुका आयकॉन एम. एम. राऊत, स्वीप सदस्य विनोद चव्हाण, संजय मेथेकर, शाम स्वामी, विजय बांगर, बालाजी काळे, दिपक कोकरे, राजकुमार मोरगे तसेच मोठ्या प्रमाणावर मतदार उपस्थित होते.

# दिवाळीनिमित्त होमगार्ड कर्मचाऱ्यांचा फराळाचा कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० नोव्हेंबर**

होमगार्ड जिल्हा समादेशक तथा अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी होमगार्ड कार्यालय येथे जिल्ह्यातील होमगार्ड महिला व पुरुष कर्मचारी यांना दिवाळीनिमित्त फराळाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नरेंद्र पाडळकर, केंद्र नायक नानासाहेब मोखडे, संजय वसिया, हरीशंकर जोशी, राजू बांगर, भागवत देवरसे, विठ्ठल राऊत आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जवळपास २५० ते ३०० होमगार्ड महिला पुरुष कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त फराळाचे वाटप करण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक नरेंद्र पडळकर यांनी होम गार्ड महिला, पुरुष कर्मचाऱ्यांना मतदान जनजागृती संदर्भात माहिती दिली. सर्व होमगार्ड यांनी २० नोव्हेंबर रोजी मतदान करण्याचे सुद्धा आवाहन पोलीस निरीक्षक नरेंद्र पडळकर यांनी केले.

# हिंगोलीत शिक्षक पात्रता परिक्षा सुरळीतपणे पार पडल्या



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० नोव्हेंबर**


राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यामार्फत जिल्हास्तरावर शिक्षक पात्रता परीक्षा-२०२४ रविवारी शहरातील विविध पक्षा केंद्रावर सुरळीतपणे पार पडल्या आहेत.

सकाळी १०.३० ते दुपारी १ व दुपारी २.३० ते सायंकाळी ५ या दरम्यान दोन सत्रामध्ये घेण्यात आल्या. या परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्र परिसरात भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू करण्यात आले होते.चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता. रविवार, दि. १० नोव्हेंबर रोजी पहिल्या सत्रात सकाळी १०.३० ते दुपारी १ या वेळेत पोतदार इंटरनॅशनल इंग्लीश स्कूल जवळा पळशीरोड हिंगोली, सरजुदेवी भारुका आर्यकन्या विद्यालय हिंगोली, अनुसया विद्यामंदीर खटकाळी परिसर हिंगोली, आदर्श महाविद्यालय हिंगोली इमारत भाग- १ व २, शांताबाई मुंजाजी दराडे हायस्कूल हिंगोली आणि विद्या निकेतन इंग्लीश स्कूल हिंगोली या परीक्षा केंद्रावर शिक्षक पात्रता परीक्षा पार पडल्या.

दुसऱ्या सत्रात दुपारी २.३० ते सायंकाळी ५ या वेळेत पोतदार इंटरनॅशनल इंग्लीश स्कूल जवळा पळशीरोड हिंगोली, सरजुदेवी भारुका आर्यकन्या विद्यालय हिंगोली, अनुसया विद्यामंदीर खटकाळी परिसर हिंगोली, आदर्श महाविद्यालय हिंगोली इमारत भाग-१ व २, शांताबाई मुंजाजी दराडे हायस्कूल हिंगोली, विद्या निकेतन इंग्लीश स्कूल हिंगोली, सॅकरेड हार्ट इंग्लीश स्कूल हिंगोली या परीक्षा केंद्रावर शिक्षक पात्रता परीक्षा घेण्यात आल्या.



## इति-उवाच...



लाडकी बहीण योजना बंद करावी म्हणून महाविकास आघाडीचे लोक उच्च न्यायालयात गेले. या योजनेमुळे राज्याचे नुकसान होणार, अशी टीका त्यांनी केली. मात्र, आता याच महाविकास आघाडीने महिलांना तीन हजार रुपये देण्याचे आश्वासन दिले. ज्यांचे राज्य येणार नाही, ते तीन हजार काय, पाच हजारही देऊ शकतील.''

**छगन भुजबळ,** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते



विधानसभा निवडणुकीनंतर आम्ही एकत्र बसू. ज्यांच्या पक्षाच्या आमदारांची संख्या जास्त असेल, त्यांना त्यांचा प्रतिनिधी निवडायला सांगू आणि आम्ही त्याला पाठिंबा देऊ. ही माझ्या पक्षाची भूमिका आहे.

**शरद पवार,** शरद पवार गटाचे प्रमुख



''मी गेल्या १० वर्षांत काम केले म्हणून नारायण राणेंना आता फिरावे लागत आहे. मी केलेले काम राणेंचे दोन्ही पुत्र करू शकत नाहीत. कुडाळ एमआयडीसीमध्ये नारायण राणे यांची जागा असून, तिथे एकही उद्योग आणला नाही. नारायण राणे यांचं वय झाले आहे, त्यांनी धमक्या देऊ नये. उद्धव ठाकरे यांना अडवण्यापेक्षा आधी आम्हाला अडवून दाखवा. भ्रष्टाचार केला असल्यास फासावर लटकवा.''

**वैभव नाईक,** ठाकरे गटाचे उमेदवार



''पृथ्वीवर असा एकही पक्ष नसेल, ज्याच्या चिन्हाखाली लिहायला लागते की, आमचे चिन्ह 'न्यायप्रविष्ट' आहे. ऑस्ट्रेलिया, चीन अथवा कुठेही जा, पण अशी वेळ कोणत्याच पक्षावर आली नाही. आमचे हे चिन्ह आहे, पण न्यायप्रविष्ट आहे, हे सांगावे लागत आहे. आमचं घड्याळ चोरीला गेले आहे, त्यामुळे 'तुतारी वाजवणारा माणूस' हे चिन्ह आम्ही घेतले.''

**जयंत पाटील,** शरद पवार गटाचे नेते

# मविआ म्हणजे मतांसाठी झूठ, सत्तेत लूट, जनतेत फूट

## माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांचा घणाघात

◆ **मुंबई, १० नोव्हेंबर**

एकीकडे विकासाला गती देणारी महायुती, तर दुसरीकडे 'मतासांठी झूठ, सत्तेत आल्यावर लूट आणि देशातील जनतेत फूट' अशी नीती असणारी महाविकास आघाडी आहे, अशी सडकून टीका माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांनी केली.

भाजपा मीडिया सेंटरमध्ये झालेल्या पत्रपरिषदेत इराणी बोलत होत्या. गेल्या अडीच वर्षांत केंद्रातील मोदी सरकार आणि राज्यातील महायुती सरकारमुळे महाराष्ट्राने विकासाची नवी उंची गाठली आहे. समाजातील सर्व घटकांचा विकास आणि महिला सन्मान हे भाजपो ध्येय आहे. त्यानुसारच विकासाची कामे गतीने होत आहेत. विकसित महाराष्ट्रासाठी महायुतीला आशीर्वाद द्या, असे आवाहन स्मृती इराणी यांनी केले.

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात अन्य राज्यांतील काँग्रेसचे नेते महाराष्ट्रात खोटारडेपणाचे मायाजाळ पसरवायला आले आहेत. कर्नाटकात दिवाळखोरीची स्थिती पाहता, निवडणूक काळात काँग्रेसने दिलेल्या खोट्या आश्वासनांमुळे राज्याची तिजोरी रिकामी झाली, हेच सिद्ध झाले आहे. कर्नाटकला दिवाळखोरीच्या मार्गावर आणणाऱ्या काँग्रेसने आदिवासी आणि दलित समाजाच्या प्रगतीसाठी राज्याच्या तिजोरीतील सुमारे दहा हजार कोटींचा निधी आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी इतरत्र वळवला आहे. राजस्थानात जनतेला भुरळ घालून मते मिळवण्यासाठी काँग्रेसने बेरोजगारांना भत्ता देण्याचे जाहीर केले. पण, तिथे ना बेरोजगारांना रोजगार मिळाला, ना भत्ता. त्यामुळे मागील विधानसभा निवडणुकीत तरुणांचा जोश आणि जनतेचा रोष पहायला मिळाला आणि भाजपाला पुन्हा जनतेची सेवा करण्याची संधी मिळाली, असे त्यांनी सांगितले.

जे नेते हरयाणाच्या निवडणुकीत जिलेबीची फॅक्टरी उघडण्यासाठी इच्छुक होते, त्यांना हरयाणाच्या जनतेने चोख उत्तर दिले. पण, जे महाराष्ट्रात काँग्रेसचा प्रचार करण्यासाठी आले, त्यांनी हिमाचलच्या जनतेला वीज बिल कमी करण्याचे आश्वासन दिले होते. प्रत्यक्षात मात्र तिथे बिल वाढवले. प्रत्येक महिलेला दरमहा १५०० रुपये देण्याचेही आश्वासन त्यांनी दिले होते. प्रत्यक्षात ९६ टक्के महिलांना त्यापासून वंचित ठेवले. मते मिळवण्यासाठी काँग्रेस निवडणुकीच्या काळात खोटे बोलते, नंतर लूट करते आणि देशात फूट पाडते, हे कळून चुकल्याने महाराष्ट्रातील जनता या खोट्या आश्वासनांना बळी पडणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

◀*(तभा वृत्तसेवा)*








माजी आमदार रूपेश म्हात्रे यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह शनिवारी भिवंडी येथे आयोजित सभेत शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी स्वत: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले

## रूपेश म्हात्रेंनी केला शिवसेनेत प्रवेश

◆ **भिवंडी, १० नोव्हेंबर**

भिवंडीतील ठाकरे गटाचे लोकसभा संपर्क प्रमुख व माजी आमदार रूपेश म्हात्रे यांनी ठाकरे यांची साथ सोडत शिवसेनेत प्रवेश केला आहे. या पक्षप्रवेशावेळी म्हात्रे याचे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

म्हात्रे यांनी शिवसेनेत प्रवेश करताच त्यांच्यावर उपनेतेपदाची जबाबदारी सोपवण्यात आली. म्हात्रे विधानसभा निवडणुकीत भिवंडी पूर्व या जागेसाठी इच्छूक होते. परंतु, महाविकास आघाडीच्या वाटाघाटीत ही जागा समाजवादी पक्षाला मिळाली. महाविकास आघाडीकडून या जागेसाठी समाजवादी पक्षाचे रईस शेख निवडणूक लढवत आहेत. त्यामुळेच म्हात्रे हे नाराज होते. तिकीट न मिळाल्याने म्हात्रे यांनी अनेकवेळा आपली नाराजी बोलून दाखवली होती. एका सभेत म्हात्रे यांनी उद्धव ठाकरे व आदित्य ठाकरे यांच्या विरोधात विधान केले होते. त्यानंतर त्यांना ठाकरे गटाने बाहेरचा रस्ता दाखवला होता.

◀*(वृत्तसंस्था)*

# राजकारण कारल्यासारखे कडू झाले : संभाजीराजे

◆ **नाशिक, १० नोव्हेंबर**

कारल्याच्या भाजीसारखे राजकारण कडू झाले आहे. स्वराज्य पक्षाचे प्रमुख छत्रपती संभाजीराजे यांनी असे म्हण,त सर्व पक्षांच्या नेत्यांवर निशाणा साधला. स्वराज्य पक्षाचे नाशिक पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार दशरथ पाटील यांच्या प्रचारासाठी छत्रपती संभाजीराजेंची जाहीर सभा पार पडली.



आज जे राजकारण सुरू आहे, ते आजवर कधीच बघितले नाही. खोके, गद्दारी बेईमानी सुरू आहे. माझा शिवसेना पक्ष कधीही काँग्रेसशी युती करणार नाही, असे बाळासाहेब ठाकरे बोलत होते. मग, उद्धव ठाकरे काँग्रेससोबत कसे गेले. खुर्चीसाठी तुम्ही तिथे गेले. मग ही गद्दारी नाही का, असा प्रश्न छत्रपती संभाजीराजे यांनी उपस्थित केला. सोनिया गांधी यांच्या परदेशीचा मुद्दा घेऊन शरद पवार काँग्रेसमधून बाहेर पडले, नंतर पुन्हा त्यांच्यासोबत गेले. कारल्याच्या भाजीसारखे राजकारण कडू झाले आहे, असे म्हणत छत्रपती संभाजीराजेंनी सर्वांवर हल्ला चढवला.

महाराष्ट्र इतरांना दिशा देणारे राज्य आहे. पण, या सर्व प्रस्थापितांनी महाराष्ट्र गिळून टाकला आहे. सदाभाऊ खोत काहीही बोलतात, त्याला उत्तर देणारा तो कुत्रा आहे म्हणतात, हा प्रचार आहे का, असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला. महायुती १५०० रुपये रुपये देतात, महाविकास आघाडीवाले म्हणतात ३ हजार देतो, त्यापेक्षा या महिलांना रोजगार द्या, असे म्हणत छत्रपती संभाजीराजे यांनी महायुती आणि महाविकास आघाडीवर निशाणा साधला.

◀*(वृत्तसंस्था)*

# सिमेंट घोटाळ्याने गमवावे लागले अंतुलेंना मुख्यमंत्रिपद

**श्यामकांत जहागीरदार**



◆ **नवी दिल्ली, १० नोव्हेंबर**

महाराष्ट्राचे उच्चविद्याविभूषित तसेच पहिले मुस्लिम मुख्यमंत्री म्हणून बॅ. अब्दुल रहमान अंतुले यांची ओळख होती. मात्र, सिमेंट घोटाळ्यामुळे त्यांना मुख्यमंत्रिपद गमवावे लागले.



१९८० च्या लोकसभा निवडणुकीत सत्तेवर आलेल्या इंदिरा गांधी यांनी गैरकाँग्रेसी पक्षांची राज्य सरकारे बरखास्त केली. यात महाराष्ट्रातील शरद पवार यांच्या नेतृत्वातील पुलोद सरकारचाही समावेश होता. गांधी घराण्याचे निष्ठावंत म्हणून ओळखले जाणारे अंतुले यांची मुख्यमंत्री म्हणून काँग्रेसने निवड केली. अंतुले यांनी मुख्यमंत्रिपदासाठी उत्सुक असलेल्या वसंतदादा पाटील आणि अन्य काँग्रेस नेत्यांना मागे टाकले. अंतुले संजय गांधी यांचे समर्थक म्हणून ओळखले जात होते.

अंतुलेंना मुख्यमंत्री करण्यात संजय गांधी यांचीही मोठी भूमिका होती, असे म्हणतात. कारण, त्याआधी आणि नंतरही महाराष्ट्रात कधी मुस्लिम मुख्यमंत्री झाला नाही.



अंतुले चांगले प्रशासक होते. मुख्यमंत्रिपदाच्या काळात त्यांनी अनेक धाडसी निर्णय घेतले. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा देशातील बहुधा पहिला निर्णय अंतुले त्यांनी रिझर्व्ह बँकेचा विरोध डावलून घेतला हाता. अंतुले मुख्यमंत्री झाल्यानंतर दोन-तीन महिन्यांतच संजय गांधी यांचे निधन झाले. संजय गांधींच्या स्मरणार्थ अंतुले यांनी संजय गांधी निराधार योजना सुरू केली. नंतर बहुतेक सर्व राज्यांनी ही योजना राबवली. त्यावेळी या योजनेत निराधार व्यक्तीला ६० रुपये मानधन मिळत होते. आता ते ६०० रुपये झाले आहे.

पोलिसांना तेव्हा हाफपँट असा गणवेश होता. अंतुलेंनीच पोलिसांना फुलपँट घालायला लावली. कुलाबाचे रायगड जिल्हा असे नामकरण करण्याचा निर्णय तसेच छत्रपती शिवाजी महाराजांची भवानी तलवार लंडनच्या म्युझियममधून आणण्याची त्यांची घोषणा तेव्हा चांगलीच गाजली होती. मुख्यमंत्रिपदावर असताना वेष बदलून त्यांनी मुंबईच्या नाईटलाईफची केलेली पाहणी पोलिस खात्याची झोप उडवून गेली होती. मात्र, सिमेंट घोटाळ्याने अंतुले यांची बहरत असलेली राजकीय कारकीर्द संपवली आणि त्यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला.

त्यावेळी सिमेंट खुल्या बाजारात मिळत नव्हते. सिमेंटसाठी सरकारी परवानगी घ्यावी लागत होती. अंतुले यांनी इंदिरा गांधी प्रतिभा प्रतिष्ठानची स्थापना केली. या प्रतिष्ठानला देणग्या देण्याच्या बदल्यात बिल्डरांना सिमेंटचे मुक्तहस्ते परवाने देण्यात आल्याचा आरोप तेव्हा झाला. या आरोपाने प्रचंड खळबळ उडाली. एकप्रकारे अंतुले यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप झाला. विरोधी पक्षांच्या आणि पक्षांतर्गत विरोधकांच्या हाती अंतुलेच्या विरोधात आयता मुद्दा मिळाला. या मार्गाने अंतुले यांना ३० कोटी रुपये मिळाले होते, असे म्हणतात.

प्रतिभा प्रतिष्ठानला मिळालेल्या देणग्या रोखीने नाही तर, आपण धनादेशाद्वारे घेतल्या, असा खुलासा अंतुले यांनी करण्याचा प्रयत्न केला; मात्र त्यावर कोणाचा विश्वास बसला नाही. अंतुले यांनी रोखीने देणग्या घेतल्या, यावर जनमानसाचा विश्वास बसला. मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणात अंतुले यांच्यावर ताशेरे ओढले, त्यामुळे या घोटाळ्यावर एकप्रकारे शिक्कामोर्तब झाले. अंतुले यांच्या प्रतिष्ठानाचे नाव इंदिरा गांधी प्रतिभा प्रतिष्ठान असल्यामुळे या साऱ्या प्रकरणात सातत्याने इंदिरा गांधींचे नाव येत होते. त्यामुळे त्याही अस्वस्थ झाल्या. त्यामुळे अंतुलेना मुख्यमंत्रिपदावरून हटवण्याचा निर्णय त्यांनी घेतला. अशा प्रकारे बहुचर्चित सिमेट घोटाळ्याने अंतुले यांना मुख्यमंत्रिपद गमवावे लागले.

भ्रष्टाचाराच्या आरोपाविरुद्ध बॅरिस्टर असलेल्या अंतुले यांनी प्रदीर्घ काळ न्यायालयीन लढा दिला. १६ वर्षांनंतर या प्रकरणात त्यांना क्लीनचिट मिळाली. तोपर्यंत त्यांचे व्हायचे ते राजकीय नुकसान होऊन गेले होते. क्लीन चिट मिळाल्यानंतर त्यांची राजकीय कारकीर्द पुन्हा सुरू झाली, पण त्यात पहिलेसारखा दम नव्हता. ■

# महाराष्ट्राची भाषा घाण करणारा भिकार संपादक इथं राहतो

## राज ठाकरेंची संजय राऊतांवर अप्रत्यक्ष टीका



◆ **मुंबई, १० नोव्हेंबर**

महाराष्ट्राची भाषा घाण करणारा भिकार संपादक इथं राहतो, अशा शब्दांत ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांच्यावर नाव न घेता मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुंबईतल्या भांडुप येथे झालेल्या सभेत जोरदार टीका केली.

संपूर्ण महाराष्ट्राची भाषा घाणेरडी करणारा भिकार संपादकाला वाटते, तोंड त्यालाच आहे. आम्ही ठाकरे आहोत. त्यांना वाटते शिव्या त्यांच्याकडे आहेत. शोलेमध्ये डायलॉग होता, तू दो मारोगे तो हम चार मारेंगे. घाण करून टाकलं सर्व राजकारण, असा हल्ला राज ठाकरे यांनी चढविला.

कोण बोलले आणि काय बोलले, हा माझा प्रश्न नाही. कोण काय बोलते, कुणावर बोलते, किती खालच्या थरावर बोलते, त्याचे मला देणेघेणे नाही. पण, हे दाखवतात तेव्हा भविष्यातील पिढीला वाटते हेच राजकारण. हाच समज होत गेला तर महाराष्ट्राचे राजकारण किती घाण होईल, याचा विचार केला आहे का? त्यांना वाटते आमच्याकडें तोंड नाही. आमचे तोंड सुटले तर त्यांना कल्पना आहे या गोष्टीची... संयम बाळगतो याचा अर्थ वेगळा काढू नये, असा इशारा राज यांनी दिला. काही जागा कोणत्याही परिस्थितीत निवडून आणणार. कुणी दादागिरीची भाषा केली, तर दुप्पट दादागिरीने उतरेन. मी हे तुमच्या टाळ्यांसाठी बोलत नाही, समोरच्यांनी एकदा आजमावून पाहावे, असा दम देखील राज ठाकरेंनी दिला.

◀*(तभा वृत्तसेवा)*

# पालघरमध्ये व्हॅनमधून ३.७० कोटींची रोकड जप्त

◆ **पालघर, १० नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेदरम्यान पोलिसांनी पालघर जिल्ह्यात एका व्हॅनमधून ३.७० कोटी रुपयांहून अधिक रोकड जप्त केली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. पोलिसांच्या दक्षता आणि उड्डाण पथकाला एक व्हॅन रोकड घेऊन जात असल्याची माहिती मिळाली. माहितीच्या आधारे पथकाने व्हॅन अडवली आणि तपासणी केली, त्यात ३,७०,५०,००० रुपये रोख आढळून आले. ही रोकड नवी मुंबईतील एका कंपनीतून पालघरमधील विक्रमगड येथे नेत असल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले. पुढील चौकशीसाठी आयकर विभाग तसेच निवडणूक अधिकाऱ्यांना कळवण्यात आले आहे. व्हॅनमधील दोघांना ताब्यात घेण्यात आले.

◀*(वृत्तसंस्था)*

# शरद पवारांना नोटीस पाठवली नाही : सुनील टिंगरे

◆ **पुणे, १० नोव्हेंबर**

ज्येष्ठ नेते शरद पवार यांना सुनील टिंगरे यांनी नोटीस पाठवली, असा दावा शरद पवार यांची कन्या सुप्रिया सुळे यांनी केला. याला उत्तर देत, आपण कोणतीही कायदेशीर नोटीस पाठवली नसल्याचे टिंगरे यांनी सांगितले.



पुण्यातील कल्याणीनगर येथे घडलेल्या पोर्शे कार अपघात प्रकरणात नाव घेऊन बदनामी केली, तर कोर्टात जाईल, अशी नोटीस राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सुनील टिंगरे यांनी शरद पवार यांना पाठवली असल्याचे खासदार सुप्रिया सुळेंनी शुक्रवारी म्हटले.

ज्या शरद पवारांनी मागील निवडणुकीत एबी फॉर्मवर सही करून सुनील टिंगरे यांच्या हातात दिला, त्यांनीच आज पवारांना नोटीस पाठवली आहे, असेही सुळेंनी म्हटले. त्यावर, मी नोटीस पाठवली नसल्याचे आमदार सुनील टिंगरे यांनी सांगितले. महाविकास आघाडीतील पक्षांना आपल्यावर होत असलेल्या टीकेबद्दल एक सामान्य नोटीस बजावली होती. मात्र, शरद पवार किंवा कोणत्या नेत्याला आपण नोटीस बजावली नव्हती, असे आमदार टिंगरे म्हणाले. शरद पवार आजही आपले दैवत आहेत, असेही सुनील टिंगरेंनी म्हटले आहे.

पवारांना वैयक्तिक मी कोणतीही नोटीस बजावली नाही. मध्यंतरीच्या काळात जी चुकीची माहिती मिळाली होती, त्या आधारे अनेक नेते आणि प्रवक्ते यांच्याकडून काही वक्तव्य करण्यात आले. पुन्हा एकदा कोणत्याही व्यक्तीकडून चुकीच्या माहितीच्या आधारे कोणती वक्तव्ये होऊ नये, अशा पद्धतीची नोटीस दिलेली आहे, असे ते म्हणाले.

शरद पवारांना तुम्ही पोर्शे कार अपघातानंतर नोटीस पाठवली होती. माझी बदनामी केली तर, मी कोर्टात जाईल, असे म्हणत नोटीस बजावली, असे सुप्रिया सुळेंनी शुक्रवारी म्हटले होते.

◀*(वृत्तसंस्था)*




मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, अभिनेता श्रेयस तळपदे आणि अभिनेत्री पद्मिनी कोल्हापुरे यांनी शनिवारी मुंबईत आयोजित एका कार्यक्रमात विधानसभा निवडणुकीत मोठ्या संख्येत मतदान करण्याचे आवाहन केले

# 'रोटी बेटी आणि माटी'वरून हेमंत सोरेन यांची भाजपावर टीका

**जमशेदपूर :** झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी 'रोटी बेटी आणि माटी' वरून भाजपावर टीका केली. त्यांच्या सरकारने महिलांची विशेषत: मुलींची सुरक्षा आणि कल्याण सुनिश्चित करण्यासाठी विविध कल्याणकारी योजना लागू केल्या असल्याचा दावा त्यांनी केला. घाटशिला येथील गांधी हाट मैदानावर जाहीर सभेला संबोधित करताना केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान यांचा अप्रत्यक्ष संदर्भ देत, सोरेन यांनी त्यांच्यावर मध्यप्रदेशातील आदिवासींच्या सुरक्षेबाबत पोकळ दावे केल्याचा आरोप केला.

मणिपूरमध्ये महिलांवर सुरू असलेल्या अत्याचारांच्या पृष्ठभूमीवर केंद्र सरकारच्या निष्क्रियतेकडे लक्ष वेधून, त्यांनी 'रोटी बेटी आणि माटी'च्या संरक्षणाबाबत खोटे दावे केल्याचा आरोप भाजपावर केला. ■